बालज्ञानमाला – पुष्प १२२

# मुनि गौतम

म. ग्रं. सं. ठाणे
विषय — च. रित्र
अ. नं. २२४



REFBK-0005261

लेखक :

चिंतामण विनायक जोशी, एम. ए.
बडोदें.

किंमत ०–६–०

श्री सयाजी बालज्ञानमाला-पुष्प १२२

( चरित्रगुच्छ-२१ )

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्र
सं. नं.
ता.
ठाणे

# शाक्यमुनि गौतम

REFBK-0005261

—: लेखक व प्रकाशक :—

चिंतामण विनायक जोशी एम्. ए.
पाली भाषाध्यापक, बडोदें कॉलेज.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. ५२६१

किंमत सहा आणे.

किंमत सहा आणे. टपालखर्च २ आणे.

## मिळण्याची ठिकाणें.

(१) तु. पुं. शेट्ये, माधवबाग मुंबई ४.

(२) परचुरे पुराणिक ,माधवबाग मुंबई ४.

(३) महाराष्ट्र पब्लिशिंग हौस, पुणें शहर.

(४) ए. पी. बापट,बुधवार पेठ, पुणें.

—(०)—

सर्व हक्क लेखकाधीन.

---

मुद्रक } धोंडो नारायण विद्वांस.
श्रीरामविजय प्रेस, मुजुमदारांचा वाडा,
रावपुरा,—बडोदें.

श्री.

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत सरकार महाराज सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादुर जी. सी. एस. आय, जी. सी. आय्. ई., एलेल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजांतून श्रीसयाजी बालज्ञानमालेंतून विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार **शाक्यमुनि गौतम** या नांवाचें चरित्र प्रो चिंतामण विनायक जोशी यांजकडून तयार करविलें असून तें उक्त मालेंतील १२२ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| भाषांतर शाखा.<br>प्राच्य विद्यामंदिर.<br>बडोदें. १-६-३५. | म. रं. मजमुदार.<br>भाषांतर मदतनीस. | भा. का. भाटे.<br>राज्य विद्याधिकारी.<br>बडोदें. |

# प्रस्तावना.

हें छोटेसें पुस्तक मुलांकरतां त्यांना समजेल अशा सोप्या पद्धतीनें तयार करण्यांत आलें आहे बौद्धधर्मांतील तत्त्वें संग्राहित केलीं तर तीं मुलांना अतिशय अवघड वाटतील या भयानें बौद्धधर्माची माहिती थोडीशीच दिली आहे. पुस्तक लिहिण्याचें कामीं माझे मित्र रा. श्रीपाद शं. पट्टणकर ह्यांची फार मदत झाली ह्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. दुसऱ्या मित्रांनीं नांव प्रसिद्ध करण्यास हरकत घेतल्यानें त्यांचे आभार नामनिर्देशाशिवाय मानितों.

प्रस्तुतचें पुस्तक 'श्रीसयाजी बालज्ञानमाले' मध्यें समाविष्ट करून त्याच्या प्रकाशनाचा मार्ग सुलभ करून दिल्याबद्दल विद्याधिकारी महाशयांचे त्याचप्रमाणें मुंबईच्या बुद्ध सोसायटीचे चिटणीस प्रो. ना. के भागवत यांनीं चित्रांचे ठोकळे वापरण्यास देऊन पुस्तक शोभिवंत करण्यास साह्य दिल्याबद्दल त्यांचे उपकार रुजू आहेत.

उद्धवभुवन, दांडियाबाजार,
बडोदें. ता. १–६–३५

चिंतामण विनायक जोशी.

# अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

| | | |
|---|---|---|
| १ | मायादेवीचे स्वप्न. .... .... .... | १ |
| २ | गौतमबुद्धाचा जन्म.... .... ... | ८ |
| ३ | ब्राह्मणांचें भविष्य. .... .... .... | १४ |
| ४ | चार पूर्वनिमित्तें. .... .... .... | २० |
| ५ | महाभिनिष्क्रमण .... .... .... | २३ |
| ६ | तपश्चर्येला प्रारंभ .... .... .... | ३९ |
| ७ | माराशीं युद्ध व ज्ञानप्राप्ति. .... .... | ४६ |
| ८ | धर्मचक्रप्रवर्तन .... .... .... | ५३ |
| ९ | धर्माचा प्रसार .... .... .... | ५९ |
| १० | वडिलांचें बोलावणें .... .... .... | ६६ |
| ११ | कपिलवस्तूला भेट .... .... .... | ७० |
| १२ | अनाथपिंडिक शेटी.... .... .... | ७७ |
| १३ | बुद्धाचें परिनिर्वाण..... .... .... | ८२ |
| १४ | बौद्धधर्माबद्दल थोडी माहिती .... .... | ८८ |
| १५ | परिशिष्टें. .... .... .... | ९५ |
| | १ सासऱ्यानें आई म्हटले—विशाखा .... | १ |
| | २ निवडक शिष्यांचीं चरित्रें .... | ७ |
| | ३ बुद्धाच्या परिचयाचे राजे .... | २६ |

# जातकांतील निवडक गोष्टी.

## प्रथमार्ध

बौद्धधर्म, तत्त्वज्ञान व इतिहास यांच्या अभ्यासास प्रारंभ करण्यास जातक कथांची अवश्यकता फार मोठी आहे वर नांव दिलेल्या ३५० पृष्ठच्या पुस्तकांत प्रो. चिंतामण विनायक जोशी यांनीं निवडक जातकांचीं संपूर्ण व शब्दश भाषांतरें दिलीं असून योग्य स्थळीं ऐतिहासिक, व्युत्पत्तिविषयक, व लोकाख्यायिक तुलनात्मक टिपा दिलेल्या आहेत. जातकाच्या इंग्रजी भाषांतरापेक्षां हें भाषांतर अधिक विश्वसनीय झालें आहे. शाक्यमुनि गौतम ज्यांना आवडला असेल त्यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें. मुंबई इलाख्याच्या शाळाखात्यानें शिक्षकांच्या वाचनालयाकरितां, आणि वऱ्हाडमध्यप्रांत शाळाखात्यानें विद्यार्थ्यांस बक्षीस देण्याकरितां हें मंजूर केलें आहे. डे. व्ह. ट्रा. सोसायटी, पुणें व ग्रंथोत्तेजक मंडळी, इंदूर यांनीं यास बक्षिसें दिलीं आहेत व श्री सयाजी साहित्यमालेनें हें प्रसिद्ध केलें आहे. किं. १॥। रु टपालखर्च ४ आणे. आपल्या नेहमीच्या पुस्तकविक्रेत्याकडे न मिळाल्यास दांडिया बाजार, बडोदें, या पत्त्यावर लेखकाकडून मागवा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ....... नं. .......
ता. ..............
ठाणे.



भगवान् बुद्ध.

चरित्र
ता. २१/८/३२
डा. क्र.
ग्रंथ संग्रहालय
क्रं नं. ७२५
ग्रंथ संग्रहालय
५२६९

श्री.

# शाक्यमुनि गौतम.

## १

### मायावतीचें स्वप्न.

कपिलवस्तु हें एक राजधानीचें शहर. तें सुंदर असणारच. त्यांतून आज त्या शहरांत एक मोठा उत्सव होत होता. त्यामुळें शहराच्या सुंदरतेंत आणखी भर पडली होती. हा उत्सव चांगला आठ दिवस चालून आषाढी पौर्णिमेला संपणार होता. या उत्सवाला ‘ आषाढी नक्षत्राचा उत्सव ’ किंवा ‘ मधु उत्सव ’ असें म्हणत.

कपिलवस्तूंतील सर्व लोक सुखवस्तु होते. दुःखी-कष्टी कुणीच नव्हतें. प्रजेला नेहमीं सुखांत ठेवील असाच तिथला राजा होता. त्याचें नांव शुद्धोदन.

तो आचरणानें शुद्ध होता व प्रजेविषयीं त्याच्या मनांत शुद्ध प्रेम वास करीत होतें. साहजिकच त्याची सर्व प्रजा आनंदांत होती. त्यांत ही उत्सवाची पर्वणी आलेली ! म्हणून आज लोकांच्या आनंदाला पारावार नव्हता !

शहरांत जर असा जिकडे तिकडे आनंदीआनंद होत होता तर राजवाड्यांतील आनंदाचा थाट काय असेल याची कल्पनाच करावी. आधींच राजवाड्यांतील लोक देखणे व सुंदर अलंकारांनीं नटलेले. त्यांत उत्सवाच्या थाटामाटाची भर पडलेली. मग तिथली शोभा काय विचारतां ? एकाद्याला वाटलें असतें कीं हा काय राजवाडा आहे कीं स्वर्गच आहे ?

पण छेः, स्वर्गापेक्षां तो राजवाडा अधिक सुंदर होता व अधिक शुद्धहि होता. शुद्धोदनाची राणी मायावती इच्यापुढें स्वर्गांतल्या अप्सराच काय पण इंद्राची इंद्राणीदेखील तुच्छ होती.

इतकी मायावती सुंदर व तेजःपुंज होती. आणि स्वर्गांत अष्टौप्रहर जें सुरापान ( दारू पिणें ) चालतें त्याचा ह्या राजवाड्यांत मागमूसहि नव्हता. उत्सवाच्या आठी दिवसांत राणी मायावती दारूच्या थेंबालाहि शिवत नसे. तिचें उदाहरण पाहून राजवाड्यांतील व सर्व राज्यांतील लोकसुद्धां दारूपासून दूर रहात.

उत्सवाचे सहा दिवस मोठ्या आनंदांत गेले. आज सातवा दिवस. राणी मायावती आज पहांटेसच उठली. सुगंधित पाण्यानें तिनें मंगलस्नान केलें. अंगाला उटी

लावून सुवासिक पुष्पांच्या माळा तिनें धारण केल्या. नंतर धर्माचरण म्हणून चार लक्ष कार्षापण तिनें सत्पात्रीं दान केले. हें महादान दिल्यावर उंची उंची दागिने तिनें अंगावर घातले. तेव्हां तिचें सौंदर्य फारच खुलून दिसूं लागलें. उत्तम दान केल्यामुळें तिचें मन व चर्या फार प्रसन्न झाली होती

अशा प्रकारें जनांची, मनाची व देहाची प्रसन्नता संपादन केल्यावर राणीनें भोजन केलें. उत्सवाच्या दिवसांत रोज एकच वेळ जेवण्याचा तिनें नियम केला होता. जेवतांना अगदीं साधे पण रुचकर असे पदार्थ ती बेताबातानें खात असे. असा तिचा आहार सात्विक होता.

आहाराप्रमाणें विहारदेखील ती सात्विकच ठेवी. खोटें न बोलणें, हत्या न करणें, मादक पदार्थांचें सेवन न करणें, मनाची चलबिचल उडेल असें गाण्याबजावण्यासारखे विलास न करणें, नित्य धर्मचिंतन करणें, असा तिचा वर्तनक्रम असे उत्सवांत देखील ती एकाद्या व्रतस्थाप्रमाणें पण आनंदानें वागत असे. उत्सव म्हणजे खाण्या–वागण्याचा बेछूटपणा असें राणीला वाटत नव्हतें.

दिवसाचा वेळ अशा रितीनें आनंददायक पुण्यकर्मांत

घालवून राणी मायावती रात्रीं गाढ झोंपीं गेली असतां तिला पुढीलप्रमाणें स्वप्न पडलें:—

चार दिशांच्या चार रक्षक देवांनीं राणीला तिच्या शयनासह अलगत उचलून हिमालय पर्वतावर नेलें. तेथें एका साठ योजनें विस्तीर्ण अशा मैदानावर एक सात योजनें उंच असलेला शालवृक्ष होता त्याच्याखालीं देवांनीं तिला ठेवलें. लगेच देवांच्या चौघी स्त्रिया तिथें आल्या व त्यांनीं राणीला हळूंच जागी करून जवळच्याच अनवतप्त नांवाच्या सुखकर सरोवरावर स्नानाकरतां नेलें. तिथें दुसरें कोणी नव्हतें राणीला त्या देवतांनीं मंगलस्नान घातलें, दिव्य वस्त्रें नेसविलीं, अंगाला उटी लावली व रुप्याच्या टेंकडीवर सोन्याचें विमान होतें त्यांतल्या मऊ पलंगावर राणीला निजविलें निजल्यावर तिला असें दिसलें कीं एक पांढरा शुभ्र हत्ती शेजारच्या सोन्याच्या टेंकडीवरून उतरून राणीचें विमान होतें त्या रुप्याच्या टेंकडीवर चढला. उत्तर दिशेनें येऊन त्यानें सोन्याच्या विमानांत प्रवेश केला. आंत येतांना त्यानें आपली रुप्यासारखी पांढरी सोंड उंच केली होती व त्यांत एक पांढरेंच कमळ

धरलें होतें त्या उंच सोंडेमुळें हत्तीची आकृती मोठी मनोहर दिसत होती. शिवाय विमानांत येतांच त्यानें मोठा मधुर असा आवाज केला. त्यामुळें राणीचें मन फार प्रसन्न झालें. अशा रितीनें आंत आल्यावर हत्तीनें राणीच्या पलंगाला तीन प्रदक्षिणा घातल्या. मग राणीच्या समोर उभा राहून, लहानगें रूप घेऊन, तो हत्ती राणीच्या उजव्या कुशींतून आंत तिच्या उदरांत प्रविष्ट झाला.

हें स्वप्न पाहतांना व पाहून झाल्यावर मायावतीला फार आनंद वाटला. सकाळीं उठतांक्षणींच राजा शुद्धोदनाला तिनें सर्व स्वप्न मोठ्या उल्हासानें सांगितलें. तें ऐकून राजा देखील आनंदित झाला. स्वप्न मोठें शुभकारक आहे असें राजाला वाटलें. स्वप्नाचा खुलासेवार अर्थ समजून घ्यावा म्हणून त्यानें चौसष्ट विद्वान ब्राम्हणांना राजवाड्यांत बोलावलें.

ब्राम्हण येतांच राजानें सामोरे जाऊन त्यांचा योग्य आदरसत्कार केला. कोंवळी कोंवळीं पानें व लाह्या पसरून मंगलदायक केलेल्या भूमीवर मौल्यवान आसनें घातलीं. त्यांवर आदरानें ब्राम्हणांना राजानें बसविलें. दहीं, मध व साखर ज्याच्यावर घातलीं आहेत असा

उत्कृष्ट भात चांदीसोन्याच्या भांड्यांतून त्यांच्यापुढें ठेवला. मग राजा स्वतः एका साध्या आसनावर बसला. नंतर राणीला पडलेलें स्वप्न त्यानें ब्राम्हणांना सविस्तर सांगितलें व 'या स्वप्नाचा अर्थ काय ?' असा त्यांना प्रश्न केला.

ब्राम्हण म्हणाले, 'राजन्, चिंतेचें कांहीं कारण नाहीं. राणीच्या उदरांत गर्भ राहिला आहे असें हें स्वप्न सुचावितें. गर्भ पुत्राचा आहे, कन्येचा नाहीं तुम्हांला आतां पुत्रलाभ होणार आहे. हा पुत्र तुझ्या कुलाची कीर्ति वाढविणारा होईल. तो संसारांत राहिला तर चक्रवर्ती राजा होईल व संसार सोडून भिक्षु झाला तर मोठा ज्ञानी होऊन लोकांचेंहि अज्ञान दूर करणारा असा उपदेशक होईल.'

ब्राम्हणांच्या मुखांतून आपल्या स्वप्नाचा वरील खुलासा ऐकून राणी मायावतीला मोठा हर्ष झाला. पुत्र होणार आणि तोहि कीर्तिवंत पुत्र होणार म्हणून तिला आनंद झाला तिचें हें पहिलेंच मूल. मग तिला कां बरें संतोष वाटणार नाहीं ? राणीइतकेंच समाधान राजालाहि वाटलें. हा पुत्र कुलाची कीर्ति वाढविणारा होणार आणि चक्रवर्ती राजा होणार असें ऐकतांच राजाचें मन प्रफुल्ल

झालें. राजवाड्यांत व शहरांत हें वर्तमान लवकरच सर्वांना कळलें व सर्वांना आल्हाद वाटला. उत्सवाचा शेवटचा म्हणजे आठवा दिवस अशा रितीनें सर्वांना सुखकर गेला. राणी मायावतीला होणारा पुत्र तोच आपला चरित्रनायक—भगवान् गौतमबुद्ध.



## २

## गौतमबुद्धाचा जन्म.

'गर्भ पुत्राचा आहे, कन्येचा नाहीं' हें ब्राम्हणांचें वाक्य ऐकल्या दिवसापासून राणी मायावतीच्या तोंडावर एक विशेष तेज विलसूं लागलें. दिवसेंदिवस राणीचें सौंदर्य व प्रसन्नता वाढूं लागली. राणी मूळचीच मोठी शांत व सुज्ञ होती आणि आतां तर ती फारच शांतपणानें व सुज्ञपणानें वागूं लागली. कारण तिच्यावर आतां दोन जिवांची जबाबदारी होती. एक तिचा स्वतःचा जीव व दुसरा तिच्या गर्भाचा तरी पण राणीला त्रासिकपणा कसा तो माहित नव्हता. ती आपली नेहमीं आनंदीच असे.

सृष्टिनियमांप्रमाणें राणीला डोहाळे लागले. ते पुरवितांना राजाला मुळींच त्रास पडला नाहीं. किंबहुना तिच्या इच्छा मुळीं अशाच असत कीं त्या पूर्ण करतांना राजाला उलट आनंद वाटे उदाहरणार्थ, राणीला वाटे कीं, अनाथ-अपंगांना अन्नवस्त्र द्यावें, दुःखी-कष्टी प्राण्यांवर दया करावी, चुकणारांस गोड शब्दांनीं वाटेवर आणावें, बंदीशाळेंतले बंदी सोडून द्यावे इत्यादि. असें कांहीं करण्यास राणीनें सांगितलें म्हणजे तें करण्यांत



सिद्धार्थ व मायावती.

राजाला मोठे भूषणच वाटें आणि त्यानंतर राणीला होणारा आनंद पाहून राजाला धन्यता वाटे.

राजवाड्यांतील या आनंदमय वातावरणाचा परिणाम सर्व राज्यावर झाला. "यथा राजा तथा प्रजा". सर्व लोकच काय पण पशुपक्षी देखील आनंदांत गात बागडत होते. आपण आनंदांत असलों कीं सभोंवारचें जगहि आपल्याला आनंदीच दिसतें. त्यामुळें त्या वेळेला नद्या, डोंगर झाडें, इत्यादि सर्व वस्तू लोकांना सुखकरच वाटल्या. सर्व सृष्टींतला हा आनंदीआनंद मोजण्याचें माप म्हणजे त्याकाळचीं 'शुभ चिन्हें'. आनंदाच्या वेळीं सगळीकडे 'शुभ चिन्हें' होऊं लागतात. कारागारांतल्या अपराध्यांची सुटका होणें हें एक 'शुभ चिन्ह' समजत. तें मायावतीनें घडवून आणल्याचें आपण वर वाचलेंच. आणखी एकतीस शुभ चिन्हें अशाच प्रकारचीं त्या वेळीं झालीं म्हणतात.

गर्भारपणीं पुष्कळ बायकांना त्रास होतो. परंतु राणी मायावतीची राहाणी पहिल्यापासून साधी, शुद्ध व मोकळी असल्यानें तिला काडीभर देखील त्रास झाला नाहीं. तें पाहून कुणाला वाटेल कीं तिचें व तिच्या

गर्भाचें रक्षण जणूं काय साक्षात् देवच करीत आहेत ! अशा प्रकारें निकोप प्रकृतीमुळें व मनाच्या प्रसन्नतेमुळें मायावतीला गर्भारपण सुखाचें गेलें.

बाळंतपणाकरितां माहेरीं मायेच्या माणसांजवळ जावें असें बायकांना नेहमीं वाटतेंच. त्यांतून साधारणपणें नऊ महिन्यांनीं राणी बाळंत व्हायची पण आतां तिला दहावा महिनादेखील संपत आला होता. त्यामुळें तिला थोडी काळजी वाटूं लागली होती अशा कारणांमुळें स्वतःला माहेरीं पाठविण्याबद्दल तिनें राजाजवळ गोष्ट काढली. राजानें ती तात्काळ मान्य केली. मायावतीचें माहेर म्हणजे देवदह नगर. हें कपिलवस्तूपासून लांब होतें व मधली वाट बरीच कठिण होती. म्हणून राजानें ताबडतोब रस्ता चांगला करण्याकरतां शेंकडों लोक पाठविले. प्रवासाला सुखकर असा रस्ता झाल्यावर त्याच्यावर केळीच्या झाडाच्या कमानी उभ्या केल्या. पाण्यानें भरलेले कलश जागोजाग ठेवले. रस्ता शोभिवंत दिसून प्रवासाचा शीण वाटूं नये म्हणून दोन्ही बाजूला ध्वजापताका लावल्या. मग राजानें एका सोन्याच्या पालखींत राणीला बसवून तिच्या बरोबर मोठा लवाजमाहि दिला. नुसती तिची पालखी उचलायलाच एक सहस्र

ता. २१।८।३५
डा. जें.



लोक होते. त्यामुळें राणीला रस्त्यानें हिसके बसणें वगैरे कोणताच त्रास झाला नाहीं. मोठ्या सुखानें व थाटानें ती माहेरीं जाण्यास निघाली.

कपिलवस्तू व देवदह या दोन राज्यांच्या सीमेवर लुंबिनी नांवाचें एक सुंदर उद्यान होतें. तें दोन्हीकडच्या लोकांना वापरतां येत असें. त्या उद्यानांतले शालवृक्ष फार सुंदर म्हणून प्रसिद्ध होते. शिवाय, यावेळीं तिथल्या सर्व झाडांना फळां-फुलांचा बहर आलेला होता त्यांच्या लोभानें चित्रविचित्र रंगांचे पक्षी व भ्रमर त्या उपवनांत आले होते आणि त्यांच्या गोड आवाजांमुळें असें वाटें कीं सगळ्या उद्यानभर जणूं मंजुळ मंगलवाद्येंच वाजत आहेत

लुंबिनी वनाचें हें सौंदर्य राणील दिसतांच तिला त्या उपवनांत हिंडून यावेसें वाटलें. पालखींतून खालीं उतरून तिनें आपल्याबरोबर कांही स्त्रिया घेतल्या व उद्या-नाची शोभा पहात ती हिंडूं लागली. फिरतां फिरतां ज्या शालवृक्षांकरतां तें उपवन प्रसिद्ध होतें त्या शालवृक्षांजवळ राणी आली. कौतुकानें त्या वृक्षांचें सौंदर्य ती न्याहाळूं लागली. तिच्या दोन्ही बाजूला त्या वृक्षांच्या डौलदार रांगा होत्या त्यांत मुख्य स्थानीं राजाप्रमाणें शोभणाऱ्या

शालवृक्षानजीक राणी येऊन थांबली. त्याची एक फांदी बरीच खालीं आली होती. ती हातांत धरावी असें राणीला वाटलें. म्हणून तिनें पायांच्या चवड्यावर उभें राहून दोन्ही हात उंच करून त्या फांदीला हात लावले. तिनें ती फांदी हातांत धरली मात्र, तोंच (त्या श्रमांमुळे कीं काय) तिच्या पोटांत दुखूं लागून ती तिथेंच बाळंत होण्याची वेळ आली

तिच्या बरोबरच्या स्त्रियांनीं तावडतोब पडदे लावून आडोसा केला. राणीला खालीं बसतां देखील येत नव्हतें म्हणून ज्या अधिक हुषार बाया होत्या त्या चटकन् देवदूताप्रमाणें वेळेवर पुढें झाल्या व जन्मणारें बालक त्यांनीं खालीं जमीनीवर आपटूं दिलें नाहीं. तें वरचेवर एका जाळीदार कपड्यांत त्यांनीं घेतलें. बाकीच्या बायकांनीं बाळबाळंतिणीची शक्य ती सोय तिथें केली व राणीचें कांहीं एक काम अडूं दिलें नाहीं.

राणीनें जेव्हां मुलाकडे पाहिलें तेव्हां मखमलीवर ठेवलेलें रत्न जसें शोभिवंत दिसतें तसें तें बालक तेजःपुंज दिसत होतें. त्याच्याकडे पाहतांच राणीला फार धन्यता वाटली. बरोबरच्या स्त्रियांनाहि मुलाचें मोठें कौतुक वाटलें व प्रसंगावधानाबद्दल त्या एकमेकींची स्तुति करूं लागल्या.

वेळ मोठी बिकट आली होती पण त्यांतूनहि दोन जीवांची सुखरूप सुटका झाली म्हणून सर्वत्रांना आनंद झाला.

वाचक, आपला चरित्रनायक असलेलें हेंच तें बालक. साधारण मुलांच्याहून तें वेगळ्याच तऱ्हेनें जन्माला आलें. याचा जन्म जसा असाधारण तसें याचें पुढचें कार्यहि असाधारणच होतें. पण तेंहि त्यानें करून दाखविलें म्हणून त्याची कीर्ति अजून कायम आहे. या पुढच्या कार्यांत त्याचे जे सहाजण साह्यकारी होते तेहि याच वेळीं निरनिराळ्या ठिकाणीं जन्मास आले. गौतमबुद्ध धरून हे सातजण ते एकाच वेळीं जन्मले म्हणून त्यांना ' सहजात ' असें म्हणतात त्यांचीं नांवें अशीं:—(१) गौतमबुद्ध स्वतः (२) यशोधरा—गौतमबुद्धाची पत्नी (३) छन्न—गौतमाचा सारथी (४) काळुदायी—गौतमाचा बालमित्र (५) कंथक—गौतमाचा आवडता घोडा (६) बोधी वृक्ष—ज्याच्या खालीं तप करून गौतमाला ज्ञान झालें तें पिंपळाचें झाड आणि (७) ज्यांची लांबी १ ते ४ कोस होती अशा द्रव्यानें भरलेल्या चार पेट्या.

## ३

## ब्राह्मणांचें भविष्य.

वाटेंतल्या लुंबिनी वनांतच राणी मायावती बाळंत झाली ही बातमी लवकरच तिच्या माहेरीं देवदह नगरांत व इकडे शुद्धोदनाला समजली. दोहींकडचे लोक त्या वनांत आले. राणीची इच्छा कपिलवस्तूसच परत यावें अशी होती म्हणून सर्व मंडळीं कपिलवस्तूला येऊन पोंचलीं.

पुत्रजन्मानिमित्त राजानें जिकडेतिकडे आनंदीआनद करून टाकला. प्रवासांत प्रसूती होणें म्हणजे मोठें संकटच. त्यांतून सुटून राणी व मूल दोघें सुखरूप हातीं लागलीं म्हणून राजाला विशेष आनंद वाटला. पृथ्वीवरहि जिकडे-तिकडे शुभसूचक चिन्हें होऊं लागलीं. तो अपूर्व प्रकार पाहून कालदेवल नांवाच्या एका तपस्व्यास आश्चर्य वाटलें. ह्या शुभ गोष्टींचें कारण काय याचा शोध करीत करीत तो कपिलवस्तूस आला. राजवाड्यांत येऊन त्यानें नव्या बाल-काचें दर्शन घेण्याची आपली इच्छा राजाला सांगितली. कालदेवलाची योग्यता राजा जाणत होता म्हणून त्यानें इच्छा दर्शवितांच राजानें मुलांस तात्काळ बाहेर आणविलें.

मुलाकडे पाहून कालदेवलाला आनंद झाला व त्याच्या तोंडावर हास्य चमकूं लागलें पण तें किती ? एक क्षणभरच. दुसऱ्या क्षणीं कालदेवलांस रडूं कोसळलें ! ह्या हंसण्यारडण्याचें राजाला नवल वाटलें व त्यानें कालदेवलाला विचारलें 'भगवन्, आधीं किंचित हंसून आतां हें असें लगेच रडण्याचें कारण काय ?' कालदेवल म्हणाला ' राजा, माझें वर्तन थोडेंसें चमत्कारिक झालें खरें. पण त्याचें कारण मी तुला सांगतों. या महापुरुषाचें बालस्वरूप तरी मला दिसूं शकलें म्हणून मी आधीं आनंदित झालों. परंतु याचें संपूर्ण वाढलेलें, 'बुद्ध' झालेलें, स्वरूप दिसण्यापूर्वींच माझे डोळे मिटणार म्हणून मोठें दुःख वाटून मी रडलों. राजा, मी आतां अगदीं पिकलें पान झालों आहे. तूं खरा भाग्यवान् आहेस. हा तुझा पुत्र मोठा महात्मा झालेला तूं पहाशील. '

नंतर राजाचा निरोप घेऊन कालदेवल आपल्या बहिणीच्या घरीं गेला व तिचा मुलगा नालक याला बुद्धाच्या जन्माची बातमी त्यानें कळविली. कालदेवल म्हणाला 'नालका, बुद्धाच्या पदवीला पोंचायला या बालकाला अजून पस्तीस वर्षें अवकाश आहे. तेवढा वेळ मी कसचा जगतों ? तुला मात्र बुद्धदर्शन खात्रीनें होईल व तें तूं अवश्य घे.

पण त्या दर्शनाची पूर्वतयारी म्हणून तुला आजच संसार सोडून तपश्चर्येस लागलें पाहिजे. एरवीं बुद्धाला ओळखणें अशक्य. सज्जन ओळखणें व त्याचा समागम घडणें फुकाचें नाहीं. म्हणून तुला तप आचरण्यांस मी सांगतों.' कालदेवलाला नालक व त्याचे आईबाप फार मान देत म्हणून नालकानें कालदेवलाचें म्हणणें तात्काळ मान्य केलें व घरदार सोडून नालक तपश्चर्येस निघून गेला.

इकडे राजवाड्यांत पांचव्या दिवशीं नूतन बालकाचें जातक वर्तविण्याचें राजानें ठरविलें. जातक वर्तविणें म्हणजे मुलाची पत्रिका तयार करवून एकंदर ग्रहमान कसें काय आहे तें पहावयाचें. बालकाला त्या दिवशीं न्हाऊं घातलें. उत्तम प्रकारच्या सुगंधांनीं राजवाडा नुसता भरून टाकला. पुष्प—पल्लवांनीं वाडा शोभिवंत केला उत्कृष्ट असें पायस अन्नहि तयार केलें. नंतर तिन्ही वेदांत पारंगत असे एकशेंआठ ब्राम्हण राजानें वाड्यांत बोलाविले, त्यांचा योग्य आदरसत्कार केला व पायस अन्नाचें त्यांना भोजन घालून संतुष्ट केले. मग मुलाचें जातक वर्तविण्याची त्यांना विनंती केली.

पूर्वी राणीच्या स्वप्नाचा अर्थ ज्यांनीं सांगितला होता ते आठ ब्राम्हण ह्या एकशेंआठ ब्राम्हणांत होतेच. त्या-



असित देवल हा सिद्धार्थाचें दर्शन घेतो.

नं. ... ता. ...



पकीं सातजणांनीं मागच्या स्वप्नाच्या अर्थाशीं जुळतें असेंच जातक या वेळींहि वर्तविलें. तें असें कीं 'मुलगा संसारांत राहिला तर चक्रवर्ति राजा होईल व संसारांत राहिला नाहीं तर मोठा ज्ञानी व धर्मोपदेशक होईल'. असें दोन अर्थाचें भविष्य या सातजणांनीं सांगितलें. पण आठवा कौंडण्य नांवाचा ब्राम्हण वयानें सर्वांत लहान होता. तो म्हणाला, 'राजा, असे दोन अर्थाचें भविष्य काय कामाचें ? आणि असें संशयात्मक जातक हवें कशाला ? या बालकाची चिन्हें व ग्रह एकच गोष्ट अगदीं स्पष्ट व बिनचूक दाखवित आहेत. दुटप्पी भाषेचें प्रयोजन नाहीं. मी अगदीं निश्चित सांगतों कीं हा मुलगा महाज्ञानी होऊन लोकांचीं पापें व अज्ञान यांचाच नाश करील. हा धर्मप्रवर्तकच होईल. चक्रवर्ति राजा होईल असें याचें लक्षण मला दिसत नाहीं. म्हणजे हा संसाराचा त्याग करील; घरादारांला, तुम्हां सर्व आप्तेष्टांना सोडून तपश्चर्येला जाईल ही गोष्ट, राजा, तूं आज नक्कीच समज. हें भविष्य तुला आवडणार नाहीं हें खरें. पण सत्य गोष्ट आम्ही सांगितलीच पाहिजे. तूं मोठा विचारी आहेस. विवेकानें पहाशील तर मुलगा तपस्वी व धर्मोपदेशक होण्यांतच तुझें, तुझ्या कुलाचें किंबहुना सर्व

जगताचें अधिक हित आहे.'

कौंडण्याचें म्हणणें बाकीच्या सात ब्राम्हणांनाहि पटलें. ते वृद्ध होते. त्यांना वाटलें कीं हा राजपुत्र पुढें जो धर्मोपदेश करणार तो ऐकायला आपण तर नसणारच, पण तो नूतन धर्म आपल्या मुलांनीं तरी स्वीकारावा. त्याप्रमाणें सातांपैकीं चौघांच्या मुलांनीं आपली तयारी दर्शविली व ते नालकाप्रमाणें तपश्चर्येलाहि निघाले. कौंडण्यसुद्धां निघाला. या पांच जणांना 'पंचवर्गीय स्थविर' म्हणजे 'पांच वडील माणसें' असें म्हणतात. ते पुढें बुद्धधर्मी झाले व त्या धर्माच्या प्रसारालाहि त्यांनी फार मदत केली.

कौंडण्याच्या तोंडून मुलाचें भविष्य ऐकल्यावर राजा शुद्धोदन व राणी मायावती थोडीं उदासच झालीं. मोठा झाल्यावर मुलगा आपल्याला सोडून जाणार ह्या कल्पनेचें त्यांना साहजिकच दुःख वाटलें. बायकांच्या मनाला अशा गोष्टी फार लागतात मुलानें संसार थाटून सुखांत नांदावें असें चार बायकांना वाटतें तसें मायावतीलाहि वाटत होतें. मुलानें पराक्रमी होऊन घराण्याची संपत्ति व कीर्ति वाढवावी असें बापाला वाटत असतेंच. शुद्धोदनालाहि तसेंच वाटत होतें. पण भवितव्यता कांहीं निराळी आहे असें

त्या दोघांना आज कळलें. राणीला तर तेव्हां धक्काच बसला. आधींच ती क्षीण झालेली. त्यांत या धक्क्यानें कांहीं कमीजास्ती होतें कीं काय अशी राजाला धास्ती वाटली. म्हणून त्यानें मोठ्या धैर्यानें स्वतःला वाटणारें दुःख गिळून टाकून राणीचें मन प्रसन्न करण्याची तत्परता दाखविली. 'आपली फारां दिवसाची मनीषा पुत्र व्हावा अशी होती ती तर आज पूर्ण झाली ना ? देवानें हा दिवस दाखविला त्याचाच आपण आनंद मानायला हवा. पुढचें कुणी पाहिलंय', इत्यादि सांगून राजानें राणीची समजूत केली.

पांचव्याच दिवशीं मुलाचें नांव ठेवण्याचा समारंभ झाला. 'पुत्र व्हावा' ही राजाची व मायावतीची मनीषा —हा मनांतला 'अर्थ' आतां प्रत्यक्ष सिद्ध झाला म्हणून त्यांनीं 'सिद्धार्थ' असें मुलाचें नांव ठेविलें.

सिद्धार्थ आतां आपल्या इच्छेप्रमाणें संसारांत राहून चक्रवर्ति राजा होतो कीं कौंडण्यानें म्हटल्याप्रमाणें खरोखर आपल्याला सोडून जातो अशी चिंता राजाला व मायावतीला वाटूं लागली. जवळ कोणी नाहीं असें पाहून डोळ्यांत आंसवें आणून, उसासे टाकीत, मायावती मनाशीं म्हणे 'बाळ, तूं खरंच अरण्यांत जाणार काय ?' वेडी माया !

## ४

# चार पूर्वनिमित्तें

मुलाचें नांव ठेवून आज दोनच दिवस झाले होते. पण वाड्यांत आज आनंद कुठें औषधलाहि दिसत नव्हता. कुठून दिसणार ? आज मायावतीची प्रकृती फार चिंताजनक झाली होती. राज्यांतले मोठमोठाले वैद्य राजानें तांतडीनें बोलाविले होते. त्यांनीं कसोशीनें तिची प्रकृती तपासली होती—पण व्यर्थ. राणीच्या रोगावर त्यांना औषध दिसेना. राणी आतां तासां दोन तासांची सोबतीण आहे असें त्यांनीं राजाला कळविलें.—आणि तसेंच झालें. त्याच दिवशीं राणी मायावती वारली !

सिद्धार्थ अवघा सात दिवसांचा. त्या अर्भकाचें संगोपन आतां कोण करणार ? राजाला काळजी पडली. पण राजाची धाकटी राणी गौतमी ही सिद्धार्थाला सांभाळायला तयार झाली. ती मायावतीची सख्खी बहिणच होती. तिला अद्याप मूलबाळ झालें नव्हतें. मायावतीवर तिचें फार प्रेम होतें. म्हणून मायावतीच्या पश्चात् तिनें सिद्धार्थाचा सांभाळ स्वतःच्या मुलाप्रमाणेंच केला. गौत-

मीनें वाढविला म्हणून सिद्धार्थाला ह्यानंतर 'गौतम' हेंच नांव पडलें.

गौतम प्रकृतीनें जरा सुकुमारच होता. थंडीवाऱ्याची बाधा होऊं नये म्हणून त्याला लहानपणीं फार जपत. पावसाळ्यांत तर त्यानें मुळींच बाहेर पडूं नये अशी व्यवस्था राजानें केली होती. गौतमाकरतां राजानें तीन प्रकारचे तीन राजवाडे बांधून दिले होते. एक उन्हाळ्या-साठीं, एक पावसाळ्यासाठीं व एक हिंवाळ्यासाठीं. पहिला राजवाडा नऊ मजले उंच होता. बाकीचे दोन वाडे सात व पांच मजल्यांचे होते. या वाड्यांतल्या वाड्यांत सर्व खेळ खेळण्याची सोय होती. कमळांनीं शोभिवंत झालेले मोठाले सुंदर तलावसुद्धां या राजवाड्यांच्या आवारांत होते. गौतमाबरोबर खेळण्यासाठीं राजानें थोरामोठ्यांची खुप मुलें राजवाड्यांत ठेवलीं होतीं. हीं मुलें व हे वाडे यापलीकडचें जग गौतमास राजानें कळूंच दिलें नाहीं.

अंमळ मोठा झाल्यावर गौतमाचें शिक्षण सुरू झालें. धनुष्य-बाण, खड्ग, गदा वगैरे त्या काळचीं शस्त्रें वाप-रण्यांत गौतम कुशल झाला. घोड्यावर बसण्यांत त्याच्या-इतका पटाईत त्यावेळीं कुणीच नव्हता. मृगया करण्यांत सुद्धां तो लवकरच तयार झाला. शरसंधान तर गौतमानेंच

करावें असा त्याचा लौकिक होता.

वयाच्या एकुणविसाव्या वर्षीं गौतमाचें लग्न ठरविण्यांत आलें. यशोधरा नांवाची स्वरूपवान राजकन्या ही वधू निश्चित करण्यांत आली. गौतमानें स्वतःच यशोधरेला पसंत केलें होतें. त्याची पसंती राजाला, गौतमीला व राजपुरोहिताला अनुरूप वाटली. वयानें यशोधरा गौतमाच्या बरोबरीचीच होती. कारण मागच्या प्रकरणांत जे सातजण ' सहजात ' म्हणून सांगितलें आहेत त्यांत यशोधरचेंहि नांव आहे म्हणजे गौतम व यशोधरा एकाच दिवशीं जन्मलीं होतीं–दोघें सारख्याच वयाचीं होतीं असें ठरतें. गौतमाला जगांतलें दुःख म्हणून दिसूं द्यावयाचें नाहीं अशी राजाची इच्छा होती. तदनुसार सर्व सुखसोयींची तरतूद त्यानें राजवाड्यांत करून दिली. त्या योगानें गौतमाचा काळ मोठ्या आनंदांत जाऊं लागला.

पण लग्नानंतर कांहीं वर्षांनीं गौतमाच्या वृत्तींत फरक पडूं लागला. हा फरक पडण्यास मुख्यतः चार कारणें झालीं त्या चार कारणांना 'चार पूर्व निमित्तें' असें म्हणतात. तीं कारणें कोणतीं हें आपण क्रमाक्रमानें पाहूं

एकदां छन्न नांवाच्या आपल्या आवडत्या सारथ्याबरोबर गौतम बाहेर फिरावयास निघाला. वाटेंत त्याला

एक म्हातारा मनुष्य दिसला. म्हाताऱ्याचें सगळें अंग सुरकतून गेलें होतें-हातांत काठी होती तरी तो लट्लट् कांपत होता-त्याचें हात, पाय, कंबर हीं वांकलीं होतीं-त्याच्या तोंडांत एकदेखील दांत नव्हता-तो अगदीं कुरूप व केंविलवाणा दिसत होता. गौतमानें म्हातारा मनुष्य असा हा प्रथमच पाहिला. त्यानें छन्नाला रथ उभा करण्यास सांगितलें व तो त्या म्हाताऱ्याकडे लक्ष लावून पाहूं लागला. जरा वेळानें गौतमानें छन्नाला प्रश्न विचारण्यांस सुरवात केली.

गौतम—काय रे छन्ना, हा मनुष्य असा काय दिसतो आहे ? तुझ्या माझ्यासारखा हा दिसत नाहीं आणि बाबांसारखा पण दिसत नाहीं. कोण आहे रे हा ? मनुष्य तरी आहे ना ?

छन्न—होय, महाराज, हा मनुष्यच आहे. पण तो अतिशय म्हातारा आहे

गौतम—म्हातारा ? म्हातारा म्हणजे काय ?

छन्नानें म्हातारपणाचीं कांहीं लक्षणें सांगितलीं. त्या वेळेला गौतम सारखा त्या समोरच्या म्हाताऱ्याकडे पहात होता. छन्न सांगतो तसाच हा म्हातारा आहे अशी त्याची खात्री झाली. शेवटीं छन्न म्हणाला–' म्हातारा मनुष्य फार

दिवस टिकत नाहीं आणि प्रत्येकाला म्हातारपण हें ठरलेलें.' हें ऐकतांच गौतम एकदम चमकला.

तो म्हणाला-' छन्ना, म्हणतोस काय ? प्रत्येकजण म्हातारा होणार आणि नाश पावणार ? म्हणजे तुझे, माझे हे सुंदर देह पुढें असे ह्या म्हाताऱ्यासारखे होणार आणि अखेर-अखेर नाश पावणार ? खरं कां हें ?'

छन्न म्हणाला-महाराज, अगदी खरं. आपली सुद्धां पुढें अशीच दशा होणार.

गौतम म्हणाला-अशीच दशा होणार-अशीच दशा होणार ? काय दशा ही ! छे, छे, छन्ना, ही कल्पनाच मला करवत नाहीं. उत्तम वस्त्रालंकारांनीं देह सजवायचा, उत्तम अन्नानें पोसायचा आणि शेवटीं काय, तर ही दशा ?-ही अशी दशा ? छन्ना, बस् झालं फिरणं. रथ परत फिरव. कशांतच मला आज गोडी वाटत नाहीं'.

छन्नानें रथ परत राजवाड्यांत आणला. गौतम खालीं उतरला व सरळ आपल्या महालांत गेला. थोड्या वेळानें छन्नानें डोकावून पाहिलें तों गौतम उदासवाणा होऊन कसल्या तरी काळजींत चूर असलेला त्याला दिसला. त्यानें राजाला सर्व वर्तमान सांगितलें. राजाला वाटलें कीं

' गौतमाला जगांतलीं दुःखें दिसूं नयेत म्हणून इतके दिवस आपण जपलों. आणखी किती जपणार ? आज नाहीं उद्यां पण जग आणि गौतम यांचा सामना हा व्हायचाच. तो होईल तितका टाळावा, गौतमाला घरादाराचा उद्वेग वाटूं देऊं नये व त्यानें अरण्याची वाट धरूं नये म्हणून शक्य तितके प्रयत्न मीं आजवर केल व पुढेंहि करीन. याउपर प्रभुइच्छा ! ' राजानें गौतमाचें मन आनंदित करण्याचा प्रयत्न केला. वडिलांना त्रास वाटूं नये म्हणून गौतमानें पुनश्च पहिल्यासारखें हंसून-खेळून वागायला सुरवात केली.

दुसऱ्यांदा छन्न सारथ्याबरोबर गौतम फिरावयास गेला तेव्हां त्यान एक रोगी मनुष्य पाहिला. तो मनुष्य सारखा कण्हत होता-त्याला उठून बसण्याची शक्ति नव्हती-वस्त्राची शुद्ध नव्हती-त्याचे डोळे कांहीं चमत्कारिकच दिसत होते आणि त्याचा आवाज अगदीं क्षीण झाला होता. गौतमानें अर्थात् हा पहिलाच रोगी पाहिलेला. नवी गोष्ट म्हणून त्याच्याकडे नीट पाहून झाल्यावर गौतम छन्नाकडे वळला व त्यांचें पुढीलप्रमाणें संभाषण झालें:—

गौतम-छन्ना, हा मनुष्य कांहीं म्हातारा दिसत नाहीं.

हा असा कां दिसतो ? कोण आहे हा ? तो बघ, तो बघ, कसा चमत्कारिकच पाहतो आहे ! काय रे यानें केलें आहे ?

छन्न–युवराज, हा मनुष्य रोगी आहे–

गौतम (मध्येंच)–म्हातारा नाहींना ? म्हणजे, हा लवकर नाश नाहीं ना पावणार ?

छन्न–काय नेम सांगावा ! अशीं रोगी माणसें सुद्धां म्हाताऱ्या माणसाप्रमाणें....

गौतम (एकदम)—नाश पावतात ! अरेरे, गरीब बिचारा ! म्हातारे व रोगी सारखेच म्हणायचे ? पण रोगी म्हणजे काय रे छन्ना ?

छन्नानें रोग्याचें थोडेसें वर्णन केलें गौतमानें तें वर्णन समोरच्या रोगी माणसाला लावून पाहिलें. तो बरोबर तसाच होता. तरी गौतमाची एक शंका राहिलीच होती.

गौतम–छन्ना, प्रत्येकजण म्हातारा व्हायचा हें जसें ठरलेलें आहे तसें रोगाचेंहि आहे काय ?

छन्न–होय, ठरलेलेंच आहे. शरीर म्हटलें म्हणजे त्याला रोगाचें भय हें ठरलेलेंच.

गौतम–आणि कठीण रोग आला कीं ही अशी दुर्दशा ठरलेलीच आणि शेवटीं–शेवटीं नाशहि ठरलेलाच–होय ना ?

छन्न—होय.

गौतम पुन्हा उदास झाला. तो राजवाड्यांत गेला. राजानें मोठ्या मेहेनतीनें त्याला थोडा हंसता–खेळता केला. पण राजाची काळजी व गौतमाची उदासीनता दिवसेंदिवस वाढतच चालली.

तिसऱ्या खेपेस असाच फिरत असतां गौतमाला एक माणसांचा घोळका व एक चिता दिसली.

गौतमानें विचारलें—हे लोक इथे जमून काय करीत आहेत, छन्ना ? कांहीं उत्सवबित्सव आहे ?

छन्न म्हणाला–छे, उत्सव नाहीं. एक मनुष्य मेलेला–

गौतमानें मधेंच विचारलें—मेलेला ? मेलेला म्हणजे काय ? या जगांत खूप प्रकारचीं माणसें दिसतात रे. कुणी म्हातारा, कुणी रोगी, कुणी मेलेला—बघूं तरी कसा असतो हा मेलेला मनुष्य. घे रथ तिकडे. घे कीं. मला एकदां पहायचाच आहे.

नाइलाजानें छन्नानें रथ तिकडे नेला. गौतमानें तो

मनुष्य पाहिला. पण त्याला कांहीं सगळा उलगडा झाला नाहीं.

त्यानें विचारलें—मेलेला म्हणजे काय ? झोंपलेला ? हा तर मला झोंपीं गेल्यासारखा व एकादें वाइट स्वप्न पाहात असल्यासारखा दिसतो. यशोधरेची दासी एकदां अशीच झोंपीं गेलेली आणि झोंपेंत वेडेवांकडें तोंड करतांना मीं पाहिली होती, तसंच यालाहि झाल आहे ना? मेलेला म्हणजे झोंपीं गेलेलाच ना?

छन्न म्हणाला—थोडेसें तसेंच खरें. पण झोंपलेला मनुष्य पुन्हां उठतो आणि हा कध्धीं उठावयाचा नाहीं.

गौतम म्हणाला-कध्धीं नाहीं? मग याची बायका-पोरें, आईबाप, इष्टमित्र, हे याला कसे भेटतात-संवरतात ?

छन्न—आतां कसची भेट ? मेला कीं संपलं सगळं.

गौतम म्हणाला—सगळेच मरतात कां असे?

छन्न म्हणाला—हो, थोडे आगेमागें पण सगळे जायचेच.

गौतम म्हणाला—मग एक वेळ मला सुद्धां असंच जावें लागेल आणि मग माझी गौतमी, माझे बाबा, माझी यशोधरा, कुण्णी कुण्णी मला भेटणार नाहींत ! किती

वाईट आहे जग ! तो म्हातारा, तो रोगी आणि हा तर मेलेलाच ! कळस झाला दुःखाचा !!

गौतम खिन्न होऊन राजवाडयांत येऊन पडला. राजानें त्याचें मन रिझविण्याची शिकस्त केली पण गौतमाला कांहीं केल्या पहिल्यासारखें करमेना. त्याला म्हातारपणाचें, रोगाचें, मरणाचें भय वाटूं लागलें. त्या भयामुळें फिरणें, खाणें, खेळणें, कांहींच त्याला गोड वाटेना.

कांहीं दिवसांनंतर छन्न व गौतम एकदां फिरायला निघाले. या खेपेस ते अगदीं निर्जन बाजूलाच मुद्दाम आले होते. पण या वेळीं देखील त्यांना कुणीसं भेटलंच. एक संन्याशी त्यांना भेटला. त्याच्या डोक्यावर केंस नव्हते-अंगावर एकदोनच भगवीं वस्त्रें होतीं-हातांत एक भिक्षापात्र व एक लहानसें वस्त्रांचें गांठोडें होतें. हा नवाच इसम पाहून गौतमानें छन्नाच्या जवळून त्याची माहिती काढून घेतली. आजपर्यंत त्यानें जे तिघेजण ( म्हातारा-रोगी-मृत ) पाहिले होते ते कुणी गौतमाशीं बोलले नव्हते. म्हणून छन्नाला त्यानें विचारलें ' हा मनुष्य माझ्याशीं बोलेल काय ? ' छन्नानें ' हो ' म्हणतांच गौतम त्या संन्याशाकडे आला. नमस्कार करून त्याच्या पुढें उभा राहिला.

गौतमानें विचारलें—आपण प्रव्रजित म्हणजे संन्याशी आहां काय ?

तो म्हणाला—होय. मी प्रव्रजित आहे.

गौतम म्हणाला—प्रव्रजित म्हणजे काय हें आत्तांच मला कळलें. प्रव्रजिताला म्हणे हें जग तुच्छ वाटतें--त्यांतले तरुणपण-म्हातारपण, रोगभोग, जीवनमरण, अगदीं त्याज्य-तुच्छ-वाईट वाटतात, हें खरें काय ?

तो म्हणाला—होय. जगांतले हे प्रकार आम्हांला सर्वस्वीं तुच्छ व त्याज्य वाटतात.

गौतमानें विचारलें—हें सगळं जर वाईट आहे, तर चांगलें काय आहे जगांत ?

प्रव्रजित म्हणाला—धर्माचरण चांगलें, समत्व चांगलें, सत्कर्मं चांगलीं, पुण्यक्रिया चांगली, अहिंसा चांगली आणि भूतदया चांगली. ह्या गोष्टी केल्या म्हणजे कशाचें भय वाटत नाहीं व जगणें सुंदर वाटतें.

गौतम म्हणाला—खरेंच ? कशाचेंहि भय वाटत नाहीं ? कुठून वाटणार ? आपण मला फार चांगली गोष्ट सांगितली. मलाहि निर्भय व्हायचें आहे. आपण धर्माचरण वगैरे चांगलें म्हणतां तें मी आचरीन आणि

निर्भय होईन. नमस्ते. छन्ना, कुणाजवळ ही गोष्ट सांगू नकोस. मला प्रव्रजित झालेंच पाहिजे. मी माझें भय दूर करीन. इतरांचेंहि दूर करीन. आधीं प्रव्रजित होईन. बाबा, यशोधरा मला अडवतील काय ? छन्ना, तूं तूर्त कुणाजवळ बोलूं नकोस.

गौतम घरीं आल्यावर नेहमींप्रमाणें हंसूं-खेळूं लागला. बाहेर कांहीं विशेष प्रकार घडला असें त्यानें दाखविलेंच नाहीं. छन्नानेंहि तसेंच केलें. गौतमाचें मन मात्र प्रव्रज्या घेण्यास उत्सुक झालें होतें. तो योग्य वेळेची वाट पहात होता इतक्यांत नोकरांनीं बातमी आणली कीं, यशोधरेला पुत्ररत्न झालें ! गौतम तें ऐकून दचकला व एकदम म्हणाला 'राहू झाला, बंधन झालें.' सेवकांनीं हे गौतमाचे शब्द शुद्धोदनाला कळविले. त्याला वाटलें कीं गौतमाला संसाराशीं बांधून टाकणारें बंधनच उत्पन्न झालें व म्हणूनच गौतमानें 'राहु झाला' असें म्हटलें असलें पाहिजे. गौतम संसार सोडून जाईल ही भीती आतां नको. म्हणून राजानें मुलाचें नांव मुद्दाम 'राहुल'-च ठेवविलें व वाड्यांत मोठा उत्सव सुरू केला.

गौतमाचा निश्चय ठरलेला होता. राजाला जें वाटलें

तें पुत्रप्रेमामुळें वाटलें. वास्तविक गौतमाला कसलेंच बंधन वाटत नव्हतें. प्रव्रज्या घ्यायची हें त्यानें नक्की केलें होतें म्हणून राजवाड्यांतल्या उत्सवांत तो मोकळेपणानें भाग घेत होता व एकीकडे प्रव्रज्या घेण्याच्या संधीची वाट पहात होता.



महाभिनिष्क्रमण.

# ५

# महाभिनिष्क्रमण

## ( गृहत्याग )

मनाचा एक ठाम निश्चय झाल्यामुळें गौतम आतां उदास नव्हता. एकदां उत्तम वस्त्रालंकार घालून, रथांत बसून, तो शहरांत फिरावयास गेला. राहुलाच्या जन्मोत्सवामुळें शहरांत मोठी गडबड उडाली होती. रस्त्यांत गर्दी झाली होती. म्हणून गौतमाचा रथ सावकाश चालला होता. रथांत बसून प्रसन्न चित्तानें गौतम लोकांची धांदल पहात होता. रस्त्यांतील एकाद्या प्रकाराचें त्याला मधून मधून हंसूहि येई. अशा वेळीं गौतमाचें स्वरूप फार मनोहर दिसें.

त्या राजबिंड्याचें तें सुंदर रूप कृशागौतमी नांवाच्या कन्येनें आपल्या घराच्या गच्चीवरून पाहिलें. ती म्हणाली, ' असा पुत्र ज्यांना आहे तीं मातापितरें धन्य आणि असा पति जिला आहे ती स्त्रीसुद्धां धन्य होय. ' गौतमाचा रथ त्या घराजवळून आणि सावकाश चालला असल्यानें वरील शब्द त्याला ऐकूं गेले. त्यानें वर त्या मुलीकडे पाहिलें व मनांत विचार केला कीं, " माझ्या-

मुळें फक्त आईबाप व बायको एवढीं तीनच माणसें कृतार्थ झालीं असें ही कन्या म्हणते. पण ' गौतम स्वतः धन्य होय—राज्यांतील हे सारे लोक धन्य होत ' असें ती कां बरें म्हणत नाहीं ? बरोबर आहे. इतक्यांत ती तसें कसें म्हणेल ? मी जेव्हां प्रव्रज्या घेईन, भय, राग, द्वेष यांना हांकून लावीन, तेव्हांच मी धन्य होईन हें उघड आहे; आणि या सगळ्या लोकांच्या अंतःकरणांतून भय, राग, द्वेष जेव्हां मी घालवून देईन तेव्हांच हे लोकसुद्धां कृतार्थ होतील. कन्यके, तुझें म्हणणें अगदीं खरें आहे. इनमिन तीनच माणसें मीं सुखी केलीं आहेत, जास्त केलीं नाहींत पण तीं केलीं पाहिजेत ही तुझी सूचना मी समजलों. ती मला शिरसावंद्य आहे. तूं मला आज गुरूचे ठिकाणीं आहेस." असा विचार करून गौतमानें गळ्यांतील मोत्यांचा कंठा काढला व तो त्या मुलीकडे गुरुदक्षिणा म्हणून पाठवून दिला. त्या मुलीचे शब्द त्याच्या मनांत सारखे घोळत होते आणि त्यांतल्या सूचनेप्रमाणें तात्काळ वागायचें असें त्यानें ठरविलें. स्वतः सुखी होण्याचा व इतरांना सुखी करण्याचा एकच मार्ग त्याला माहित होता. तो म्हणजे प्रव्रज्या घेणें. आजच्या रात्रींच त्या मार्गाला लागायचें असें त्यानें ठरवून टाकलें.

त्या रात्रीं नेहेमींप्रमाणें गायनवादन ऐकून गौतम निजला. गाणाऱ्या व इतर स्त्रियाहि जवळपासच झोंपें घेऊन पडल्या. गौतमाला झोंप कसची ? त्यानें सभोंवार पाहिलें तों कांहीं स्त्रिया अस्ताव्यस्त पडलेल्या, कुणी दांत खात असलेल्या, कुणी अघोऱ्यासारख्या घोरत असलेल्या, कुणी झोपेंत बडबडून तोंडें वेडीवांकडीं करीत असलेल्या अशा पाहून त्याला किळस आली. झटकन् उठून तो दाराशीं आला व 'कोण आहे रे तिकडे ?' असें त्यानें विचारलें. छन्न दाराशींच निजला होता. तो म्हणाला 'काय आज्ञा आहे, महाराज ?' गौतमानें त्याला हलक्या आवाजानें आपला बेत सांगितला, व कंथक घोड्याला सज्ज करून आणण्यास सांगितलें. घोडा येईपर्यंत यशोधरेला व राहुलाला एकदां पाहून यावें असें वाटून गौतम यशोधरेच्या मंदिराकडे वळला.

यशोधरेच्या शयनाजवळ गौतम आला तेव्हां यशोधरा गाढ झापीं गेली होती. राहुलहि तिच्या कुशींत शिरून स्वस्थ निजला होता. यशोधरेचा एक हात राहुलाच्या अंगावर होता. लहान मुलें झोंपेंत हंसतात तसा राहुल मधून मधून हंसत होता. तें चित्र पाहून गौतमाचें वात्सल्य जागृत झालें. त्याला वाटलें राहुलाचें एक चुंबन

घ्यावें आणि मग घराबाहेर पडावें. पण तें चुंबन घेतांना राहुलानें चुळबुळ केली—तो जागा झाला, तर यशोधराहि जागी होईल या भीतीनें गौतमानें मनांतली इच्छा दाबून टाकली. दोघां मायलेंकरांकडे पोटभर फक्त पाहून घेतलें व तो तडक मंदिराच्या बाहेर पडला.

इकडे छन्नानें कंथक घोडा सज्ज करून आणलाच होता. गौतम जवळ येतांच तो फुरफुरूं लागला व टापांनीं जमीन उकरूं लागला. मोठ्या महत्वाच्या कामाकरतां आपला मालक आज आपल्याला नेतो आहे म्हणून त्या घोड्याला जणूं आनंदच वाटत होता. गौतम लगेच घोड्यावर बसला, छन्नाला त्यानें आपल्यामागें बसविलें व गौतमानें घोड्यांस टांच मारली. गौतम घराबाहेर पडला. कांहीं अडथळा न होतां शहराबाहेरहि आला व अरण्या-कडे त्यानें घोडा फेंकला. तपश्चर्या करण्याच्या मोठ्या उद्देशानें गौतमाचें हें जें घराबाहेर निघणें त्याला 'महा-भिनिष्क्रमण' असें नांव आहे.

वेगानें घोडा दवडवित गौतम तीस योजनें दूर आला व **अनोमा** नदीच्या कांठीं थांबला. इथून परत जाण्याला त्यानें छन्नाला सांगितलें. छन्नाला तें पटलें नाहीं. तो म्हणाला 'मीहि प्रव्रजित होतों.' परंतु गौतमानें फारच

आग्रह केल्यामुळें मोठ्या नाखुषीनें छन्न परत जाण्यास कबूल झाला. कंथक घोड्यालाहि परत नेण्यास गौतमानें सांगितलें. पण त्या इमानी प्राण्याला गौतमावाचून एकटेच परत जाणें आवडलें नाहीं. गवत खाण्याचें निमित्त करून तो थोडा बाजूला गेला व तिथें त्यानें प्राण सोडला.

इकडे गौतमानें आपले अलंकार उतरून छन्नाच्या स्वाधीन केले. आपली उंची रेशमी वस्त्रेंहि काढून टाकलीं. मस्तकावरचे लांब केंस आतां आपल्याला अयोग्य म्हणून आपल्या खड्गानें गौतमानें कापून कमी करून टाकले. प्रव्रजिताचा वेश त्यानें धारण केला तेव्हां छन्नाच्या डोळ्यांला पाणी आलें. गौतम म्हणाला "छन्ना, ऊठ. डोळे पूस. आपल्या रस्त्याला लाग. माझें कांहीं बरेंवाईट होणार नाहीं याची खात्री ठेव. आपली भेट पुन्हां होईल. नीघ आतां. उशीर करूं नकोस. घरीं सर्वजण काळजींत असतील. त्यांना असे क्लेश देणें बरें नाहीं. लवकर घरीं जा व 'गौतम सुखरूप आहे' असें गौतमीला, बाबांना, व यशोधरेला सांग."

छन्न कसाबसा उठला. डोळे पुशीत त्यानें गौतमाच्या मोहक मूर्तीकडे पाहिलें व 'हें स्वरूप मला आतां अंतरणार' असें म्हणून तो मोठ्यानें रडूं लागला. गौतमानें

त्याला पोटाशीं धरून त्याचें समाधान केलें व त्याला वाटेला लावलें. कंथकालाहि न्यायचें पण तो मेलेला पाहून छन्नाला दुःख झालें. कंथकाचा त्याला हेवाहि वाटला. पण गौतमाची आज्ञा म्हणून तो कपिलवस्तूची वाट चालूं लागला.

गौतमानें कंथकाची व्यवस्था लावली व तपाचरणाकरतां तो निवांत जागा व योग्य उपदेशक शोधूं लागला.

ता. ३९२७ ४८/ उा अं.

## ६

## तपश्चर्येला प्रारंभ.

त्या वेळीं आळार कालाम नांवाचा तपस्वी मोठा ज्ञानी म्हणून प्रसिद्ध होता. गौतमाला वाटलें आपण त्याच्याकडे जावें म्हणजे मनाची निर्भयता, शांति कशी, मिळवायची तें तो आपल्याला सांगेल. त्याप्रमाणें गौतम आळार कालामाच्या आश्रमांत आला व त्याचा शिष्य झाला. त्याच्या उपदेशाप्रमाणें गौतम वागत असतां थोड्याच दिवसांत कालामाची सर्व विद्या गौतम शिकला. बाकी कांहीं राहिलें नाहीं. तरी गौतमाला हवी होती ती मनाची निर्भयता व शांति अजून लाभली नव्हती.

कालामाहून एक पायरी पुढें गेलेला असा उद्रक रामपुत्र नांवाचा तपस्वी आहे असें गौतमाला कळलें. कालामाचा निरोप घेऊन गौतम रामपुत्राकडे आला व त्याचें शिष्यत्व पत्करून थोड्या दिवसांत त्यानें रामपुत्राचें ज्ञानहि हस्तगत केलें. तरी पण गौतमाला पाहिजे होतें तितकें समाधान झालें नाहीं.

तें मिळावें म्हणून रामपुत्राचा सूचनेवरून गौतम

राजगृहाजवळ डोंगरांत कांहीं तपस्वी होते तिकडे गेला. इथें आल्यावर तो कुणाचा शिष्य झाला नाहीं. स्वतःच स्वतंत्रपणें तप करूं लागला. भिक्षेपुरतें फक्त गांवांत म्हणजे राजगृहांत यावें व बाकीचा वेळ जवळच्या पांडव पर्वतावर तपाचरणांत घालवावा असा त्याच्या साधा क्रम होता.

कालाम व रामपुत्र यांच्या उपदेशानें गौतमाचें वागणें, बोलणें, खाणें-पिणें हीं अत्यंत शुद्ध झालीं होतीं. त्यामुळें गौतमाचें मूळचें सुंदर व सतेज स्वरूप आतां विशेषच डौलदार व तेजःपुंज झालें होतें. साहजिकच तो इतर तपस्व्यांहून फार निराळा दिसे व पाहणाराच्या चटकन् डोळयांत भरे.

राजगृह ही बिंबिसार राजाची राजधानी राजानें एक दिवस सहज गौतमाला शहरांत भिक्षा मागतांना पाहिलें. राजाला वाटलें असा पुरुष आपल्या पदरीं, आपल्या सेनेंत असावा. गौतम आश्रमाकडे परत गेल्यावर बिंबिसार राजा आपण होऊन गौतमाकडे आला व त्यानें आपली इच्छा गौतमाला कळविली. राजा म्हणाला 'गौतमा, तुला माझें म्हणणें मान्य असेल तर सर्व सेनेंत उत्तम जी गजसेना तिचा मुख्य अधिपति तुला मी नेमीन.' गौतमानें उत्तर दिलें, 'राजा, तुला नाखुष करावें

अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. पण तूं देतोस त्या अधिकाराची मला खरोखर मुळींच गरज नाहीं. मी शाक्यांचा युवराज आहे. मला तुझ्या गजसेनेच्या मुख्य पदाचा लोभ कसा वाटावा ? शिवाय मी असा सेनापति होण्याकरतां इकडे आलेलों नाहीं. माझें काम फार निराळें आहे'. तें काम गौतमानें राजाला समजावून सांगितलें. तें ऐकून व त्याचा दृढ निश्चय पाहून राजाला खात्री वाटली कीं गौतम हा पुढेमागें ज्ञानी म्हणजे बुद्ध होणारच. राजा म्हणाला 'गौतमा, बुद्धस्वरूपांत तुझें दर्शन मी अवश्य घेईन. आज मी तुझ्याकडून सेवा घेण्यासाठीं आलों, पण ह्यानंतर माझ्याकडून होईल तितकी तुझीच सेवा करण्याचा मी निश्चय केला आहे.' अशा रीतीनें गौतमाला आपला सेवक करण्यासाठीं आलेला राजा स्वतःच गौतमाचा कायमचा सेवक बनून परत गेला !

राजाच्या भेटीनंतर गौतमाची प्रसिद्धी वाढली व त्याला लोकांचा उपसर्ग पोचूं लागला. म्हणून गौतमानें पांडव पर्वतावरचा आपला आश्रम सोडून दिला व कांहीं अंतरावर असलेल्या उरूवेला येथील अरण्यांत त्यानें वास केला. हें अरण्य मोठें रमणीय होतें. त्यांतून एक लहानशीच पण स्वच्छ पाण्याची नदी वहात होती.

तिचें नांव नैरंजना किंवा फल्गु. नदीकांठचें वाळवंट इतकें सुखकर व शुभ्र होतें कीं तें चांदीच्या पत्र्यानें मढवून काढल्यासारखें वाटत होतें. अरण्याच्या चारी बाजूला लागूनच वस्ती असल्यानें येथील तपस्व्यांना भिक्षेची काळजी नव्हती किंवा हिंस्र पशूंचें भयहि नव्हतें.

इथेंहि काश्यपादिक नामांकित तपस्वी होते. पण गौतमानें कुणाचें शिष्यत्व स्वीकारलें नाहीं. एक रमणीय व सोईस्कर ठिकाण पाहून त्यानें तपश्चर्येस सुरवात केली. तपश्चर्या म्हणजे देहाला कष्ट द्यावयाचे, मनाचें नियमन करावयाचें, प्राणायामानें योगसाधन करावयाचें व धर्म-विचारांत प्रगति करावयाची ही त्या वेळची समजूत. त्या प्रमाणें गौतमानें थंडी, ऊन, पाऊस, वारा यांची पर्वा केली नाहीं. कित्येक दिवसचे दिवस तो अन्नपाण्या-वाचून राहूं लागला. कधीं कधीं तो नुसता मुगाचा किंवा कुळथाचा काढाच पिऊन राही. त्यामुळें त्याचें शरीर इतकें कृश झालें कीं त्याच्या शरीरांतील सांधे बाहेर दिसूं लागले. त्याची कंबर उंटाच्या पावलासारखी झाली. रहाटगाडग्यांतील मडक्यांच्या माळेप्रमाणें त्याच्या पाठीचा कणा स्पष्ट दिसूं लागला. मोडक्या घराचे वांसे दिसावे

तशी त्याची एकेक बरगडीन् बरगडी बाहेर दिसूं लागली. विहिरींत पडलेलें चांदण्याचें प्रतिबिंब जसें खूप खोल आहेसें वाटतें तसे त्याचे डोळे खोल गेले होते. पाठ व पोट हीं एक होऊन गेलीं होतीं. पाऊल उचलून टाकूं म्हटलें तर तें त्याला होत नसे, इतकें देहदंडन गौतमानें केलें.

मनाचें नियमन करण्याकरतां त्यानें एकांत पत्करला. पापकर्मांचें चिंतन टाकलें. घाणेरडीं कामें मुद्दाम करून किळस मारली. भयंकर जागेंत वरचेवर जाऊन मनाची धास्ती मोडली. बोलणीं, अपमान इत्यादि सोसून मनाचा राग निर्मूल केला.

प्राणायाम तर त्यानें इतका साधून घेतला कीं तो तासचे तास पूर्ण समाधि लावून बसत असे.

ही तपश्चर्या गौतम करीत होता तेव्हां पांचजण भिक्षु त्याला येऊन मिळाले. गौतमाला शक्य ती मदत ते करीत. मागें तिसऱ्या प्रकरणांत जे 'पंचवर्गीय स्थविर' म्हणून सांगितले तेच हे पांच भिक्षु. गौतमाची ती कडकडीत तपश्चर्या पाहून यांना वाटे कीं धन्य आहे या गौतमाची! केल्या निश्चयाप्रमाणें हा खरोखरच आतां 'बुद्ध' होणार व आपल्या—सर्व जगाच्या—कल्याणाचा

मार्ग शोधून काढणार !

परंतु गौतमाचें स्वतःचें मन त्याला अजून असें सांगत नव्हतें इतकें सगळें केलें–दुसरा कोणीहि तपस्वी करणार नाहीं इतकी तपश्चर्या गौतमानें केली–तरी त्याचें स्वतःचें चित्त शांत झालें नव्हतें. लोककल्याणाचा मार्गहि त्याला अजून सांपडला नव्हता. म्हणून गौतमाला वाटलें ' आपला मार्ग तर चुकत नसेल ? ' विचाराअंतीं त्याची खात्री झाली कीं सध्याच्या, शरीर निर्बळ करणाऱ्या, तपश्चर्येनें आपलें काम साधणार नाहीं. उपासातापासानें शरीराचे हाल करणें व्यर्थ आहे. दुबळा मनुष्य निर्भय व शांतचित्त कसा होऊं शकेल ? दुसऱ्याला तो सुखी कसा करूं शकेल ? तेव्हां देहाला पीडा देणें हा मार्ग खोटा आहे. तो सोडून दिला पाहिजे. दुसरा खरा मार्ग शोधून काढण्यासाठीं शक्ति हवी. ती यावी म्हणून गौतमानें अन्नग्रहणाला सुरवात केली. त्याला पहिल्यासारखा जेऊं–खाऊं लागलेला पाहून त्याचे पांच सोबती म्हणाले, ' अरे, गौतम तर आतां पोटाचे मागें लागला ! आतां कसचा तो ' बुद्ध ' होतो ? त्याच्या तपश्चर्येचा आतां भंग झाला. खादाड कुठचा ? जीभ ताब्यांत नाहीं आणि मोठे जगत्कल्याण करायला निघाले ! ढोंगी ! इथें त्याची

सेवा करण्यांत आमचा किती वेळ फुकट गेला. आतां याच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं.' ते पंचवर्गीय स्थविर खरेच गौतमाला सोडून गेले. पण त्यांच्यावाचून गौतमाचें पूर्वी कुठें अडलें होतें तर आतां अडायचें आहे? गौतमानें आपला क्रम चालूच ठेवला. गेलेली शक्ति परत मिळविली. त्यामुळें त्याचें समाधिसुख वाढलें व धर्मचिंतनाहि मनासारखें होऊं लागलें. त्याचें खाणें अर्थात् देह धारणेपुरतें होतें. जिभचे लाड पुरविण्यासाठीं तो खात नव्हता. समाधि व धर्मचिंतन यांना अडथळा येऊं नये. एवढेंच अन्न तो घेत असे. हा तपश्चर्येचा प्रकार पंचवर्गीय स्थविरांप्रमाणें पुष्कळांना नवाच वाटला पण गौतमाचें ध्येय तरी नवेंच होतें कीं नाहीं? गौतमासारखा जगाच्या सुखाचा विचार या तपस्व्यांनीं केला नव्हता. गौतमाचा विचार नवा म्हणून तपश्चर्येचा मार्गहि नवाच.

---

## ७

# माराशीं युद्ध व ज्ञानप्राप्ति.

आपली तपश्चर्या गौतमानें निश्चयपूर्वक चालू ठेवली. जगांत दुःखें कशामुळें उत्पन्न होतात व तीं नाहींशीं कशीं करतां येतील हें ज्ञान त्याला पाहिजे होतें. घर सोडून आज सात वर्षें होत आलीं तरी गौतमानें आपला ज्ञानप्राप्तीचा निश्चय ढळूं दिला नाहीं. या सात वर्षांत त्याला अडथळे कांहीं थोडे आले नाहींत. पण त्या सर्व संकटांना त्यानें पळवून लावलें.

चांगल्या कामांत जो विघ्न आणतो त्याला आपण कलिपुरुष किंवा सैतान म्हणतों. गौतमाच्या काळीं त्यालाच '**मार**' असें नांव होतें. ह्या मारानें गौतमाचा भारी छळ केला. सातव्या वर्षीं तर या छळाची परमावधि झाली. आसपासच्या तपस्व्यांना पुष्कळ वेळां वाटलें कीं हा मार आतां गौतमाची तपश्चर्या धुळीला मिळविणारच. पण गौतमाचा निश्चय बळवान् म्हणून प्रत्येक खेपेला गौतमाचाच जय होत गेला.


मार म्हणजे अनेक प्रकारचे मोह व अडचणी. बिंबिसार राजानें गौतमाला आपला सेनापति व्हायला सांगितलें तो एक मोहच होता पंचवर्गीय स्थविरांनीं गौतमाची हेटाळणी करून त्याचा त्याग केला तो प्रसंग तसलाच. कधीं कधीं गौतमाचें स्वतःचें मनाहे त्याला घरच्या सुखाचा मोह घाली. हे सगळे माराचे प्रकार आणि माराचे खेळ. असा बहुरूपी असलेला मार गौतमाला म्हणे, 'गौतमा, किती वेडा आहेस तूं! या तपाच्या मागें काय लागतोस? यांत तुला काय सुख आहे? तुझी यशोधरा, तुझा राहुल, तुझें राज्य यांचें सुख किती अपरंपार आहे! तें हातचें सुख सोडून देऊन या पळत्या किंवा नसत्या सुखाच्या मागें धावणारा तूं वेडा नाहीं तर कोण? कसं सोन्यासारखं शरीर; खाऊन पिऊन मजा करण्याचे तुझे हे दिवस. प्रभूच्या कृपेनें सर्व कांहीं तुला अनुकूल. असें सर्व असतांना रानावनांत, ओलं–कोरडं खात, पशुपक्ष्यासारखे दिवस घालवतोस हें तुला शोभतें काय? चक्रवर्ति राजा होण्याची तुझी योग्यता. राजा झालास तर तूं सुखी होशील व सगळ्या जगालाहि सुखी करणं तुझ्या हातीं राहील. त्या सरळ राजमार्गानें जगाचें कल्याण करायचें सोडून या वनवा-

साच्या वाटेनें कां जातोस ? '

अशा प्रकारें गौतमाच्या मनांत मोठी खळबळ हा मार उडवून देई. पण गौतम पक्क्या धीराचा त्याच्यापुढें माराचें कांहीं चालत नसे प्रत्येक वेळीं मारच मार खाऊन परत जाई. मार अगदीं निराश झाला. फक्त एकाच संधीची तो वाट पहात होता.

ती संधि लवकरच आली. वैशाखी पौर्णिमेचा दिवस, वसंतऋतूच्या खऱ्या बहराचा काळ आणि त्यांतून उरूवेले-सारखें मूळचेंच रम्य स्थान, मग काय विचारतां ? जिकडे-तिकडे रमणीयता नुसती नाचत होती. गौतमाच्या प्रसन्नतेला आज पारावार नव्हता. सकाळच्या प्रशांत वेळीं, मोठ्या आनंदमय स्थितींत, तो एका वडाच्या झाडाखालीं ध्यानस्थ बसला होता.

इतक्यांत शेजारच्या सेनानी गांवच्या इनामदाराची तरूण, सुस्वरूप, मुलगी सुजाता ही आपल्या दासीसह तिथें आली. तिच्या बरोबर पूजेचें साहित्य होतें. उत्तम पायसानें भरलेलें सोन्याचें पात्र नैवेद्यासाठीं तिनें आणलें होतें. एक दोन वर्षांपूर्वी सुजातेनें नवस केला होता कीं मनासारखा पति मिळून पहिला मुलगाच झाला तर इथल्या वनदेवाची पूजा करीन तिच्या दोन्ही इच्छा नुकत्याच



बुद्धगयेंतील मंदिर.

ज्या स्थळीं बुद्धास ज्ञानप्राप्ति झाली तिथें हें मंदिर बांधिलें आहे.

पूर्ण झाल्या होत्या. म्हणून आपला नवस फेडण्यासाठीं आनंदानें ती त्या ठिकाणीं आली होती.

तिला गौतमाची ती शांत, सतेज व ध्यानस्थ मूर्ति दिसतांच हर्ष झाला. तिला वाटलें आपली नवसाची पूजा घेण्यास हा साक्षात् वनदेवच आला ! याच विभूती-पुढें नवस फेडावा असें तिच्या मनानें घेतलें व ती इच्छा तिनें नम्रभावानें गौतमापुढें प्रकट केली. सुजातेनें 'भगवन्' म्हणून हांक मारली तेव्हां गौतमाच्या ध्यानांत खंड पडला. सुजातेचा भक्तिभाव पाहून त्याला आनंद झाला. 'मी वनदेव नाहीं, एक साधा तपस्वी आहे', असें त्यानें सुजा-तेला स्पष्ट सांगितलें. पण सुजातेला आपला तो वनदेवच वाटला व पूजा स्वीकारण्याचा तिनें आग्रह चालविला. तिची श्रद्धा पाहून गौतमानें पूजेचा स्वीकार केला. सुजा-तेला फार आनंद झाला. सोन्याच्या भांड्यांतील पायसाचा नैवेद्यहि गौतमानें ग्रहण केला. त्या मित भोजनानें व सुजातेच्या पूजनानें गौतमाला फार सुख झालें असें माराला वाटलें.

गौतमाला तपोभ्रष्ट करायला ही संधि माराला मोठी नामी वाटली व मोठ्या उत्साहानें तो आपली सेना–

आपलें मोहजाल–सज्ज करूं लागला.

तेवढ्यांत फिरतां फिरतां नदीच्या कांठीं एका शिलेवर गौतम जाऊन बसला. अरण्यांतून गवत कापून नेणाऱ्या एका श्रोत्रिय नांवाच्या इसमाचें लक्ष गौतमाकडे गेलें. तो गौतमाकडे आला व त्याला नमस्कार करून, त्याच्यापुढें आठ मुठी गवत ठेवून म्हणाला, ‘ भगवन्, आपण नुसत्या दगडावर बसतां हें पाहून मला दुःख होतें. माझें धन असलेलें हें गवत मी आपल्याला अंशतः अर्पण करतों. त्याचें आसन आंथरून आपण त्यावर बसत जावें’. गौतम म्हणाला ‘ मला या आसनाबिसनाची खरोखर जरूर नाहीं. पण तुझी साधी इच्छा मोडून तुला दुखवावें अशी माझी इच्छा नाहीं ’. गवताच्या आसनावर गौतम बसला व तो गवतकाप्या नमस्कार करून निघून गेला.

या वेळेस मार आपलें सैन्य घेऊन आला. सैन्याच्या अग्रभागीं माराच्या तीन तरुण सुंदर मुली होत्या. पण त्या मुलींना किंवा सैन्याला गौतमाचें मन कांहीं केल्या जिंकतां येईना. अखेरीस मार स्वतः पुढें झाला व म्हणाला ‘ गौतमा, आजच्या एका दिवसांत तीन प्रकारच्या सुखांची चव घेऊन तूं सुखी झाला आहेस. सुजातेनें स्वहस्तें तुला पूजाद्रव्यें अर्पण केलीं तें एक सुख, तिच्या

५२६५



हातचें गोडगोड पायसाचें भोजन तूं पोटभर खाल्लेंस हें दुसरें सुख आणि या आरामदायक आसनावर ऐटीनें बसला आहेस हें तिसरें सुख. तुझी चर्याच सांगते कीं या सुखांपासून तुला फार बरें वाटत आहे. हीं तिन्हीं व आणखी अशीं शेंकडों सुखें कपिलवस्तूंत तुझी वाट पहात आहेत. चल तिकडे.'

गौतम म्हणाला 'मारा, तूं असा हल्ला करशील हें मला माहित होतें. तुला संधि फार चांगली सांपडली. पण तूं मुळांतच मोठी चूक केलीस. वेड्या, मी तीन सुखांचा फक्त स्वीकार आज केला आहे—त्यांचा उपभोग घेतला नाहीं. मला त्यांचा मुळींच लोभ नाहीं आणि मला त्यांत सुखहि वाटत नाहीं. मग कपिलवस्तूंतल्या मोहांचा पसारा माझ्यापुढें मांडण्यांत काय अर्थ आहे? शिवाय जगांतल्या दुःखांचा नाश करण्याचा माझा निश्चय कायम आहे. तो निश्चय करून तर मी कपिलवस्तूंतल्या सुखांवर लाथ मारली आहे. त्याच सुखांकडे मी आतां धांवत येईन असें तुला वाटलें तरी कसें?'

हें ऐकून माराची मोठी निराशा झाली. आपण आपली पराकाष्ठा केली तरी गौतम आपल्याला वश होत नाहीं असें पाहून त्यानें अतःपर गौतमाचा नादच सोडून

दिला. सर्व सैन्यबिन्य घेऊन तो जो गेला तो कायमचाच.

त्या वैशाखी पौर्णिमेच्या रात्रीं पिंपळाच्या झाडाखालीं गौतम ध्यानस्थ बसला. माराची पीडा मिटल्यामुळें त्याचें ध्यान आज सर्वोत्कृष्ट साधलें. अडथळा नसल्यानें त्याचें धर्मचिंतनहि निवांतपणें झालें. अशी सर्व अनुकूलता लाभल्यामुळें गौतमाला त्या रात्रीं ज्ञानप्राप्ति झाली. जगांतल्या दुःखांचें बीज व त्यांचा नाश कशांत आहे हें त्याला समजलें. सातां वर्षांच्या त्याच्या कष्टाचें आज चीज झालें. हवें होतें तें ज्ञान त्याला मिळालें. म्हणजेच, गौतम आतां ‘ बुद्ध ’ किंवा ज्ञानी झाला. ‘ गौतम बुद्ध ’ हें त्याचें नांव इथून सुरू झालें. हा बोध किंवा ज्ञान त्याला ज्या पिंपळाच्या झाडाखालीं प्राप्त झालें त्या झाडाला ‘ बोधि वृक्ष ’ असें नांवहि एव्हांपासूनच मिळालें.

८

# धर्मचक्रप्रवर्तन.

(धर्माचा उपदेश)

आपल्याला झालेलें ज्ञान पक्कें करण्याकरतां गौतमानें त्याच्यावर बराच विचार केला. तो विचार त्यानें निरनिराळ्या प्रकारांनीं केला. ज्ञानाची प्रत्येक बाजू तपासून पाहिली. तसेंच निरनिराळ्या परिस्थितींत ज्ञानाची परीक्षा घेतली. कधीं ध्यानस्थ बसून, कधीं हिंडून, कधीं आश्रमांत बसून, कधीं अरण्यांत वेगवेगळ्या ठिकाणीं बसून बुद्धानें आपलें ज्ञान तावून सुलाखून घेतलें. आणि प्रत्येक वेळीं तें परिपूर्ण व शुद्ध असल्याची त्याची खात्री झाली.

एकदां असाच तो मुचिलिंद झाडाखालीं विचारमग्न बसला असतां मोठा पाऊस यावयास लागला. बुद्ध आपल्या विचारांत इतका गढून गेला होता कीं आपण पावसांत भिजून जाऊं याचें त्याला भानहि नव्हतें. तेव्हां एका नागानें बुद्धावर आपली फणा धरून पावसापासून त्याचें रक्षण केलें. असे सात आठवडे बुद्धानें आपलें ज्ञान कसास

लावण्यांत घालविले. लोकांना उपदेश करण्याची त्यानें मुळींच घाई केली नाहीं.

शेवटल्या दिवशीं तपुस्स आणि भल्लिक नांवाचे दोघे भाऊभाऊ तीनशें गाड्या भरून माल घेऊन व्यापाराकरतां त्या वाटेनें जात होते. बुद्धाची ती सतेज व सानंद मूर्ति पाहून दोघां भावांनीं त्याला नमस्कार करून पूजानैवेद्य ग्रहण करण्याची प्रार्थना केली. बुद्धानें ती मान्य केली. सर्व आटपल्यावर ते भाऊभाऊ म्हणाले 'भगवन्, इतक्या निर्धन स्थितींतहि आपण इतके आनंदी कशामुळें दिसतां ? आम्ही इतके श्रीमंत, इतके सुखी, पण आम्हांला असा आनंद कधींच लाभत नाहीं. तरी, आपण जिच्यामुळें असे आनंदमय झालां आहांत ती गोष्ट आम्हांला सांगाल काय ? तिच्याकरतां आपण सांगाल तें देण्या-करण्याची आमची तयारी आहे'. त्यांची तीव्र इच्छा पाहून बुद्धानें आपल्या ज्ञानाचा त्यांना उपदेश केला. ते दोघे त्याचे शिष्य झाले. हेच बुद्धाचे पहिले उपासक.

पण ते बुद्धाप्रमाणें प्रव्रजित झाले नाहींत. संसारांतच राहून धर्माचरण करण्याचें त्यांनीं ठरविलें. म्हणून त्यांना 'उपासक' म्हणायचें-'श्रमण' नाहीं. बुद्धाला वाटलें,

ता.

'आतां इतरांना ज्ञान सांगायला मुद्दाम जावें कीं इथेंचें जे येतील व विचारतील त्यांनाच फक्त सांगावें ? वास्तविक, आटलेल्या तळ्यांत जसे मासे तडफडतात तसे या जगांत अनेक जीव दुःखानें तडफडत आहेत. त्यांच्यापर्यंत माझें ज्ञान पोंचलें पाहिजे. त्यांच्याकरतांच तर मी हें मिळविलें. म्हणून आतां मला लोकांत जाऊन या ज्ञानाचा प्रसार केलाच पाहिजे.'

लोकांत जाऊन ज्ञान सांगायचें तें प्रथम कुणातरी ओळखीच्या व योग्य माणसाला सांगितलेलें बरें म्हणून त्यानें कालाम व रामपुत्र यांचा आधीं शोध केला. पण ते वारले असल्याचें त्याला कळलें. मग त्याला पंचवर्गीय स्थविरांची आठवण झाली. ते वाराणशींत असल्याचें कळतांच त्यांच्याकडे जाण्याचें बुद्धानें ठरविलें व उरुवेलेच्या तपोवनाचा निरोप घेतला त्या दिवशीं तेथील तपस्व्यांना व शेजारच्या गांवकऱ्यांना फार वाईट वाटलें. बुद्धानें गोड शब्दांनीं त्यांची समजूत केली व तो वाराणशीच्या वाटेला लागला.

वाटेंत त्याला उपक नांवाचा तपस्वी भेटला. बुद्धाची शांत आणि तेजस्वी मुद्रा पाहून उपकानें विचारलें ' भगवन्, आपण कोणत्या पंथाचे अनुयायी आहां ? कुणाचे शिष्य आपण ? ' बुद्ध म्हणाला, ' माझा पंथ मीच

शोधून काढला आहे. मी कुणाचा शिष्य नसून इतरांना माझे शिष्य करण्यास निघालों आहे.' उपकाला आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलें, 'इतक्या योग्यतेला आपण पोंचला आहांत काय ? ' बुद्ध म्हणाला ' होय '. पण उपकाचा विश्वास बसेना. ' असेल कदाचित् ', असें पुटपुटत उपक पुढें निघून गेला. बुद्धाची आतां खात्री झाली कीं नवख्या माणसाला आपल्या ज्ञानाची माहिती देऊन उपयोग नाहीं. त्याची खात्री लवकर पटत नाहीं. अविश्वास दाखवून तो आपली हेटाळणी करतो. तें ठीक नाहीं. म्हणून तो सरळ वाराणशींत पंचवर्गीय स्थविरांकडे आला.

त्यांना तो दुरून दिसतांच त्यांतला एकजण म्हणाला, ' तो पहा, तपश्चर्या सोडून पोटपोश्या झालेला गौतम ! पोटाच्या मागें लागून आतां चांगलाच धष्टपुष्ट झाला आहे. स्वारी आपल्याचकडे येते आहे कीं ! याची आपली जुनी ओळख आहे म्हणून, नाहींतर या खादाड, पतित माणसाला इथें उभासुद्धां केला नसता '. दुसरा म्हणाला, ' येतो तर येईना. आपण होऊन येतो तो आपण होऊनच जाईल. या ओट्यावर एक आसन टाकून ठेवूं. वाटलं, जाईल थोडा वेळ बसून इथं. न बसला तर पीडाच गेली.' असें ठरवून, ओट्यावर एक आसनाचा तुकडा



ध्यानस्थ बुद्धावर नाग फणा धरितो.

फेंकून ते पांचजण जाऊं लागले.

पण जातांना प्रत्येकजण मागें वळून बुद्धाकडे पहातच होता. बुद्धाची तेजःपुंज मूर्ति त्यांना स्पष्ट दिसत होती. बुद्धानेंहि त्यांना ओळखल्याचें दाखविलें. भेटीचा आनंद दर्शवित तो किंचित् हांसला. बुद्धाचें मुळींच स्वागत करावयाचें नाहीं हा त्यांचा विचार. परंतु सुहास्य बुद्धाला बघतांच तो लटपटला. एकजण धांवत त्याला सामोरा गेला. एकानें पुढें होऊन त्याचें भिक्षापात्र व वस्त्राचें गांठोडें घेतलें. एकानें पाय धुण्यास पाणी आणून दिलें. एक म्हणाला 'ये गौतमा, असा आंत ये. या उत्तमासनावर बैस.' उरलेल्या पांचव्यानें विचारलें 'तुझें कुशल आहे ना, गौतमा? तूं भेटलास मोठा आनंद झाला.'

जुने मित्र फार दिवसांनीं अचानक भेटले म्हणजे ज्या गप्पागोष्टी चालतात तशा यांच्याही चालल्या. त्यांत या सहाजणांचा कांहीं काळ गेला. नंतर योग्य वेळ पाहून बुद्धानें आपल्या ज्ञानाची महती त्यांना पटवून दिली. तो म्हणाला 'तृष्णा किंवा हांव हें सगळ्या दुःखाचें मूळ आहे. त्याचा नाश करावयाचा तर कडकडीत उपासतापास नकोत आणि देहाचे चोचले पुरवायलाहि नकोत. मधल्या मार्गानें जावें.

मित आहार करून मन व आचार यांच्या शुद्धतेकडे सर्व लक्ष द्यावें म्हणजे तृष्णेचा नाश होतो. दुःखाचा नाश होतो–भयाचा नाश होतो व मनुष्य सुखी होतो.' हा बुद्धाचा उपदेश त्या पांचजणांना पटला व ते त्याचे शिष्य झाले. ह्या बुद्धाच्या उपदेशाला 'धर्मचक्रप्रवर्तन' म्हणतात. आपल्या धर्माचें चक्र गौतमानें हें प्रथमच चालू केलें.



९

# धर्माचा प्रसार.

बुद्धाचें ज्ञान त्याकाळीं नवलाईचें होतें. त्यामुळें बुद्धाची कीर्ति हळूं हळूं सर्व वाराणशीभर पसरली. तो ज्या मृगवनांत रहात होता तें मृगवन म्हणजे एक यात्रेचेंच ठिकाण झालें.

वाराणशींतल्या एका श्रीमंत व्यापाऱ्याचा यश नांवाचा एक तरुण मुलगा होता. त्याचें नुकतेंच लग्न झालें होतें. बापाचा तो फार लाडका होता. म्हणून बुद्धाकरतां जशी शुद्धोद्धनानें सर्व सुखांची सोय करून दिली होती तशीच यशाकरतांहि त्याच्या बापानें करून ठेवली होती. पण यशाला त्यांत गोडी वाटेना. एके दिवशीं मध्यरात्रीं गाणें-बजाविणें झाल्यावर गाणारणी व इतर तरुण सुंदर स्त्रिया यशाच्या मंदिरांतच निजल्या. तेव्हां यश जागाच होता. त्या स्त्रियांचें घोरणें, दांत खाणें, बडबडणें, लोळणें, अस्ताव्यस्त निजणें वगैरे पाहून यशाला त्या स्त्रियांची किळस आली. तो म्हणाला 'काय हा त्रास ! काय ही पीडा !' तसाच तो घराबाहेर पडला व सरळ मृगवनांत आला.

बुद्धाला त्यानें आपली हकीकत सांगितली. बुद्ध म्हणाला ' यशा, तुझें म्हणणें खरें आहे. मला देखील अशीच सुखाची किळस आली होती व त्यामुळें मी घराबाहेर पडलों. तूं आतां स्वस्थपणें येथें रहा. येथें कोणतीहि पीडा नाहीं.' नंतर बुद्धानें आपल्या ज्ञानाचा त्याला उपदेश केला. तो ऐकून यशाची खिन्नता दूर झाली. उगवत्या दिवसाबरोबर त्याच्या हृदयांत देखील प्रकाश पडला. आनंदित होऊन यशानें बुद्धाचें शिष्यत्व पत्करलें व बुद्धाच्या जवळच तो राहिला.

यशाचा शोध करीत त्याचा बाप जेव्हां बुद्धाकडे आला, तेव्हां बुद्धानें यश भिक्षू (श्रमण) झाल्याचें वर्तमान त्याला कळविलें. यशानें केलें तें योग्यच केलें अशी त्या व्यापाऱ्याची खात्री झाली. इतकेंच नव्हें तर तो स्वतःहि बुद्धाचा शिष्य झाला. पण ' संसारांत राहून धर्माचरण कर ' अशी बुद्धानें त्याला आज्ञा केली. म्हणून नुसता उपासक शिष्य बनून तो व्यापारी घरीं आला.

यशाच्या आईनें व बायकोनें हा प्रकार जेव्हां पाहिला, तेव्हां त्यांनीं एक युक्ति योजिली. ' यशाला घेऊन माझ्या घरीं भोजनास यावें ' असें त्यांनीं यशाच्या वडिलांकडून बुद्धाला आमंत्रण देवविलें. त्यावेळीं दोघी-

जणींचा हेतू असा होता कीं या निमित्तानें यश घरीं आला म्हणजे पुन्हां संसारी होण्याकडे त्याचें मन वळवूं.

बुद्ध भोजनास आला. यशालाहि त्यानें आणलें. सर्वांनीं आनंदानें भोजन केलें. नंतर निवांतपणें सर्वजण बसलें असतां यशाची आई व पत्नी यांना उद्देशून बुद्धानें असा सुंदर उपदेश केला कीं, त्या दोघीजणी बुद्धाच्या उपासिका बनल्या. यशाला परत संसारांत आणण्याचा त्यांचा बेत कुठच्या कुठें नाहींसाच झाला ! यशाकडचें हें वर्तमान ऐकून यशाचे चौपन तरुण मित्र होते तेहि बुद्धाचे ' श्रमण ' शिष्य झाले व बुद्धाबरोबर मृगवनांत राहूं लागले.

हे चौपन, पंचावन्नावा यश व पांचजण 'स्थविर' असे मिळून एकंदर साठ जण शिष्य बुद्धाला एका महिन्यांत मिळाले. आपलें ज्ञान लोकांना सांगावयाचेंच असें बुद्धानें पूर्वींच ठरविलें होतें म्हणून त्यानें ह्या सर्वांना एकत्र करून सांगितलें कीं, 'तुम्ही आतां निरनिराळ्या गांवीं जाऊन लोकांना आपल्या ज्ञानाचा उपदेश करा. त्रासलेला रोगी जशी उत्तम औषधाची वाट पहातो, त्याप्रमाणें दुःखी जग या ज्ञानाची वाट पहात आहे. मी स्वतःहि ह्याच कामाकरतां निघतों. मात्र प्रत्येकानें एकेका

नवीन गांवीं जावें. आपण सध्यां थोडेच आहोंत म्हणून एका गांवीं दोघांनीं तूर्त जाऊं नये.' अशा रीतीनें साठ शिष्य साठ ठिकाणीं गेले. बुद्ध स्वतः आपल्या ओळखीच्या उरूवेलला येण्यास निघाला.

वाटेंत एका उपवनांत तीस तरुण स्त्रीपुरुष मद्य पिऊन धिंगाणा घालीत होते. ते सगळे भद्रवर्गीय होते (म्हणजे उच्च कुळांत जन्मलेले होते). बुद्धानें रस्त्यावरून तो प्रकार पाहिला व मुद्दाम उपवनांत शिरून तो त्यांच्या समोर येऊन उभा राहिला. बुद्धाची ती अचानक आलेली धीरगंभीर मूर्ति पाहून ते मस्तवाल तरुण एकदम चपापले. आपल्या उन्मत्त वर्तनाबद्दल त्यांना पश्चाताप झाला. बुद्धानें त्यांना प्रेमानें जवळ बसवून घेतलें व आपल्या गोड वाणीनें त्यांना आपल्या ज्ञानाचा हळूं हळूं उपदेश केला. तो ऐकून ते सर्वजण बुद्धाचे शिष्य झाले.

तेथून बुद्ध उरुवेलेस आला. त्याला परत आलेला पाहून शेजारच्या गांवकऱ्यांना व अरण्यांतील तपस्व्यांना आनंद झाला. त्यांनीं बुद्धाचें स्वागत केलें. उरुवेला म्हणजे तपस्व्यांचें आगरच. त्यांतल्यात्यांत काश्यप नांवाचे तिघे तपस्वी मोठे ज्ञानी म्हणून प्रसिद्ध होते. राजा बिंबिसाराच्या

सबंध राज्यांत त्यांना मोठा मान होता. या तिघांचे मिळून एक हजार शिष्य होते. बुद्धाला वाटलें कीं 'हे काश्यप माझे शिष्य झाले तर माझ्या धर्माचा प्रसार तात्काळ होईल.' म्हणून त्यानें आपली सर्व शक्ति योजून मन:पूर्वक प्रयत्न सुरू केले. त्याच्या मधुर वाणीनें, मोकळया वर्तनानें व मुद्देसूद प्रवचनानें लवकरच हे तिघे काश्यप व त्यांचे एक हजार शिष्य बुद्ध धर्माचे अनुयायी झाले.

उरुवेलेच्या जवळच बिंबिसाराची राजधानी असलेलें राजगृह नगर होतें. तिघे काश्यप बुद्धाचे शिष्य झाल्याची बातमी तिथें कळली, तेव्हां राजानें बुद्धाकडे आपले दूत पाठविले. पांडव पर्वतावरच्या आश्रमांतल्या भेटींत ठरल्याप्रमाणें राजाला आतां गौतमबुद्धाची यथाशक्ति सेवा कराव्याची होती. दूतांकडून राजानें बुद्धाला राजगृहास बोलावलें. त्याप्रमाणें काश्यप व त्याचे हजार शिष्य यांना घेऊन बुद्ध राजगृहास आला. राजानें त्यांची उतरण्याची सोय यष्टिवनांत करून दिली.

राजाला मोठा आनंद झाला. त्यानें आपले सर्व दरबारी व पुरोहित वर्ग यांना बोलावून बुद्धाचीं प्रवचनें खुद्द राजवाड्यांत करविलीं. त्यांचा योग्य तो परिणाम होऊन स्वत: राजा, त्याचे सर्व दरबारी व पुरोहितवर्ग

हे बुद्धाचे शिष्य झाले. बुद्धाच्या सत्कार्याला मदत म्हणून राजानें वेणूवन नांवाचें विस्तीर्ण उपवन बुद्धाला दान दिलें. सर्वांना रहाण्याला सोईस्कर असें विहार त्यानें ह्या उपवनांत बांधून दिलें. त्या विहारांत बुद्ध व त्याचे शिष्य राहावयास गेले.

उरुवेलेला जसे काश्यप नामांकित होते, तसे राजगृहास संजय नांवाच्या तपस्व्याचे दोन शिष्य सारिपुत्त व मोग्गल्लान हे प्रसिद्ध होते. बुद्ध धर्माचा वाढता प्रसार पाहून त्यांनीं एका बुद्ध भिक्षूला गांठलें व बुद्ध धर्माची थोडीशी माहिती त्याच्यापासून मिळविली. तेवढ्या माहितीवरूनच त्यांना बुद्धधर्मी व्हावेसें वाटलें व त्यांनीं बुद्धाकडे येऊन त्याचें शिष्यत्व पत्करलें. हे दोघे बुद्धाच्या सर्व शिष्यांत मोठे ज्ञानी होते. शिवाय ते आपण होऊन बुद्धाचे शिष्य झालेले होते. त्यांचा हा विचारीपणा बुद्धाला फार आवडला. त्यानें या दोघांना आपले मुख्य शिष्य नेमलें. साहजिकच कांहीं जुन्या व वृद्ध शिष्यांना त्यामुळें राग आला. परंतु बुद्धानें त्यांचें तात्काळ समाधान केलें.

अशा प्रकारें बुद्धाचा शिष्यवर्ग झपाट्यानें वाढत होता. दुसरे साठ भिक्षू जे गांवोगांव फिरत होते त्यांनाहि शेंकडों शिष्य मिळाले. या वाढत्या शिष्यवर्गाला वळण



मुक्या प्राण्यांची बुद्धभक्ति.

लावण्यासाठीं भिक्षूचा वेष कसा असावा, दिनचर्या कशी असावी, प्रसंगविशेषीं आचरण कसें ठेवावें इत्यादिविषयीं सुंदर नियम बुद्धानें घालून दिले. या नियमांमुळें त्यांच्या अफाट शिष्यवर्गाची इतकी उत्तम जूट झाली कीं त्याला ‘संघ’ हेंच नांव मिळालें. पुढें तर बुद्धाच्या धर्माइतकेंच या संघाचेंहि महत्व वाढलें.

## १०

## वडिलांचें बोलावणें.

बिंबिसारासारखा राजा बुद्धाचा शिष्य झाला हें राजा शुद्धोदनाला तावडतोब कळलेंच. इतका वेळ गौतमाची त्याला कांहीं एक माहिती नव्हती. आतां ती कळल्याबरोबर त्यानें विश्वासू दूत बुद्धाकडे पाठविले व गौतमबुद्धास कपिलवस्तूला घेऊन येण्यास सांगितलें. मुलाची भेट आज सात–आठ वर्षें नसल्यानें शुद्धोदन त्याच्या वाटेकडे अगदीं डोळे लावून बसला होता.

पण त्याच्या दूतांची अशी गंमत होई कीं बुद्धाजवळ येऊन त्यांनीं एखादें प्रवचन ऐकलें न ऐकलें तोंच ते स्वतः बुद्धाचे शिष्य होऊन त्याच्याजवळ राहून जात ! मग राजाज्ञेप्रमाणें बुद्धाला घेऊन कपिलवस्तूस ते कसचे जातात ? पहिले दूत लवकर येईनात म्हणून राजानें दुसरे पाठवावे. त्यांचीहि तीच गत व्हावी. असें नऊ वेळां झालें. राजानें दूत पाठवावेत व दूतांनीं बुद्धानुयायी बनावें अन् परत येऊंच नये ! !

मग राजानें निराळी युक्ति काढली. काळूदायी नांवाचा एक गौतम बुद्धाचा बालमित्र कपिलवस्तूंत होता. तो मोठा विश्वासू होता. त्याला सांगितलें कीं 'कसेंहि करून बुद्धाला कपिलवस्तूस घेऊन ये'. त्यानें 'आणतोंच' म्हणून वचन दिलें व तो बुद्धाकडे आला. बुद्धाच्या प्रवचनाचा परिणाम त्याच्यावरहि व्हावयाचा तोच झाला. इतर दूतांप्रमाणें तो देखील बुद्धाचा शिष्य झाला. पण फरक इतकाच कीं तो बुद्धाला घेऊन जायचें आपलें काम विसरून गेला नाहीं. योग्य वेळ पाहून तो प्रश्न काढण्याचा त्यानें विचार ठरवून ठेवला होता.

काळूदायी येऊन एक आठवडा झाला. तेवढ्यांत हिंवाळा संपून वसंत ऋतु सुरू झाला. लगेच काळूदायीनें 'वसंत ऋतु प्रवासाला फार सुखकर–त्याचे अमूक फायदे आहेत, दुसऱ्या ऋतूंत ते नसतात' वगैरे वसंतऋतूची खूप स्तुति सुरू केली. ती ऐकून बुद्धानें विचारलें 'कां, बुवा, प्रवासाची फारशी स्तुति करतोस? आम्हांला कुठें हिंडवून आणण्याचा विचार दिसतो, खरं ना?' तो म्हणाला 'होय भगवन्, आपण अगदीं बरोबर ओळखलेंत, आपल्याला कपिलवस्तूस न्यावें असें....' बुद्ध म्हणाला 'समजलों. मग त्याला एवढी मोठी प्रस्तावना कशाला? मी

तुला कधीं "नाहीं येत" म्हटलं? तूं आतां म्हणशील तर आतां मी निघतों-तुझ्या आवडत्या प्रवासाला.'

काळूदायीला मोठा हर्ष झाला. त्याच दिवशीं प्रवासास ते लागलेदेखील. बुद्धाच्या बरोबर बरेचसे शिष्य होते व आणखीही मधूनमधून येतच होते. हें पाहून काळूदायी म्हणाला 'मी होतों पुढें. गौतमीला, शुद्धोदनाला ही आनंदाची बातमी आधीं मीच कळवितों. शिवाय इतक्या मंडळींची प्रवासांतल्या मुक्कामाची व भोजनाची सोय करीत जातों. वाटेंत कुणाला त्रास न झालेला बरा. प्रवास कांहीं लहानसहान नाहीं. दोन-अडीच महिने तरी लागतील'. बुद्धानें त्याची पुढें रवानगी केली. गौतमबुद्ध येत आहे असें काळूदायीनें सांगतांच राजाला केवढा आनंद झाला! वाटेंतल्या सर्वांच्या मुक्कामाची सोय राजानें तात्काळ करविली. 'आज गौतमाचा मुक्काम कुठें होता, कसा काय होता' याची तो रोज खबर काढी.

दोन-अडीच महिन्यांनीं बुद्ध व त्याचा शिष्यवर्ग कपिलवस्तूस पोहोंचला. राजानें प्रेमभरानें त्याचें स्वागत केलें. आनंदाश्रूंनीं न्हाणीत बुद्धाला त्यानें कडकडून मिठी मारली. आठ वर्षें हरपलेलें त्याचें निधान आज त्याला

सांपडलें होतें. 'सर्वांना घेऊन राजवाड्यांतच मुक्कामाला चल' असें त्यानें बुद्धाला सुचविलें. तेव्हां बुद्ध म्हणाला 'आम्हीं भिक्षूंनीं गांवाबाहेरच रहावें हें बरें. न्यग्रोधवनांत आम्ही तूर्त रहातों. तेथें उद्यांपरवांपावेतों विहार तयार करवावेत.' राजानें त्याच दिवशीं न्यग्रोधवनांत सर्वांसाठीं विहार बांधवून दिले व बुद्ध तेथें वसतीस गेला.

## ११

## कपिलवस्तूला भेट.

कपिलवस्तूला पोंचल्यावर दुसऱ्याच दिवशीं नित्य-क्रमाप्रमाणें गांवांत भिक्षा मागण्यास बुद्ध निघाला. हें वर्तमान राजवाड्यांत यशोधरेला सर्वांच्या आधीं समजलें. तेव्हां तिनें आपल्या मंदिरांतून रस्त्यावर नजर टाकली. तर खरेंच बुद्धाची स्वारी उन्हातान्हांतून, अनवाणी, उघड्या डोक्यानें, हातांत भिक्षापात्र घेऊन, दारोदार हिंडत आहे असें तिला दिसलें. त्याला असा पाहतांच तिच्या डोळ्याला टचकन् पाणी आलें. तिला ती राजवाड्यांतली, वस्त्राभूषणांनीं नटलेली, राजबिंड्या गौतमाची मोहक मूर्ति आठवली. थोडावेळ ती रडत होती. मग बुद्धाच्या शरीराकडे, सतेज अंगकांतीकडे, प्रसन्न चेहेऱ्याकडे व स्नेहार्द्र डोळ्यांकडे जेव्हां तिचें लक्ष गेलें तेव्हां तिचें दुःख हलकें झालें. गौतम सुखांत आहे—कसल्यातरी अलौकिक आनंदांत आहे असें तिला दिसलें. गौतमाबद्दलचें दुःख जाऊन तिच्या मनांत गौतमाबद्दल आदर उत्पन्न झाला व आपल्या जागेवरून, भक्तिभावानें हात जोडून, तिनें त्या बुद्धमूर्तीला

नमस्कार केला. बुद्ध नजरेआड होईपावेतों ती त्याच्याकडे वेडयासारखी पहातच राहिली. तो दिसेनासा होतांच भानावर येऊन तिनें दोनतीन हुंदके दिले व शयनावर धाडकन् अंग टाकून दिलें.

गांवांत गौतम भिक्षा मागतो आहे हें राजाला तिनें थोडया वेळानें कळविलें. राजाला त्याचा अर्थच कळेना, इतकें त्याच्या मनांत विचारांचें काहूर माजलें. ज्या नगरांत राजा म्हणून गौतमानें मिरवावयाचें त्याच नगरांत तोच गौतम सामान्य भिक्षेकऱ्यासारखा भीक मागत रस्त्यावरून रखडतो आहे हें ऐकून राजाला वाईट वाटल्यावांचून कसें राहील ? तो धांवतच वाडयाबाहेर पडला–बुद्धची गांठ घेतली व परोपरीनें त्याला सांगून पाहिलें. अखेर राजा म्हणाला ‘ गौतमा, ज्या राजकुलांत तुझा जन्म झाला आहे त्या राजकुलाची परंपरा अशी भिक्षा मागण्याची नाहीं. कुलपरंपरेचा कांहीं विचार करशील ना ? ’ गौतम म्हणतात ‘ तात, कुलपरंपरेचा विचार मीं केला आहे. पण आपण म्हणतां तसें माझें कुल राजांचें नाहीं. माझें कुल बुद्धांचें आहे. माझा देह राजकुलांत जन्मला खरा, पण त्या देहांतला आत्मा बुद्धकुलांतला आहे. माझ्या पूर्वीं जे जे बुद्ध होऊन गेले त्यांनीं भिक्षाच मागितली

आहे. म्हणून मी म्हणतों कीं माझी कुलपरंपरा भिक्षा मागण्याची आहे. त्या परंपरेप्रमाणें मला वागायला नको कां?' डोळ्यांत आंसवें आणून राजानें विचारलें 'गौतमा, ह्याचा अर्थ असाच ना कीं शाक्यकुलांतला माझा आणि माझ्या मायेचा गौतम आतां उरला नाहीं?' गौतम म्हणाला 'तात, शांत व्हा, मी आपलाच गौतम आहे. 'शाक्यमुनि' म्हणूनच जग मला ओळखतें. मी शाक्य होतों—आहे व राहीनहि. तात, मी तुमचा आहे, म्हणूनच दोन-अडीच महिने सारखी पायपिट करीत येथें आलों ना? माझें कर्तव्य मला केलेंच पाहिजे.'

यानंतर हलकें हलकें बुद्धानें आपलें म्हणणें राजाला पटवून दिलें. आपल्या धर्माचे विशेष गुण त्याला सांगितले व त्याच्या मनांत त्या धर्माविषयीं आवड उत्पन्न केली. शेवटीं, निदान त्या दिवशीं तरी, बुद्धानें भिक्षा न मागतां सर्व शिष्यांसह राजवाड्यांत येऊन भोजन करावें असें राजाचें म्हणणें पडलें. बुद्धानें तें मान्य केलें व आपल्या सर्व शिष्यांसह त्या दिवशीं राजवाड्यांतच 'भिक्षा' घेतली.

बुद्ध वाड्यांत आला तेव्हां सर्व राजस्त्रियांनीं येऊन त्याचें दर्शन घेतलें. यशोधरा तेवढी दर्शनाला आली

नाहीं. बुद्धाच्या तें लक्षांत आलें. 'राजवाड्यांत आला पण मला न भेटतां गेला' असा तिचा शब्द आपल्यावर राहूं नये म्हणून बुद्धच तिच्याकडे जावयाला निघाला. आपल्याबरोबर त्यानें आपले दोघे पट्टशिष्य सारिपुत्त आणि मोग्गाल्लान यांना घेतले. आपल्या मंदिरांत त्याला आपण होऊन आलेला पाहतांच यशोधरा थोडीशी ओशाळली व तिनें त्याला आदरपूर्वक नमस्कार केला. बुद्धानें कांहीं साधे कुशल प्रश्न तिला विचारले. त्यांचीं 'होय-नाहीं' अशीं मोजकीं उत्तरें तिनें दिलीं. बुद्धाचे शिष्य त्याच्याबरोबर नसते तर ती कांहीं अधिक बोलली असती. बुद्ध लवकरच तेथून परत निघाला.

यशोधरेच्या मंदिरांतून बुद्ध जेव्हां सभेंत शुद्धोदनाच्या जवळ येऊन बसला तेव्हां राजानें यशोधरेच्या मनोनिग्रहाची, वागणुकीची व नेमनिष्ठेची फार प्रशंसा केली. तेव्हां बुद्ध म्हणाला 'त्यांत नवीन कांहीं नाहीं. तिचं आत्मसंयमन फार मोठें आहे व ती आपल्या हिताला फार जपते हें मला पहिल्यापासून ठाऊक आहे.'

नंतर जमलेल्या मंडळींना उपदेशाचे चार शब्द ऐकवावे अशी राजाची इच्छा दिसली म्हणून बुद्धानें थोडासा उपदेश करून सर्वांचा निरोप घेतला व तो

आपल्या विहारांत आला. अशा रितीनें कपिलवस्तूंतला त्याचा पहिला दिवस मोठ्या धामधुमीचा गेला.

दुसऱ्या दिवशीं तर नगरांत मोठा उत्सवच होता. गौतमी व शुद्धोदन यांचा नंद नांवाचा मुलगा होता. त्याला यौवराज्याचा अभिषेक व्हावयाचा होता व त्याच दिवशीं त्याचें लग्नहि व्हावयाचें होतें. जनपदकल्याणी या नांवाची सर्वांत उत्कृष्ट अशी मुलगी वधू ठरविली होती. पण बुद्धाच्या मनांत होतें कीं नंदानें आपलें शिष्यत्व पत्करून श्रमण व्हावें, लग्नविघ्न कांहीं करूं नये. त्यानें नंदाला एकदोन निरोप पाठविले पण नंदानें त्याला दाद दिली नाहीं. मग बुद्ध स्वतःच राजवाड्यांत आला व नंदाला गोष्टींत गुंतवून आपल्या विहारांत घेऊन गेला. जनपदकल्याणीनें नंदाची खूप वाट पाहिली पण पाहते तो नंद आपला भिक्षू झालेला !! आपण भिक्षू व्हावें असें नंदाला स्वतःलाहि वाटत नव्हतें पण बुद्धाच्या उपदेशापुढें त्याचें कांहीं चालेना.

पुढच्या चारपांच दिवसांत दिवसाकांठीं एक तरी खेप बुद्धाची राजवाड्यांत होत असे. सातव्या दिवशीं तो असा राजवाड्यांत येतांना दिसला तेव्हां यशोधरेनें राहु-लाला जवळ बोलावून सांगितलें ' बाळ, ते सर्वांच्या पुढें

आहेत ना, ते तुझे वडील आहेत. त्यांच्या जवळ जा आणि आपला वांटा मागून घे. काय म्हणशील ? "तात, माझा वांटा द्या." आज्ञाधारक राहुल निघाला तो बुद्धाजवळ आला. आईनें पढविल्याप्रमाणें त्यानें आपला वांटा मागितला. बुद्ध बसला होता तो उठला व म्हणाला 'चल, माझ्या बरोबर येतोस ? मी तुझा वांटा देतों. येतोस कां ? राहुल म्हणाला, 'हो, येतों तर, कांहीं घेतल्याशिवाय येऊं नकोस, असें आईनें मुळीं सांगितलंच आहे. चला मी येतों तुमच्याबरोबर' त्याच्यासह बुद्ध व त्याचे शिष्य विहारांत आले. बुद्धानें सारिपुत्ताला सांगितलें 'हा माझा मुलगा. ह्याचा वांटा ह्याला हवा. ह्याच्या आईनें तो 'घेच' असें त्याला बजावलें आहे. माझें सगळें धन म्हणजे माझें हें धर्मज्ञान. यशोधरा हें जाणतच. तेव्हां या ज्ञानांतला अंश राहुलाला मिळावा अशी तिची इच्छा स्पष्ट दिसते. सारिपुत्ता, या मुलाला आज बालभिक्षू कर आणि धर्माभ्यासाकरतां तुझ्या जवळ ठेऊन घे.' सारिपुत्तानें राहुलाचीं माला, गंध, वस्त्रें, अलंकार काढून टाकले, डोक्यावरचे केस काढून टाकले. भिक्षूला योग्य असें पिवळें वस्त्र त्याला नेसविलें व आपल्या विहारांत धर्मपठन करीत बसविलें.

'राहुलाला भिक्षू केलें' हें ऐकतांच शुद्धोदनाला फार दुःख झालें. तो तडक बुद्धाकडे आला व आपलें सगळें दुःख त्याच्यापुढें सांगूं लागला. वृद्धाची ती करुण मूर्ति पाहून बुद्धहि विरघळला. आपण असें कां केलें तें त्यानें राजाला खुलासेवार सांगितलें. पण शोकामुळें राजाला तें पटलें नाहीं. शेवटीं राजा म्हणाला 'गौतमा, तुझ्या धर्माचें मी कल्याणच इच्छितों व म्हणूनच तुला सांगतों कीं वीस वर्षांच्या आंतील कोणत्याहि मुलाला जर भिक्षू करावयाचें असेल तर त्याच्या मातापितरांची संमति आधीं मिळवित जा.' बुद्धानें हें रास्त म्हणणें मान्य केलें.

ह्यानंतर बुद्ध परत राजगृहास जावयास निघाला शुद्धोदनानें आपलें दुःख गिळून प्रेमानें त्यास निरोप दिला व म्हटलें 'गौतमा, जें उणें-अधिक बोललों असेन त्याच्या पोटीं प्रेमच होतें म्हणून बोललों. तुझ्या धर्मा-वरहि माझें प्रेमच आहे. त्याचें यथाशक्ति मी आचरण करीन.'

पितापुत्र कडकडून भेटले व बुद्ध आपल्या वाटेला लागला.

---

## १२

# अनाथपिंडिक शेटी.

अनाथपिंडिक अथवा सुदत्त ह्या नांवाचा एक अत्यंत श्रीमान् व्यापारी श्रावस्ती नगरींत रहात असे. तो इतका धनवान् होता कीं लोक त्याचा हेवा करीत रस्त्यांतून तो जातयेत असतांना त्याच्या अंगावरचे दागिने लोकांच्या डोळ्यांत सलत असत. एकदां पुढील प्रसंग घडला म्हणतात:—

कांहीं मद्यपी स्वत: जवळचा मद्याचा सांठा संपत आला म्हणून 'काय करावें' अशा विचारांत होते इतक्यांत समोरून अनाथपिंडिक राजभेटीसाठीं चाललेला त्यांनीं पाहिला. त्यानें मौल्यवान वस्त्र परिधान केलें होतें गळ्यांत, हातांत दागिने घातले होते. त्याला पाहून मद्यप्यांना जरा धीर आला. त्यापैकीं एक शेठ म्हणाला 'आपण मद्यांत मादक पदार्थ मिसळूं व तो इकडून जाईल त्यावेळीं त्याला हांक मारून तें मद्य पाजूं आणि मग तो बेशुद्ध झाला कीं त्याच्या अंगावरील दागदागिने काढून

घेऊन मद्यासाठीं पैसा उभा करूं.' सर्वांना हा बेत पसंत पडला.

अनाथपिंडिक जवळपास येतांच एकानें त्याला हांक मारली व म्हटलें–' शेटजी, हें मद्य बघा किती छान आहे ! एक घोट घेतां ? जरा चव तर पहा.' अनाथपिंडिकानें त्यांचा डाव ओळखला व म्हटलें ' शहाण्यांनो, मद्य जर तितकें छान असतें तर तें इतका वेळ तुम्ही राहूं तरी दिलें असतें कां ? तुम्हीं केव्हांच तें पिऊन टाकलें असतें व खातेऱ्यांत लोळत पडलां असतां !! तुमचा डाव मीं ओळखला आहे. लोकांना लुबाडण्याचा धंदा करतां काय ? चला, निघा येथून.'

असें म्हणून त्यानें त्या मद्यप्यांना तेथून हाकून दिलें.

× × ×

अनाथपिंडिकाच्या अंगच्या चातुर्याचें हें एक उदाहरण दिलें आहे. अशाच दुसऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं अनाथपिंडिक हा मोठा चतुर, सुशील व फारच चांगला मनुष्य होता.

× × ×

असा हा अनाथपिंडिक कांहीं कामानिमित्त राजगृहास आला होता. त्यावेळीं बुद्धाचा मुक्काम तेथें अस-

त्यानें बुद्धाविषयींची कीर्ति त्याच्या कानीं गेली. एवढ्या मोठ्या साधूचें दर्शन घ्यावें व आपणहि आल्यासारखे पावन व्हावें असा विचार अनाथपिंडिकानें केला.

तो मोठ्या पहांटेस बुद्धाच्या दर्शनास जाण्यास निघाला. तो बुद्धाला पहाण्यासाठीं उत्सुक झालेला. त्यांत पहांटेसारखी उत्साहवर्धक प्रशांत वेळ! मग काय? त्यानें 'हां हां' म्हणतां बुद्धाच्या मुक्कामाची जागा गांठली. बुद्ध त्यावेळीं सीतवनांत होता. तिथें अनाथपिंडिक आला. त्यावेळीं बुद्ध आपल्या आश्रमाच्या जवळ फिरत होता व धर्मचिंतन करीत होता; कारण, पहांटेची वेळ एकाग्र चिंतनाला चांगली असतें. त्यानें समोरून येणाऱ्या अनाथपिंडिकाला पाहिलें मात्र आणि 'सुदत्ता, इकडे ये' अशी हांक मारली. 'जवळ ये' म्हणून अगदीं आपलेपणानें बुद्धानें बोलाविल्यानंतर अर्थात् त्याच्याबरोबर अनेक विषयांवर-(दान व शील ह्यांची श्रेष्ठता-एकांतवासाचें खरें सुख-स्वर्गांतील आनंद इत्यादिकांवर) संभाषण झालें. तें सर्व ऐकून अनाथपिंडिकाच्या हृदयांतला बुद्धाबद्दलचा आदर द्विगुणित झाला आणि तेव्हांपासून तो बुद्धाचा शिष्य बनला.

अशा प्रकारें उपदेश झाल्यानंतर साहजिकपणेंच

गुरूनें आपल्या घरीं पायधूळ झाडावी असें सुदत्ताला वाटलें परंतु बुद्ध आणि त्याचा परिवार ह्यांच्या वसतीची एका ठिकाणीं सोय करणें कठिण होतें. श्रावस्ती आणि राजगृह ह्यांच्या दरम्यान 'जेतवन' नांवाचें एका राजकुमाराचें उद्यान होतें. तें अतिशय प्रशस्त असून रमणीयहि होतें. तें बघून 'अशा प्रकारचें उद्यान बुद्धाच्या वसतीसाठीं मिळाल्यास बरें' असें सुदत्ताच्या मनानें घेतलें. एखादी वस्तू मनांत भरल्यानंतर ती मिळविण्याकडे माणसाचें लक्ष लागतें. त्याप्रमाणें तें वन आपणांला मिळावें म्हणून राजकुमारापाशीं त्यानें इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां 'सोन्याचें नाणें माझ्या उद्यानभर पसरशील तर मी माझें उद्यान देईन' अशी राजकुमारानें अट घातली.

राजकुमाराला वाटली तितकी ती अट अनाथपिंडिकाला अशक्य कोटींतली नव्हती. त्यानें चार गाड्या सोन्याच्या नाण्यांनीं भरून आणवून उद्यानांत नाणें पसरण्यास सुरुवात केली. परंतु नाणें अर्धें पसरलें नाहीं तोंच राजकुमारानें 'मला उद्यान द्यावयाचें नाहीं. मी सहज थट्टेनें बोललों' अशी हरकत घेतली. तेव्हां तो दोघांचा तंटा अखेरीस श्रावस्ती येथील न्यायाधीशमंडळाला तोडावा लागला. एकदां दिलेलें वचन माघारीं घेणें

राजकुमाराला उचित नव्हे म्हणून न्यायाधीश मंडळानें अनाथपिंडिकाच्याच बाजूचा निकाल दिला. पैशानें विकत घेतलें जाणारें, परंतु तंट्यांत विजयी झालेलें तेंच उपवन आपल्या ताब्यांत घेतांना अनाथपिंडिकाला एक प्रकारची धन्यता वाटली. त्यानें नाण्यीं सभोंवार पसर ण्याचा सपाटा लाविला परंतु तें काम पुरें होतें न होतें तोंच राजकुमार तेथें येऊन म्हणाला ' एवढीच जमीन मी तुम्हांला विकत देतों व बाकीची बुद्धाच्या विहारासाठीं दान देतों '.

अनाथपिंडिकाला त्याचें बोलणें एकून परमानंद झाला. त्यानें देखील आपल्या परीनें ' बुद्धासाठीं विहार येथेंच बांधा ' म्हणून विनविलें.

× × ×

जेतवनांत ठिकठिकाणीं खोल्या, भोजनशाळा, स्नानशाळा इत्यादि दिसूं लागल्या. अशा प्रकारें विहार सिद्ध झाल्यानंतर बुद्धाला अत्यादरानें आमंत्रण करण्यांत आलें. बुद्धानेंहि तें तितक्याच आपलेपणानें स्वीकारून जेतवनांत आपला मुक्काम ठेविला. अनाथपिंडिकाकडून बुद्धाचा पाहुणचार यथास्थित झाला. तेव्हां योग्य आदरातिथ्य, अंतःकरणापासूनची भक्ति आणि वातावरणांत उत्पन्न झालेला उत्साह ह्यामुळें सर्वत्र ' आनंदच ' जणूं विहार करीत असावासें वाटलें.

## १३

# बुद्धाचें परिनिर्वाण.

—*—*××*—*—

भगवान बुद्धाचे शेवटचे दिवस सर्व आजूबाजूच्या गांवीं फिरून मंडळींस उपदेश करण्यांतच गेले. राजगृहास कांहीं दिवस मुक्काम असतां अजातशत्रूचा अमात्य वज्जी लोकांवर हल्ला करण्यासाठीं सल्ला विचारण्याकरितां आला. वज्जी लोक बुद्धाचे अनुयायी होते आणि विशेषतः त्यांच्या आडदांडपणास आळा घालण्याकरतां बुद्धानें त्यांना कांहीं नियम घालून दिले होते. ह्या नियमांचें उल्लंघन त्यांचे हातून झालें असेल तर त्यांना 'दंड' करावा असा पोक्त सल्ला गौतमानें त्या वेळीं दिला. ह्यानंतर तेथील मुक्कामांत बऱ्याच विषयांवर बुद्धाचीं उपदेशपर व्याख्यानें झालीं. नंतर तो बऱ्याच ठिकाणीं जाऊन पाटलिग्रामास आला.

त्या वेळीं सुनीध आणि वस्सकार हे पाटलिग्रामांत नगररचना करीत होते. त्यांच्यापुढें वज्जींसारख्या शत्रूचा बीमोड करण्याचा प्रश्न होता. भगवान बुद्ध ज्या वेळीं त्या

गांवांत आला त्या वेळीं तें काम चालू असलेलें पाहून त्यानें विचारपूस केली. आनंदानें सुनीध आणि वस्सकार यांच्या बद्दल माहिती सांगितली. ती ऐकून बुद्धाला आनंद झाला व तो म्हणालाः—

'आनंदा, हें नगर पुढें श्रेष्ठ नगर होईल. ह्या प्रदेशाचें माहात्म्यच असें आहे.'

त्याच दिवशीं सुनीध व वस्सकार ह्यांच्याकडे बुद्धसंघासाठीं मोठा भोजनसमारंभ झाला. भोजन व उपदेश झाल्यानंतर भगवान् बुद्ध कोटिग्रामास जाण्यास निघाला. 'ज्या द्वारानें गौतम बाहेर पडेल त्यास गौतमद्वार म्हणावयाचें व ज्या घाटानें गंगानदी उतरून जाईल त्यास गौतमतीर्थ म्हणावयाचें' असा विचार करून सुनीध व वस्सकार भगवंताच्या मागून चालले. भगवान बुद्ध गंगेवर आला.

गंगानदी तुडुंब भरली होती. प्रत्येकजण गंगापार होण्याकरतां होडी किंवा तराफा शोधीत होता, तीरावर मारे गर्दी उसळली होती. अशा गर्दींत भगवान बुद्ध गेला नाहीं. परंतु आपल्या संघासह ऐलतीरीं अंतर्धान पावून पैलतीरीं प्रगट झाला.

कोटिग्रामास बुद्ध असतां 'चार सत्यें' ह्या विषयावर त्याचें एक मननीय व्याख्यान झालें. वैशाली व वेलुणग्राम ह्या गांवीं त्याचा नंतरचा मुक्काम झाला. तेथेंच बुद्धाची प्रकृति बिघडली. जोराच्या प्राणांतिक वेदना होऊं लागल्या, पण त्या सर्व इतरांना त्रास होऊं न देतां त्यानें सोसल्या. तो आपणाशीं म्हणाला 'भिक्षुसंघाला भेटल्याशिवाय माझें परलोकगमन व्हावें हें उचित नव्हे. आपल्या मानसिक उत्साहानें हें दुखणें दाबून टाकूं या. म्हणजे आयुष्याचे दिवस थोडेसे वाढतील!' ह्या प्रयत्नामुळें तो तात्पुरता बरा झाला. पावसाळा संपल्यानंतर चापालचैत्य मुक्कामीं मंडळी आली. तेथें आल्यानंतर मात्र बुद्धानें जीवितसंस्कार सोडून दिले.

वैशालीस नंतर परत येऊन आपला मुक्काम वळचणच्या घरांत ठेवला. तेथें सर्व भिक्षुसंघास बोलावून सर्वांना शेवटचा उपदेश केला. हा उपदेश मात्र अतिशय मोलाचा होता. 'आतां मी जाता. माझीं तत्वें हेच तुमचे गुरु. तुम्ही त्याप्रमाणें वागा' असें कळकळीनें आपलेपणाच्या भावनेनें त्या वेळीं बुद्धानें सांगितलें.

त्यानंतरचा त्याचा मुक्काम पावा नगरीस 'चुंद' नांवाच्या एका लोहाराच्या आम्रवनांत झाला. तेथें मोठा

भोजनसमारंभ झाला. त्या दिवशीं वाजवीपेक्षां जास्त जेवण झाल्यामुळें बुद्धास अजीर्ण झाले. ताबडतोब मुक्काम कुसिनारा येथील मल्लांच्या उपवनांत नेण्यांत आला. तेथें शालवृक्षाच्या छायेंत बुद्धासाठीं शय्या तयार करण्यांत आली त्या वेळीं फुलाचा बहर नसतांना देखील फुलें फुललीं, जणूं काय बुद्धाच्या पूजेकरितां वृक्षवर देखील भक्तिभावानें सज्ज होते. सर्वत्र आनंदीआनंद भरला असतां बुद्ध आनंदास म्हणाला 'आनंदा, हार, फुलें वगैरे सारख्या औपचारिक पूजेपेक्षां माझ्या तत्त्वांचें अनुकरण हेंच माझें पुण्य–स्मरण असें समजा.'

बुद्धगुरु परिनिर्वाण पावत आहे, धर्मसूर्य अस्ताला जात आहे हें ऐकून व पाहून लोक अतिशय चिंतातूर झाले. कित्येकांना अतिशय वाईट वाटलें. 'पुढें काय ?' हा प्रश्न उभा राहिला.

बुद्ध शय्येवर पडून होता. आनंद सेवा करीत होता. बुद्धाला त्या वेळीं उपदेश करावयास सांगणें वा करूं देणें हें इष्ट नव्हतें. परंतु सुभद्र या नांवाचा एक परिव्राजक त्याच वेळीं तेथें आला व 'मला भगवानाचें दर्शन घेऊं द्या व माझ्या शंकाचें निरसन करूं द्या' असें म्हणाला. आनंदानें त्याला पुष्कळ समजावलें परंतु

बुद्ध स्वतःच तें बोलणें ऐकून म्हणाला 'आनंदा, त्याला येऊं दे, विचारूं दे, तो जिज्ञासू आहे आणि त्याला तत्त्वबोध लवकर होईल.'

भगवानानें त्याला उपदेश केला व सर्वांना शेवटचा संदेश सांगितला:—

" भिक्षुहो, सर्व संस्कार व्ययधर्मी आहेत. सावधपणानें वागा ".

हेच तथागताचे शेवटचे शब्द होत.

भगवान बुद्ध ध्यानस्थ झाला व समाधि लावून परिनिर्वाण पावला. त्याबरोबर सर्व भिक्षू शोकग्रस्त झाले सर्वांनाच जीविताधार, धर्माधार, नाहींसा झाल्यासारखें वाटलें. अनुरुद्ध म्हणाला,

' बंधुहो, शोक करूं नका, प्रिय वस्तूंचा वियोग होणार, हें आपणाला भगवंतानें सांगितलें आहे ना ' ?

दुसऱ्या दिवशीं गांवांत बुद्धाच्या परिनिर्वाणाची बातमी पसरली. प्रत्येकजण बुद्धदर्शनासाठीं येऊं लागला. बुद्धाच्या अंगाला उटी लावण्यांत आली. पुष्पमाला घालण्यांत आल्या. नवीन वस्त्रें नेसविण्यांत आलीं. एखाद्या चक्रवर्ती राजाच्या शरीरासारखा गौरव लोकांनीं बुद्धाचा केला.

चंदनाच्या लाकडाची चिता रचण्यांत आली. शरीर तेलाच्या कढईत टाकून चितेवर नेऊन ठेवण्यांत आलें. महाकाश्यप शिष्यपरिवारासह भगवानाच्या दर्शनास येत होता म्हणून वाट पहात मंडळी बसली. इतक्यांत महाकाश्यप तेथें आला. सर्वांनीं बुद्धाचें दर्शन घेतलें व चितेला तीन प्रदक्षिणा घातल्या. चिता पेटविण्यांत आली. शरीर दग्ध झाल्यानंतर मल्लांनीं ती चिता गंधोदकानें विझविली. बुद्धाच्या अस्थि गोळा करून संथागारांत खड्या पहाऱ्यांत ठेविल्या व नाच....गायन....वाद्य वगैरे कार्यक्रम ठरविण्यांत येऊन मोठा महोत्सव सुरू करण्यांत आला.

जेव्हां ही बातमी आजूबाजूच्या देशांतून पसरली तेव्हां बुद्धाच्या अनुयायांनीं बुद्धाच्या शरीराचा अवशेष आपणांस मिळावा अशी इच्छा प्रदर्शित केली. सर्वानुमतें शरीरावशेषाचे आठ भाग करण्यांत आले व त्या आठ भागांवर आठ स्तूप बांधले गेले.

## १४

# बौद्ध धर्माबद्दल थोडी माहिती

मुलांनो, गौतम बुद्धाचें चरित्र संपलें पण गौतमानें स्थापन केलेल्या संप्रदायाची माहिती पुस्तकांत कोठेंहि समाविष्ट करण्यांत आली नसल्यानें ती ह्या प्रकरणांत तुम्हांला समजेल अशा स्वरूपांत देण्याचा विचार आम्हीं केला आहे. गौतमानें सुरू केलेला संप्रदाय आज पुष्कळ ठिकाणीं अस्तित्वांत आहे आणि पुष्कळ ठिकाणीं संघ स्थापन झाले असून त्यांतर्फे त्या धर्मातील सुंदर तत्त्वांवर चर्चा, संशोधनें व इतर वाङ्मय अजून निर्माण होतें आहे. तेव्हां असा हा धर्म तरी काय आहे तें ह्या प्रकरणांत पहावयाचें आहे.

बौद्ध धर्म अत्यंत सरळ धर्म आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारचीं बंधनें नाहींत. कोणत्याहि प्रकारची तपश्चर्या सांगितली नाहीं. कोणत्याहि प्रकारचें व्रत नाहीं किंवा उद्यापन नाहीं पण अगदीं साधा आणि सरळ असा धर्म आहे तो ! त्याचें आचरण करतांना कोणी आप-

त्याला हटकणार नाहीं किंवा आपणांकडे बोट दाखवून हा 'बौद्धधर्मी' म्हणून हेटाळणी करणार नाहीं. पण उलट आपले विचार, उच्चार व आचार पाहून प्रत्येकजण आपलें अनुकरण करील इतक्या उच्च प्रतीचा हा धर्म आहे. बघूं या तेव्हां आपण ह्या धर्माचीं थोडीशीं तत्त्वें!

गौतम बुद्धाच्या काळीं वैदिक धर्म प्रचलित होता आणि त्याच धर्माचा प्रत्येकजण अनुयायी असणं स्वाभाविक होतें. त्याची विशेष चलती असल्यानें त्यास सर्वमान्यता आली होती. लोकांनीं धर्माचें आचरण करावें आणि सुखानें संसार करावा असा क्रम चालला होता. सुखोपभोग भोगावेत, धर्माचरण करावें म्हणजे मोक्ष मिळतो ही एक भावना आणि पंचाग्निसाधन, उपास तापास काढणें, कांट्यांच्या शय्येवर निजून रहाण्यासारखी खडतर तपश्चर्या करणें वगैरे आत्मदंडन करूनच मोक्ष मिळतो ही दुसरी भावना तत्कालीन समाजांत रूढ झाली होती. पण ह्या दोहोंमधील मार्ग गौतम बुद्धान शोधून काढला व त्याच्या आचरणानें देखील मोक्षपद-प्राप्ति होते असें सांगितलें. ह्या बौद्ध धर्माच्या सुवर्णमध्यास 'मध्यमाप्रतिपदा' असें नांव आहे. ह्यालाच बुद्धाचा 'आर्य अष्टांगिकमार्ग' म्हणून देखील म्हणतात.

• किती सुंदर तत्वें आहेत पहा तीं! त्यांच्या अनुक्रमांत देखील तर्कशुद्धता आहे पहा !! अष्टांगिक मार्गाचें पहिलें अंग कोणतें तर **सम्यक्‌दृष्टि**. जगांतील कोणत्याहि वस्तूकडे बघतांना आपण आपला दृष्टिकोन चुकीचा धरला कीं त्या वस्तूचें आपणाला होणारें ज्ञानदेखील चुकीचें होतें. त्यासाठीं आपल्या ठायीं वस्तूकडे बघण्याची खरी कला येणें अत्यंत अवश्य असतें आणि ती येणें विचारांवर अवलंबून असतें. विचार करण्याची शक्ति आपणांला प्राप्त झाली कीं आपल्याला खरेंखोटें, चांगलेंवाईट आपोआप कळूं लागतें आणि आपल्याला सम्यक्‌दृष्टि प्राप्त झाली असें आपण म्हणतों. दुसरें अंग **सम्यक् संकल्प**. आपली दृष्टि बरोबर असली तर आपले विचारहि तितकेच बरोबर असणार त्याचप्रमाणें सम्यक्‌दृष्टीमुळें उत्पन्न झालेल्या विचाराअंतीं केलेले संकल्पदेखील तितकेच सत्य असणारच. तिसरें व चौथें अंग **सम्यक् वाचा व सम्यक् कर्म.** मागें सांगितलेंच कीं विचार व उच्चार ह्यांमध्यें एकवाक्यता असली कीं आपणाकरवीं घडणारे आचारदेखील विचार व उच्चारांशीं सुसंगत असणारच. तेव्हां विचार, उच्चार आणि आचार हीं सर्व एकमेकावलंबी आहेत हेंहि लक्षांत ठेवावयास हवें. पांचवें अंग

**सम्यक् आजीव.** मनुष्यानें निर्वाहाचें साधन चोरी, चहाडी वगैरे सारख्या वाममार्गानें मिळवूं नये असा ह्या मार्गाचा उपदेश आहे. सहावें अंग **सम्यक् व्यायाम.** ह्यांत स्वतःच्या अंगच्या वाईट खोडी टाकून देऊन अंगीं चांगल्या संवयी लावून घ्याव्यात असा उपदेश केला आहे. सातवें अंग मात्र सांगतांना प्रत्येकाला जगांत आपलें कर्तव्य काय आहे हें जाणून तदनुरोधानें वर्तन करावयास शिकविलें आहे. ह्या **कर्तव्याची जाणीव** उत्पन्न करून देणाऱ्या अंगास **सम्यक् स्मृति** असें नांव आहे. शेवटचें अंग म्हणजे **सम्यक् समाधि.** चित्ताची एकाग्रता झाल्या-खेरीज ह्या मार्गाचा अवलंब करतां येणार नाहीं. चित्त-शुद्धि होण्यासाठीं लोभ, द्वेष आणि मोह ह्यांपासून पूर्ण अलिप्त रहावें लागतें आणि मैत्रा, करुणा, मुदिता आणि उपेक्षा ह्या चार सद्भावनांचा विकास करावा लागतो तेव्हां चित्तशुद्धि होऊं शकते. अशाप्रकारें चित्तशुद्धि झाल्यानंतर 'सम्यक् समाधि' ह्या अंगाचा आपणाला स्वीकार करतां येणें शक्य आहे.

वरील मध्यमाप्रतिपदेंत काय नाहीं ? सर्व कांहीं आहे. ह्या तत्वांचा अंगिकार प्रत्येकजण करूं शकेल. अमुकच आचार करावयास पाहिजेत, अमकाच कुलधर्म

करावयाला पाहिजे अशा प्रकारचा 'धार्मिकपणा' मात्र नाहीं आणि म्हणूनच हा धर्म इतर धर्मांचीं बंधनें पाळूनहि आचरितां येतो. या धर्माचें आचरण करतांना 'पांच शीलें' मात्र संभाळावीं लागतात. तीं अशीं:-

१ हिंसा न करणें. २ चोरी न करणें. ३ खोटें न बोलणें. ४ ब्रह्मचर्य पाळणें व ५ मद्य न पिणें.

वरील सर्व विवेचनावरून आपल्या लक्षांत येईल कीं हा धर्म नवीन नवीन म्हणतात तसा नसून तत्कालीं प्रचलित असलेल्या धर्मांत सुधारणा होती. विशेषत: ज्यांत अतिशय हिंसा होत असे अशा यज्ञसंस्थेवर बुद्धाचा कटाक्ष होता. म्हणूनच थोड्या फेरफारानें त्यान नवीन धर्म अमलांत आणला. सर्व जग दु:खमूलक आहे, त्या दु:खाचें कारण अज्ञान व लोभ हें आहे, अशा ह्या दु:खमय परिस्थितींतून स्वत:ची सुटका करून घेण्याची इच्छा असेल तर प्रत्येकानें 'मध्यमाप्रतिपदा' आचरावी, असा भगवानाचा उपदेश होता.

बौद्ध धर्माची सुरुवात तर मोठी छान झाली त्यास मगध आणि कोसल देशांच्या राजांनीं आश्रय दिल्यामुळें त्या धमाचा चांगला प्रसार झाला. राजाश्रय आणि लोकाश्रय दोन्हींहि मिळाल्यामुळें धर्माचा प्रसार दूरदूरच्या देशां-

तून झपाट्यानें होऊं शकला आणि तत्त्वांच्या सुंदरतेमुळें धर्म आजपावेतों टिकूं शकला व अजूनहि टिकेल ह्यांत शंका नाहीं.

बौद्ध धर्माचे परिणाम काय झाले असें कोणी विचारलें तरीदेखील आपल्याला अभिमानानें सांगतां येण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत त्यापैकीं खालील प्रामुख्यानें लक्षांत ठेवण्याजोग्या आहेतः–

१ 'अहिंसा परमो धर्मः' हें तत्व बौद्ध आणि जैन ह्यांच्या धर्मांच्या प्रभावामुळें सर्वमान्य झालें आहे. सर्वांठायीं असलेल्या जीवाची हिंसा होऊं न देणें हें अत्यंत रमणीय तत्व बौद्ध धर्मानें शिकविलें.

२ बौद्ध धर्माचा कलेवर फार परिणाम झाला. चीन जपान, सायबेरिया, अफगाणिस्थान येथपर्यंत असलेलीं प्रेक्षणीय स्थळें बुद्धकालीन शिल्पकलेचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेत.

३ 'चातुर्वर्ण्यव्यवस्था' व तिचा समाजावर होणारा तीव्र परिणाम कमी करण्याकडे बुद्धाचा कल होता. त्यानें जातिभेदाची तीव्रता कमी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला परंतु तो विशेषसा यशस्वी झाला नाहीं.

तेव्हां अशा प्रकारचा हा बौद्धधर्म तत्वांच्या साधेपणामुळें अनुकरणीय नाहीं असें कोण म्हणेल ?

इति ।

बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

# आधारभूत ग्रंथांची यादी.


१ बुद्धचरित्र (विविधज्ञानविस्तारांतील लेखमाला) } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

२ बौद्धसंघाचा परिचय. } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

३ बुद्धलीलासारसंग्रह. } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

४ जातकांतील निवडक गोष्टी—प्रथमार्ध—स्वकृत.

५ दीघनिकाय-महापरिनिब्बाण सुत्त-प्रो. राजवाडेकृत.

६ मज्झिम निकाय.

७ महाराष्ट्रीय ज्ञानकोश—बुद्धोत्तर जग.
संपादक—डॉ. श्री. व्यं. केतकर.

८ Some Ancient Indian Kings. By—Dr. Vimal Charan Law, PHD., MA, B. L.

९ Mannual of Buddhism. By Dr. Kern.


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५२६९

# परिशिष्टें.

# १

## सासऱ्यानें ' आई ' म्हटलें !

### ( विशाखा )

अनाथपिंडिकाप्रमाणेंच घनंजय श्रेष्ठी या नांवाचा एक नवकोट नारायण श्रावस्ती टापूंत रहात असे. त्यास विशाखा नांवाची सुशील, सुविद्य आणि सुरुप अशा तिन्ही सकारांनीं संपन्न अशी एक मुलगी होती. बुद्ध व त्याचा संघ ह्यांच्याबद्दल तिला लहानपणापासून ' ज्ञान ' असल्यामुळें ती बुद्धधर्माची अनुयायी बनली होती.

तिचें लग्न मिगार नांवाच्या जैनधर्मानुयायी व्यापाऱ्याच्या मुलाशीं झालें. सून बुद्धधर्मी आणि सासरा जैनधर्मी अशा प्रकारचें हें धार्मिक वैमनस्य घरांत दिसूं लागलें. ' मुलीचा अपराध दिसल्यास त्याची चौकशी गांवांतील आठ कुलीन माणसांमार्फत व्हावी ', असें व्याह्याव्याह्यांच्या कबूलातींत ठरलें होतें. पण मुलीचा प्रत्यक्ष अपराध दिसल्यावाचून चौकशी तरी कसली करणार ? लवकरच मुलीच्या वर्तनांत पालट दिसून आला. तो प्रसंग असा:—

एके दिवशीं मुलीच्या लग्नसमारंभानिमित्त मिगारानें कांहीं जैन साधूंना भोजनास निमंत्रण केलें. भोजनसमारंभ झाल्यानंतर मिगारानें सुनेनें दर्शनाला यावें अशी इच्छा प्रदर्शित केली. त्याबरोबर विशाखा व्यवस्थित असा पोषाख करून दिवाणखान्यांत गेली. ते नागडे उघडे, साधू पाहून तिला तिट्कारा उत्पन्न झाला व ती म्हणाली 'ह्यांना कां नमस्कार करावयाचा ? हे कसले साधू ! ह्यांना कां अर्हन्त म्हणतात ? ' असें म्हणून नमस्कार न करतां ती चटकन् निघून गेली.

त्या चिमुरडीनें आपला अपमान केला असें जैन साधूंना वाटलें. मिगाराला देखील वाईट वाटलें व अपमानाची भावना मनाला चाटून गेली. तरी पण 'सून लहान आहे....होईल शहाणी ' असें म्हणून घडलेल्या प्रसंगाबद्दल मिगारानें रदबदली केली.

नंतर मिगार स्वतः जेवावयास बसला. तो जेवणांत गुंतला असतां एक बुद्धभिक्षू दाराशीं येऊन उभा राहिला. त्याला विशाखा म्हणते ' माझा सासरा जुनें पुराणें खातो आहे. तेव्हां थांबूं नका. पुढें चला. '

हे शब्द ऐकतांच मिगार चिडला. मी जुनेंपुराणें

ता. २९/६/

खातों काय ?....घेऊन जा ही खीर....नको मला....बा ह्या पोरीला घराबाहेर हांकलून....माझा अपमान करते, नाहीं ?'

त्याची किंवा इतर नोकरांची तिच्या अंगाला हात लावण्याची छाती नव्हती. कबूलातीप्रमाणें आठ कुलीन गृहस्थांची समिती बोलाविली. मिगारानें विवाद केला आणि समितीनें 'तिचा कोणत्याहि प्रकारचा अपराध दिसत नाहीं' असा निर्णय दिला. उलट तिच्या वाक्यां-तल्या खुबीदार खोंचा मिगाराच्या लक्षांत न आल्याबद्दल समितीनें त्यालाच दोष दिला. समितीसमक्ष मिगारानें विशाखेला विचारलें–

मिगार:–तुझ्या वडिलांनीं सांगितलेले दहा नियम[1] आठवतात ना तुला ?

विशाखा:–होय.

---

[1] धनंजयानें विशाखेला केलेला उपदेश असाः—

१ आंतील आग बाहेर आणूं नये. २ बाहेरची आग आंत आणूं नये. ३ देणारालाच द्यावें. ४ न देणाराला देऊं नये. ५ देणारा किंवा न देणारा असला तरी द्यावें. ६ सुखानें बसावे. ७ सुखानें जेवावे. ८ सुखानें निजावें. ९ अग्नीची पूजा करावी. १० गृहदेवतांची पूजा करावी.

मिगार:-ते नियम तूं आतांशा बरोबर पाळीत नाहींस.

विशाखा:—कुठें माझी चूक झाली ?

मिगार:—म्हणजे तुझ्या मतें कांहींच चुकलें नाहीं म्हणायचें ! तूं त्या नियमांचा अर्थ तरी काय करतेस, कळूं दे एकदां.

विशाखा: माझ्या दृष्टीनें होणारा त्या नियमांचा अर्थ समिती ऐकत असल्यास मी सांगते.

समितीनें रुकार दिला व तिनें अर्थ सांगितला. तिचें तें एखाद्या आदर्श स्त्रीप्रमाणें केलेलें विवेचन ऐकून सर्वांची तिच्या नीतिनिपुणतेबद्दल खात्री झाली.

ह्यानंतर तिनें त्याच समितीपुढें स्वतःचें म्हणणें मांडलें तें असें:—

' सासरा जैन धर्मानुयायी असल्यामुळें त्याला जसा जैन साधूंना अन्नसंतर्पण करण्याचा अधिकार आहे तसाच मी बुद्धधर्माची अनुयायी असल्यामुळें मलाहि बौद्धभिक्षूंना दान देण्याचा अधिकार असावा.

समितीनें व मिगारानें देखील खुषीनें तिची विनंति मान्य केली. तिनें लगेच संधि साधून बौद्ध भिक्षूंना निमं-

त्रण केलें. जैनधर्मीयांना तें तिचें करणें पसंत न पडून त्यांनीं मिगाराची खूप निर्भत्सना केली. 'बुद्ध महा मायावी आहे. तो आपणाकडे मंडळींना आकर्षून घेतो,' इत्यादि गोष्टीं सांगितल्या. मिगाराला देखील प्रश्न पडला 'बाद्धाशीं मी संबंध ठेवणार नाहीं. बुद्धाचें दर्शन घेणार नाहीं,' असें त्यांना त्यानें अभिवचन दिलें तेव्हां ते तेथून गेले.

बुद्ध व त्याच्या संघाचें जेवण झाल्यानंतर विशाखानें बुद्धाला प्रवचन करण्याची विनंति केली. मिगाराला उपदेश ऐकण्यासाठीं बोलाविण्यांत आलें. पण तो येईना. तो अखेरीस पडद्याआड बसून उपदेश ऐकण्यांस तयार झाला. बुद्धानें आपल्या अमृततुल्य वाणीनें दान, शील, भावना इत्यादिकांवर प्रवचन केलें. मिगाराला वाटलें 'बुद्धासारखा उपदेश करणारा इतका जवळ असतां, उगाच दुसरीकडे कां पायपीट करावी? कल्पवृक्षाच्या तळीं बसल्यावर मनांत दुसऱ्या वृक्षाची आवड कां असावी?' त्यानें पुढचा पडदा बाजूस सारला व भगवान बुद्धाच्या पायांवर डोकें ठेवलें. त्या दिवसापासून तो बुद्धधर्मानुयायी बनला. विशाखेमुळें 'हरपलें

श्रेय ' सांपडलें म्हणून तो तिला मातेसमान मानूं लागला तेव्हांपासून तिला लोकदेखील 'मिगारमाता' ह्या नांवानेंच ओळखूं लागले. हीच बुद्धाची सर्वांत श्रेष्ठ अशी उपासिका म्हणून समजली जात असे.

# २

## निवडक शिष्यांचीं चरित्रें

### सारिपुत्त उपतिश्य[1] आणि मोग्गल्लान कोलित[1].

हे दोघेहि जातीनें ब्राम्हण होते. भगवान बुद्धापेक्षां वयानें ते दोघेहि मोठे होते. 'सारी' नांवाच्या ब्राम्हणीचा मुलगा म्हणून 'सारिपुत्त' आणि 'मोग्गली' नांवाच्या ब्राम्हणीचा मुलगा म्हणून 'मोग्गल्लान' अशी त्यांचीं नांवें आईच्या नांवावरुन ठेवण्यांत आलीं होतीं. उपतिश्य आणि कोलित ह्या घराण्यांचा संबंध अतिशय निकटचा असल्यामुळें हे दोघेहि मुलगे एकमेकांचे जिवलग सोबती बनले होते. कोठेंहि पहा, ही दुकळ नेहमीं एक ठिकाणीं सांपडायची. मग तें फिरणें असो, अभ्यास करणें असो वा कोठें देशाटन असो-हे दोघे एकमेकांपासून सहसा कधींहि दूर होत नसत.

दोघांचीं मनें कशीं मिळालीं होतीं ह्याचें उत्तमसें उदाहरण आपणांला पुढील गोष्टींत आढळून येईलः—

एकदां राजगृहानजिक असलेल्या एका टेकडीवर दरवर्षी भरणारी कसलीशी यात्रा भरली होती. यात्रेंत

---

१ कर्नाटकांत गांवांचीं नांवें तींच माणसांचीं आडनांवें समजलीं जातात. उपतिश्य आणि कोलित ही गांवांचीं नांवें आहेत.

होणारे निरनिराळे खेळ पहाण्यासाठीं ही दुकल गेली. त्यावेळीं डोळ्यापुढें दिसत असलेला मनोरंजक देखावा बघतांना दोघांच्याहि मनांत 'शंभर वर्षांनंतर या सर्व वस्तूंचा नाश होईल' असा विचार आला. दोघेहि विचारांत दंग झाले. डोळयांत पाणी चमकूं लागलें. पुढचा देखावा अंधुक दिसूं लागला. तोंडेंदेखील म्लान दिसूं लागलीं. एक दुसऱ्यास विचारतो 'कां, रे, काय झालं?' दुसऱ्यानें आपल्या मनांत आलेला विचार सांगितला, आणि पहिल्यानेंहि 'अगदीं तेच विचार माझ्या मनांत आले रे,' असें म्हणून पाठीवर थाप दिली.

त्याच ठिकाणीं, त्याचवेळीं दोघांनीहि संन्यास घेण्याचा विचार केला संसारमार्गाची वाट न धरतां, मोक्षाच्या वाटे-कडे जाऊन, देव आपलासा करून घेण्याची त्यांना बुद्धि झाली; म्हणून ते त्याच गांवांत असलेल्या संजय नांवाच्या परिव्राजकाचे शिष्य झाले.

परंतु संजयाच्या उपदेशान मनाला शांति मिळेना. तेव्हां इतर धर्मांच्या चर्चेपासून आपणाला खऱ्या मार्गाचा बोध झाला तर आपण त्या मार्गाचें अवलंबन करावें असें त्यांना वाटलें. त्याचवेळीं बुद्धाच्या भिक्षूसंघाची स्थापना झाली असल्यामुळें बुद्धभिक्षू स्वधर्मप्रसारार्थ इकडे-

तिकडे फिरत होते. योगायोग असा आला कीं भगवान् बुद्ध त्याचवेळीं राजगृहाला आला. बुद्धभिक्षूंपैकीं एक भिक्षू गांवांत भिक्षा मागत असतां अगदीं सहजासहजीं सारिपुत्ताच्या नजरेस पडला. त्याची ती प्रसन्न चर्या पाहून 'याला मनःशांति लाभली आहे' असे सारिपुत्ताला वाटलें. म्हणूनच अशा प्रकारची मनःशांति कोठें व कशी मिळेल ह्याचा तपास करण्याचा त्यानें निश्चय केला. बुद्धभिक्षूला सारिपुत्तानें फुरसदीच्या वेळीं गांठलें व विचारलें–'तुला ही मनःशांति कशी मिळाली? तुझा गुरु तरी कोण?' बुद्धभिक्षूनें आपला गुरु भगवान् बुद्ध असल्याबद्दलचें सांगितलें व बुद्धधर्माचीं तत्वें देखील थोडक्यांत पण व्यवस्थितपणें सांगितलीं तीं ऐकून सारिपुत्ताला 'हा मार्ग बरा' असें वाटलें. मित्र मोग्गल्लान ह्याला ती हकीकत सांगितली व त्यानें आपल्या अनुयायांसह बुद्धधर्माचा स्वीकार करण्याचा निश्चय प्रदर्शित केला.

ह्याप्रमाणें नुसत्या विचार आणि उच्चारावर अवलंबून न रहातां प्रत्यक्ष आचार ह्या दृष्टीनें त्यांनीं अडीचशें मंडळींसहवर्तमान बुद्ध–वसतीचें ठिकाणीं येऊन भगवंताला वंदन केलें व बुद्धाचें शिष्यत्व पत्करलें.

त्यावेळीं गौतमानें त्यांना 'ब्रह्मचर्य' आचरण्याचा उपदेश केला.

सारिपुत्त उपतिश्य ह्याला 'महाज्ञानी' व मोग्गल्लान कोलित ह्याला 'बुद्धिमान' असें बुद्धानें स्वतः म्हटलें आहे.

---

## महाकाश्यप.

ह्या देखील एका श्रीमंत ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याच्या जन्मकालाबद्दल निश्चित माहिती मिळत नाहीं. त्याचें नांव पिप्पली असें होतें. तो मोठा झाल्यावर आईनें त्याच्या मागें लग्नाचा तगादा लावला. 'मला सुनमुख पाहूं दे' ही आईची इच्छा कशी पूर्ण करावी ह्या विचारांत तो गढला. त्याला एक विचार सुचला व एक सहस्र मोहरा खर्च करून सोनारापासून सुंदर स्त्रीची पूर्णाकृति (Life-size) मूर्ति त्यानें करवून घेतली. आईला चकवावें व कांहीं काळपर्यंत टाळाटाळी करावी हाच त्याचा मुख्य उद्देश असल्यानें त्यानें ती मूर्ति आईला दाखवून म्हटलें 'बघ आई, इतकी सुंदर बायको तूं मला मिळवून देशील तर मला लग्न करावयाचें आहे. नाहीं तर नाहीं.'

त्याची खात्री होती कीं इतकी सुंदर स्त्री मिळणार नाहीं व आपलें लग्न कांहीं होणार नाहीं. आणि मग आपलें इच्छित ( मोक्षप्राप्ति ) सहज साध्य करून घेतां येईल.

पण आई कसची स्वस्थ बसावयाला ? तिनें अनेक परिश्रम करून वधूसंशोधन चालविलें. मद्रदेशच्या मुली अत्यंत रूपसंपन्न असतात म्हणून ख्याति होती. ती कीर्ती ऐकून वधूशोधनार्थ निघालेले ब्राह्मण मद्रदेशीं सोन्याच्या बाहुलीसह येऊन दाखल झाले बाहुली नदी-कांठीं उभी केली. अनेक स्त्रिया घांटावर पाणी भरीत होत्या. ब्राह्मण संध्यावंदनादि कर्में करण्यांत गुंनले होते. नदीकांठीं उभी केलेल्या बाहुलीचा चेहेरा ओळखीचा वाटल्यावरून एका बाईच्या मुखांतून उद्गार निघाला 'तूं ग इकडे कोणीकडे ? ' 'तूं' कोणाला म्हणालीस म्हणून त्या बाईला ब्राह्मणांपैकीं एकानें प्रश्न केला. तेव्हां त्या बाईनें सांगितलें कीं, 'मला वाटलें कौशिकाची 'भद्रा' आहे. म्हणून मीं म्हटलें पण पाहते तों जड बाहूलीच आहे कीं ? '

ब्राह्मण कौशिकाकडे गेले आणि कौशिक--काश्यप यांचा संबंध जोडून आणण्याची इच्छा दर्शविली. कौशिकानें काश्यपासारखें स्थळ चालून आलेलें पाहून रुकार दिला व भद्रा–काश्यपाचा विवाह ठरला. तथापि विवा-

हाला दोघेहि–वधूवर–नाखुष होतीं. आईबापाच्या आग्रहावरून त्यांचें 'शुभ मंगल' झालें परंतु 'सावधान' होण्याचा त्या दोघांची इच्छा तितकीच अपुरी राहिली.

दोघांचींही मातापितरें कैलासवासी झाल्यामुळें त्यांचा मार्ग मोकळा झाला. एके दिवशीं काश्यपानें भद्रेला म्हटलें––

'हें आहे हें सर्व तुझें आहे'

ती–'मला काय करायचंय ?'

तो–'मी तर प्रवज्या घेणार !'

ती–'मी पण येणार'

तो–'चल....चल तर ! !'

असें म्हणून तीं दोघेहि निघालीं. नोकरचाकरांनीं त्यांना मागें फिरण्याचा पुष्कळ आग्रह केला परंतु त्यांचा निश्चय ढळला नाहीं. ते पुढें चालले एका ठिकाणीं मात्र थांबले. रस्ता दुभंगला होता. दोन वाटा दोन दिशेला जात होत्या. काश्यप म्हणाला--'भद्रे, आपण दोघेहि चाललों आहोंत खरें; पण लोक आपणाकडे बोटें दाखवितात. तेव्हां तूं या मार्गानें आणि मी ह्या दुसऱ्या मार्गानें असें जाऊं या, म्हणजे बरें'. असें म्हणून दोघेहिं एकमेकांपासून दुरावले

काश्यपाला भगवान बुद्धाची भेट रस्त्यांतच झाली. त्याच्या जवळचा कापडाचा तुकडादेखील भगवानानें मागून घेतला व आपल्याजवळ असलेली चिंध्यांची चौघडी त्याला दिली.

त्या दिवसापासून काश्यप चिंध्या पांघरीत असे त्याला कोणत्याही प्रकारचा अभिमान नव्हता. ‘ माझा उपदेश लोकांनीं ऐकावा आणि मी त्यांत धन्यता मानावी ’ असें त्यास मुळींच वाटत नसें तो लोकांना इतक्या श्रद्धाळू अंतःकरणानें उपदेश करीत असे कीं त्याचा ठसा लोकांच्या मनावर चांगलाच उमटत असे. अत्यंत साधेपणानें वागण्यांत ‘ हा श्रेष्ठ ’ असें भगवान बुद्ध काश्यपाबद्दल म्हणत असे.

## आनंद.

गौतमबुद्धाचा हा चुलत भाऊ अनुरुद्धाबरोबर पांच शाक्यकुमारांनीं प्रव्रज्या घेतली त्यांतला हा एक हा इतका बहुश्रुत होता कीं बुद्धाच्या पश्चात् भगवंताच्या उपदेशाचें संकलन करण्यास त्याची बरीच मदत झाली. आनंद खरा भक्त होता कोणत्या वेळीं भगवंताला काय पाहिजे;

कोणाची कशी भेट करून द्यावी; हें त्याला नेमकें कळत असें. तो सेवेंत अत्यंत कुशल व दक्ष असे आणि म्हणूनच बुद्धानें त्याला बहुश्रुत - श्रुतिमान—उपस्थायक अशा पदव्या दिल्या, व प्रत्यक्ष 'श्रेष्ठपद' देखील त्यालाच दिलें आहे.

---

## महाकात्यायन.

हा उज्जयिनीचा राजा चंडप्रद्योत याच्या पदरीं असलेल्या पुरोहिताचा मुलगा. हा वेदशास्त्रसंपन्न लवकरच झाल्यामुळें बापाची मानाची जागा त्याला मिळाली. त्यावेळीं बुद्धधर्माचा प्रसार जारीनें सुरुं होता. जिकडेतिकडे भगवान बुद्ध, भिक्षुसंघ, बौद्धधर्म यांच्या संबंधीं चर्चा ऐकूं येत होती. दूरवर असलेल्या उद्यानांतून येणारा सुगंध आपणाला ज्याप्रमाणें उद्यानाकडे खेंचून घेऊन जातो. त्याप्रमाणें कीर्ति—पुष्पाचा दरवळणारा सुगंध देखील मूळ स्थानाकडे जाण्याची इच्छा आपल्या मनांत उत्पन्न करतो. साहजिकच बुद्धाची कीर्ति ऐकून भगवान् बुद्धाचें दर्शन घेण्याची इच्छा चंडप्रद्योत राजाला झाली.

महाकात्यायनाला त्यानें आपली इच्छा कळविली

व 'भगवान् बुद्धाला उज्जयिनीस घेऊन ये' अशी आज्ञा केली. राजाज्ञेप्रमाणें तो निवडक परिवारासह जाण्यास निघाला. पण जातांना राजाला 'आपणाला प्रव्रज्या घेण्यास परवानगी देत असाल तरच मी जातों' अशी एक अट घातली होती.

\+ + +

प्रवास संपला. बुद्धवसतीचें ठिकाण आलें. आपल्या बरोबरचा परिवार घेऊन तो भगवंतांच्या दर्शनाला गेला. उपदेश चालला होता. भक्तिभावानें सर्वजण श्रवण करीत बसले होते. भगवान बुद्ध आपल्या वेगवती वाणीनें भिक्षूंस अतिशय कळकळीनें उपदेश करीत होता. त्याचा तो उपदेश ऐकून महाकात्यायन व त्या बरोबरीची मंडळी अगदीं आश्चर्यचकित झाली व तेथेंच त्यांनी बौद्धधर्माची दीक्षा घेण्याचा विचार केला.

\+ + +

'महाकात्यायन संक्षिप्त उपदेशाचा विस्तारानें अर्थ करण्यांत अतिशय तरबेज होता' असें बुद्ध स्वतः त्याज बद्दल ह्मणत असे. ह्या गोष्टीचें प्रत्यंतर आपणाला पुढील संवादावरून पटेल.

राजा —ब्राह्मण वर्ण श्रेष्ठ आणि दुसरे सर्व वर्ण हीन.

ब्राह्मणांनाच मोक्ष, इतरांना नाहीं. ब्राह्मण ह्मणे ब्रह्माच्या मुखापासून उत्पन्न झाले असें ह्मणतात. आपलं काय मत आहे ह्याबद्दल ?

कात्यायन:–ही पोकळ बडबड आहे. अहो, इतर जातींचे लोक श्रीमंत झाले तर ब्राह्मणलोक त्यांच्या घरी पाणी भरतील.

राजा:-हो....नाहींतर कुठें जातील ?

कात्यायन:-हें जर खरे तर मग अमका उच्च वर्णाचा आणि अमका नीच वर्णाचा या बोलण्यांत काय तथ्य राहील ?

राजा: खर आहे

कात्यायन:–आणखी असं पहा. ब्राह्मणानें पातक केलं तर तो नरकांत जाणार नाहीं ! अन् शूद्रानें केलं तर तो जाईल, हें कधीं शक्य आहे !

राजा:-अर्थातच नाहीं. सगळे सारख आहेत. माणसानें गुन्हा केला कीं त्याला शिक्षा ही पाहिजेच !!

कात्यायन:-ब्राह्मण जर भिक्षु झाला तर त्याला मान अन् बाकीच्याला नाहीं !

राजा:–छे....छे....असें होणें शक्य नाहीं !

कात्यायनः—मग असं जर आहे तर ब्राह्मणच श्रेष्ठ कां! सगळेच सारखे.

---

## किसा गोतमी

ही श्रावस्ती नगरीं रहाणाऱ्या एका गरीब कुटुंबांत वाढलेली मुलगी. वयोमानानुसार तिचें लग्न झालें परंतु त्यावेळीं रूढ असलेल्या चालीरीतीस अनुसरून ही गरीबाची मुलगी म्हणून सासरीं तिचा छळ होत असे. परंतु तिला मुलगा झाल्यानंतर ती पांढऱ्या पायाची नसून ती ' गृहाची शोभा ' आहे असें तिच्या सासरीं वाटूं लागलें. पण त्या सुखापोटीं पुढील दुःखाचा जन्म असल्यानें तें सुख त्या बिचारीला उपभोगितां येण्यासारखें नव्हतें. कांहीं काल लोटल्यानंतर तिच्या आनंदानें नाचणाऱ्या बागडणाऱ्या मुलास कांहीं रोग होऊन तो अंथरुणास खिळला व त्या रोगांतच त्याचा अंत झाला. एकुलतें एक मूल आपणापासून मृत्यूनें हिरावून नेल्यामुळें तिच्या हृदयाला एकदम धक्का बसला. ती जवळ जवळ वेडीच झाली आणि प्रत्येकाला ' ह्याला कांहीं तरी औषध द्या हो ' म्हणून म्हणूं लागली. पण मेलेल्याला

औषध काय देणार ? म्हणून कित्येकांनीं तिचें तें म्हणणें हंसण्यावारीं घालविलें. पण एकानें 'त्या समोरच्या विहारांत भगवान् बुद्ध रहातो त्याच्याकडे मुलाला घेऊन जा म्हणजे तो कांहीं तरी औषध देईल' असं सांगितलें.

आशा ही मोठी विचित्र वस्तु आहे आशेनें बद्ध झालेला तिचा जीव स्वतःच्या मुलासाठीं वाटेल तें करण्यास तयार झाला होता. मायेचा पीळ तिच्या जिवाला पडल्यामुळें ती मुलासाठीं कांहींहि करण्यास तयार झाली होती. अशा परिस्थितींत भगवान बुद्धासारखा वैद्य आपणांस मिळाल्याबद्दल तिला एक प्रकारची धन्यता वाटली आनंद वाटला आणि जिवाला हायसें वाटलें.

तिनें मुलाला बुद्धाकडे नेलें. भगवंतानें तिला पाहातांच तिची इच्छा जाणली व तिला म्हटलें 'बाई, तुला वाटतें तें खरें पण तूं असें कर....या गांवांतच बघ.... दुःखाचा लवलेशहि नाहीं अशा घरांतून मला मूठभर मोहोऱ्या आणून दे मग आपण पाहूं या'

× × × ×

बाई गेली. गांवांतील प्रत्येक घरीं जाऊन तिनें आपली करुण कहाणी सांगितली व माझ्या बाळास वांचविण्याकरतां तुम्ही मदत करा हो' म्हणून म्हणाली.

प्रत्येकानें तिचें बोलणें शांतपणें ऐकून घेतलें व घडलेल्या प्रसंगा बद्दल सहानुभूति दर्शविली आणि तिला सांगितलें, 'बाई, मरण हें जगांत प्रत्येकाला येणारच. आणि प्रत्येक घरांत जन्ममरण हे संस्कार आहेतच तेव्हां आमच्या घरांतल्या मूठभर मोहऱ्या तुझ्या काय उपयोगाच्या ? जगांत जें जें उदयाला येतें त्याचा अस्त हा ठरलेला असतोच ! तेव्हां मिळाल्याचा आनंद आणि गेल्याचें दुःख आपण कां मानावें ?' प्रत्येकाचीं हीं पिधानें ऐकून बाईला विचार करण्याची शक्ति प्राप्त झाली. त्यामुळें तिचें दुःख हलकें झालें व जगांत तसा सुखी नाहीं ह्याची सत्यता पटली.

ती गंभीर मुद्रेनें विहारांत आली बुद्धाला नमस्कार केला, बुद्ध हंसला व म्हणाला 'जगांत कोणी सुखी आहे कां ? सर्वांच्या पाठीमागें कांहींना कांहीं तरी दुःख लागलेलेंच आहे. तेव्हां ह्या नियमाला तूं तरी अपवाद कां व्हावेंस ? आतां भोग हा भोगलाच पाहिजे.' हें भगवानाचें भाषण ऐकून तिच्या मनांत एकदम प्रेरणा झाली आणि ती तेथेंच भिक्षुणी झाली.

## बुद्धद्वेष्टा देवदत्त.

देवदत्त आणि कोकालिक हे दोघेहि बुद्धाचे द्वेष्टे होते. एखाद्याचा होत असलेला उत्कर्ष बघवेनासा झाला म्हणजे त्याला म्हणून पाडण्यासाठीं मनुष्य जसे नाना प्रकारचे प्रयत्न करतो त्याप्रमाणें देवदत्तानें बुद्धाची बदनामी....बुद्ध धर्माचा नाश, बुद्धाचा नाश करण्याकरतां अनेक प्रकारचें प्रयत्न केले त्यांपैकीं कांहीं थोडे आम्ही ह्या प्रकरणांत देत आहोंत.

देवदत्त ह्याला अजातशत्रु राजाचा पाठिंबा असल्यामुळें बुद्धाविरुद्ध चळवळ करण्यास चांगलीच संधी मिळाली. 'मीच बुद्ध, माझाच हा परिवार, असें लोकांना सांगत असे. आणि कांहीं लोकहि त्याच्या ठायीं असलेल्या प्रभावामुळें मोहित झाले होते त्याचा कोकालिक ह्या नांवाचा एक अनुयायी होता तो आणि हा असे दोघे गांवांमधून 'अहो रुपम् अहो ध्वनिः' ह्या सारखी एकमेकांची स्तुतिस्तोत्रें गावून लोकांपासून पैसे मिळवीत असत व 'आम्हीच धर्मपालक आहोंत' असा टेंभा मिरवित असत.

बुद्धाबद्दल देवदत्ताच्या मनांत अगोदर आढी होतीच-त्यांत पुढील प्रसंग घडल्यामुळें आगींत तेल ओतल्यासारखें झालें तो प्रसंग असा.

एके वेळीं देवदत्त भगवान बुद्धाला म्हणाला ' भगवंत' आतां आपण फार वृद्ध झालांत. तेव्हां संघाचें चालकत्व कृपा करून आपण मला द्यावें. '


बुद्ध म्हणाला ' चालकत्व जर द्यावयाचें असलें तर सारिपुत्त आणि मोग्गल्लानासारख्या सत्शिष्यांना मी देईन तुझ्या सारख्याला नव्हे. '

द्वेषभाव वाढत चालला होता बुद्धाला पाहिलें कीं त्याच्या तळव्याची आग मस्तकाला जात असे. एके दिवशीं भगवान बुद्ध गृध्रकूट पर्वतावर फिरत असतां देवदत्तानें संधी साधली. तो पर्वतशिखरावर गेला व बुद्धाच्या अंगाशीं जाऊन भिडेल अशा बेतानें शिखरावरून एक शिलाखंड ढकलून दिला. बुद्धाच्या अंगावर जर ती शिला पडली असती तर बुद्ध ठारच झालाच असता परंतु ह्या प्रसंगापासून तो थोडक्यांतच बचावला शिलाखंड वरून खालीं गडबडत येतांना छिन्नविच्छिन्न झाल्यामुळें त्याच्या अनेक चिपा झाल्या, त्यांतील एक चीप बुद्धाच्या पायांत रुतली. त्यामुळें बुद्धाला फार त्रास झाला. जीवक ह्या

नांवाचा बुद्धाचा एक शिष्य तेथें आला. त्यानें पायांतील कुजलेलें मांस काढून टाकून, व्रणास औषध लावून तो बरा केला. कांहीं दिवसांनीं ती जखम भरून आली व बुद्ध पुन्हा पूर्ववत् गांवांत हिंडूं फिरूं लागला.

देवदत्ताच्या मनांतला द्वेषभाव दिवसें दिवस वाढतच चालला होता. त्यानें बुद्धाला मारण्यासाठीं मारेकरी पाठविले. त्यापैकीं एक परत येऊन म्हणाला 'बाबा मी त्याला मारूं शकत नाहीं! त्याचा प्रभाव फार मोठा आहे!' जेवढे बुद्धाचे 'शत्रू' म्हणून गेले ते सर्व बुद्धाचे मित्र होऊन राहिले असें जेव्हां देवदत्तानें पाहिलें तेव्हां त्याला वाटलें:—'बुद्धाचें डौलदार चालणें, बोलणें पाहून त्याच्यावर कोणीहि मनुष्य सहसा शस्त्र उगारणार नाहीं पण अजातशत्रूच्या हस्तिशाळेंतील मस्त हत्ती नालागिरी हा या बुद्धाचा नाश करूं शकेल.'

विचार पटला. राजाला देखील कळविलें. राजानें हस्तिशाळेंत हुकुम दिला. हुकुमाप्रमाणें मस्त नालगिरीस मद्य पाजून धुंद करण्यांत आलें. 'गांवांत कोणीहि फिरूं नये. नालागिरी सुटा सोडण्यांत येणार आहे' अशी दवंडी देखील पिटविली. रस्त्यावर शुकशुकाट झाला.



नालागिरी हत्ती बुद्धास अभिवादन करितो.

पुष्कळशीं मंडळी घराच्या छपरांवरून, झाडावरून, खिडक्यांतून मौज पहाण्यास बसलीं.

बुद्ध आपल्या शिष्यांसह रस्त्यानें जाऊं लागला. समोरून नालागिरी येताना दिसला. बुद्धभिक्षूंनीं बुद्धाला 'पुढें जाऊं नका' म्हणून सांगितलें. पण बुद्ध म्हणाला 'येईना कां तो, काय हरकत आहे?' म्हणून तो पुढें चालूं लागला. इतक्यांत एका बाईचें मूल इकडून तिकडें जाण्यासाठीं रस्त्यावर आलें. नालागिरी धुंद; पूर्ण मस्तींत आलेला; तें कोवळें मूल; भगवान् बुद्धाची गंभीर मूर्ति अशा ह्या 'त्रैमूर्ति' रस्त्यांत दिसूं लागल्या.

बुद्ध नालागिरीकडे बघून म्हणाला 'तुला धुंद करण्यांत आलें आहे खरें, पण हें मूल मारण्याकरता नव्हें, माझ्याकरतां आहे. तेव्हां तूं आपला माझ्याकडे ये.' बुद्धानें असें म्हटलें मात्र; हत्तीनें उभारलेली सोंड खालीं टाकून दिली व भगवान् बुद्धास अभिवादन केलें.

एके वेळीं भिक्षूनें त्याला विचारलें 'देवदत्ता, बुद्धानें तुझ्यावर आजपावेतों कितीतरी उपकार केले आहेत. तुला त्रिपिटक ग्रंथ शिकविला. समाधी लावण्यास शिकविली व तुला लाभसत्कार मिळवून दिला' यावर देव-

दत्त गवताची काडी हातांत घेऊन म्हणाला, 'गौतमानें माझा एवढा देखील फायदा करून दिला नाहीं.'

देवदत्तानें स्वतःचे अनुयायी तयार केलेच होते. त्यांना तो उपदेशामृत पाजून स्वतःच्या संघाची श्रेष्ठता समजावून सांगत असेंच पण एकें दिवशीं देवदत्त अतिशय थकल्यामुळें संघाला उपदेश करूं शकला नाहीं. तेवढ्यांत सारिपुत्त आणि मोग्गल्लान हे दोघेहि तेथें आल्यानें त्यांनीं संघास उपदेश केला त्यांचा उपदेश अर्थातच् भगवान् बुद्धाबद्दल अत्यंत आदर आणि प्रेम उत्पन्न करणारा असल्यामुळें सर्व संघाच्या भावना जागृत झाल्या आणि प्रत्येक जण 'बुद्धास शरण जाऊं या' असें म्हणूं लागला व सारिपुत्ताबरोबर विहारांत जाण्याचें अभिवचन सर्वांनी दिलें. थोड्या वेळानें सर्व शिष्यसमुदाय सारिपुत्ताबरोबर बुद्धवस्तीकडे निघून देखील गेला.

शिष्य गेल्यानें आपला 'आश्रम' शून्य झाल्याचें ऐकून देवदत्ताला अतिशय वाईट वाटलें. तें दुःख सहन न झाल्यानें त्याला रक्ताची उलटी झाली. अंथरूणावर तळमळत असतां बुद्धाचें गुण आठवून तो म्हणाला, 'पुष्कळ दिवसपर्यंत मी भगवानाबद्दल द्वेष बाळगिला

परंतु भगवंतानें त्याच्या मनांत माझ्या विषयींची द्वेषभावना आणली नाहीं. इतकेंच काय पण बुद्धभिक्षूंच्या मनांत देखील कोणत्याहि प्रकारचा द्वेषभाव नव्हता; परंतु आज मात्र भगवान् बुद्धानें, बौद्धभिक्षूंनीं, राहुलानें आणि शाक्य राजे यांनीं देखील मला सोडले. आज मी एकटा पडलों. माझ्याबरोबर कोणी नाहीं !!'

त्याला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला. त्यानें शिष्यांना बोलाविलें. स्वतः डोलींत बसला व रात्रीच्या रात्रीं प्रवास करून कोसल देशास गेला.

त्या वेळीं आनंदानें बुद्धास म्हटलें, 'तुमच्याशीं सख्य करण्यांस देवदत्त येत आहे म्हणे.' बुद्धानें उत्तर दिलें, 'आनंदा, देवदत्त मला भेटणार नाहीं. ?

जेतवनाच्या दरवाजाशीं देवदत्ताला आणतांच त्याच्या अंगाचा दाह झाला जेतवन डोहांतील पाणी पिण्याची त्यास इच्छा झाली व त्याच्या कांठाशीं जातांच पृथ्वी दुभंग झाली व तींत तो 'गडप' झाला.

---

# ३

## बुद्धाच्या परिचयाचे राजे.

### मगध देशाचा राजा बिंबिसार.

हा बौद्धधर्मानुयायी म्हणून बराचसा प्रसिद्ध आहे. ह्याचे नातेवाईक, ह्याचा मुलगा अजातशत्रु व कोसलदेशचा राजा **पसेनदि** देखील बौद्धधर्मानुयायी होते हें आपणाला पुढें कळेलच. सोन्यासारखी अंगकांति म्हणून **बिं**बिसार हें नांव ह्यास प्राप्त झालें होतें. त्याच प्रमाणें बिंबिसाराच्या पदरीं पुष्कळशी सेना असल्यामुळें लोक त्याला 'सेनिय' म्हणून देखील म्हणत असत. राज्यावर आल्यानंतर त्यानें आजूबाजूच्या देशांशीं मैत्री जोडली. कांहींशीं शरीरसंबंध जोडले; कांहींशीं तह केले आणि कांहींना जिंकून त्याने त्यांस आपले मांडलिकत्व पत्करावयास लावले.

राजा बिंबिसार हा अत्यंत धर्मशीलवृत्तीचा माणूस होता. त्याला आवाजावरून माणसाची परिक्षा करण्याची कला अवगत होती. त्या विषयीं एक आख्यायिका प्रसिद्ध आहे ती अशी:–

एके दिवशीं फाटकें वस्त्र परिधान करून गांवांत मोलमजुरी करून स्वतःची उपजीविका करणारा असा

एक माणूस राजद्वारीं येऊन उभा राहिला. राजानें त्याचा फक्त आवाज ऐकतांच तो अतिशय श्रीमंत माणूस असावा असें सांगितलें. राजवाडयांतील नोकरांनीं त्याची माहिती मिळविली परंतु तो तशाप्रकारें श्रीमंत असावा असा सुगावा लागला नाहीं. परंतु एक दासी मात्र त्याच्या पुरी खनपटीला बसल्यामुळें तिनें त्याच्यावर चांगलीच पाळत ठेविली. त्याचा परिणाम असा झाला कीं एका दासीला जमिनींत पुरुन ठेविलेल्या धनांपैकीं कांहीं थोडेसें धन त्या दासीच्या युक्तीमुळें तिलाच देण्याची वेळ आली तेव्हां त्या गुप्त धनाचा पत्ता लागला.

दासीनें ती हकिकत राजवाड्यांत जाऊन सांगितली आणि त्या गृहस्थाला राजवाड्यांत बोलाविल्यानंतर त्यानें दिलेल्या उत्तरांत त्याचेंजवळ ४० कोटी कार्षापण आहेत असें आढळून आलें. राजानें तें सर्व धन आणविलें. राजानें त्याचा गौरव करुन त्याला भांडागारिकाची जागा दिली आणि स्वताच्या मुलीशी लग्न करुन देऊन सर्व धन परत दिलें.

राजा बिंबिसार धार्मिकवृत्तीचा माणूस होता हें वर सांगितलेंच. ब्राम्हणधर्मातील मोक्षाची कल्पना आणि

बुद्धाची धर्मविषयक कांहीं तत्वें ह्याबद्दल बुद्धानें राजाची प्रत्यक्ष खात्री पटवून दिल्यामुळें तो ब्राम्हण धर्मापासून परावृत्त होऊन बौद्धधर्माचा अनुयायी बनला. तो भगवान् बुद्धाचा एकनिष्ठ सेवक होता. राज्य सुखानें चाललें होतें.. जिकडें तिकडें सुव्यवस्था नांदत होती. अशा काळीं राजाला स्वतःच्या मुलाकरवीं आपल्याला मृत्यू येईल अशी कल्पनाहि कां यावी ? परंतु दैवच फिरलें तेथें तो तरी काय करणार ? अजातशत्रु बुद्धद्वेष्टया देवदत्ताचा अनुयायी होता हें गेल्या प्रकरणांत सांगितलेंच त्याप्रमाणें तो देवदत्ताच्या अगदीं अर्ध्या वचनांत होता. ' बापाला मारून तूं राज्य घे ' असें अजातशत्रूला त्यानेंच शिकविलें. त्याप्रमाणें तो बिंबिसाराचा वध करण्याकरतां निघाला परंतु वाटेंतच मंत्र्यानीं तें पाहिल्यामुळें त्याला पकडलें व तशा प्रकारच्या त्याच्या अपराधाबद्दल विचारपूस केली. अजातशत्रूनें ' राज्यलोभ मला आहे,' असें सांगितल्यावरुन राजानें राज्य त्यास सोंपून दिलें.

## राजा अजातशत्रु

हा बिंबिसाराचा मुलगा. 'बापाला हा मारणार अन् गादीवर बसणार' असें भविष्य ह्याच्या जन्माआधींच वर्तविलें होते. हें बाळ आईच्या गर्भांत असतांनाच आईला नवऱ्याचें रक्त पिण्याचे डोहाळे लागलें. राजानें तें आपल्या प्रेमळ स्वभावामुळें पुरविलें ही गोष्ट निराळी; पण त्या वेळेपासून पिता-पुत्राचें असें 'अहिनकुल' सख्य होतें.

हा देवदत्ताचा अनुयायी असल्याबद्दलचा उल्लेख मागें केला आहेच. बुद्धधर्माचीं तत्वें ह्यास मान्य होण्यास एक चांगलाच साक्षात्कार घडला तो प्रसंग असाः–

देवदत्त एके दिवशीं अंगांत कफनी, एका हातांत भिक्षापात्र, दुसऱ्या हातांत बसण्याच्या चटईची वळकटी घेऊन भिक्षाटनाला निघाला. विचार केला कीं 'आपल्या पंथासाठीं अजातशत्रूसारखा राजपुत्र अनुयायी मिळाला तर आपण आपला पंथ चांगल्याच रितीनें टिकवूं शकूं.' त्यानें सर्पवेष्टित अशा लहान बालकाचें रूप धारण केलें व अजातशत्रूच्या मांडीवर एकदम प्रादुर्भूत झाला. अगदीं अचानकपणें तो सर्प आणि बालक आलेलें पाहून

अजातशत्रू भयचकित झाला. त्याला आपत्तीच आल्यासारखें वाटलें. त्याच्या मनांत विचार सुरू झाले. इतक्यांत तें बालक म्हणालें, ' मी देवदत्त आहे असा घाबरूं नकोस ! '

अजातशत्रूनें त्याला आपल्या नित्यस्वरूपांत दर्शन देण्याची विनंति केली त्याप्रमाणें देवदत्तानें आपलें रूप टाकलें व त्याच्यापुढें उभा राहिला.

हा साक्षात्कार झाल्यामुळें अजातशत्रूची देवदत्तावर चांगलीच मर्जी बसली तो जें जें सांगेल तें तें अतिशय भक्तिभावानें तो करण्यास मागे पुढें पहात नसे. थोडक्यांत ह्मणजे तो देवदत्तासारखाच बुद्धद्वेष्टा होता बौद्धधर्मांची जीं सुंदर तत्वें त्यांचा तो मात्र अगदीं कट्टा अनुयायी होता.

बापाला त्यानें—अजात शत्रूनें—मारलें त्यामुळें कोसलदेवी शोकावेगानें मरण पावली. तेव्हां पसेनदी राजानें ' अजातशत्रूनें बापाला मारले. माझी बहीण देखील अति शोकानें मरण पावली. अशा या पितृघातक्याला मी काशीगांव मुळींच देणार नाहीं ' असा निश्चय करून त्या गांवाचें चालत आलेलें उत्पन्न अजात शत्रूस देण्याचें बंद

केलें. या उत्पन्नाबद्दल पसेनदी व अजातशत्रू यांमध्यें वारंवार लढाया होत असत. घटकेंत हा जिंके तर घटकेंत तो जिंके असें पुष्कळ दिवस चाललें होतें. परंतु अखेर पसेनदीराजानें अजातशत्रूस जिवंत धरून आणलें आणि आपली मुलगी त्यास देऊन काशीगांव परत दिला.

देवदत्ताचें अकालीं अवसान झाल्यामुळें आपलीहि गती तीच होणार असें वाटून अजातशत्रू बराच चिंतातूर झाला. त्याला संसारांत गोडी वाटेनाशी झाली. आपण केलेल्या कृत्याबद्दल भगवान् बुद्धाची नम्रभावानें क्षमा मागावी असें त्याला वाटूं लागलें परंतु बुद्धमूर्तीपुढें जाण्यास धैर्य होईना. कार्तिक रात्रीच्या सणाबद्दल गांवांत महोत्सव चालूं असतांना राजगृह राजधानी देवगृहाप्रमाणें सजविली गेली होती. राजवाड्यांत त्या वेळीं तो आपल्या मंत्र्याबरोबर बोलत बसला होता. जीवकाकडे पाहून त्याला असें वाटलें कीं ' ह्याच्याबरोबर जाऊन बुद्धाचें दर्शन घ्यावें. ' म्हणून तो सहज म्हणाला ' कोणत्या साधूचें दर्शन घेतलें असतां चित्तशांति होईल ' ?

प्रत्येकानें आपापल्या गुरूचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. जीवकानेंहि बुद्धाचें नांव सांगितलें.

त्याबरोबर त्याला ती कल्पना पटली व तो भगवान् बुद्धाच्या दर्शनास गेला.

बुद्धानें अजातशत्रू गेल्यानंतर आपले विचार प्रगट केले ते असेः—'देवदत्तामुळें या जन्मांत स्वतःचा नाश राजानें स्वतःच्या मूर्खपणामुळें करून घेतला.'

बौद्धधर्माचा तो अतिशय अभिमानी होता. एकदां असें घडलें कीं मोग्गल्लानाचा वध एका चोराच्या टोळीनें केला. अजातशत्रूला जेव्हां हें कळलें तेव्हां त्यानें आपल्या हेरांकरवीं चोरांस पकडून आणून कमरेइतक्या खोल खाड्यांत पुरवून त्यांवर गवत टाकून पेटवून दिलें. अशा रितीनें जीवास जीव घेण्याची शिक्षा त्या काळच्या पद्धती प्रमाणें त्यांस देण्यास त्यानें बिलकुल मागेपुढें पाहिलें नाहीं.

अजातशत्रूनें जसा वडिलांचा वध केला त्याच-प्रमाणें त्याचा देखील त्याच्या मुलानें--उदयभद्रानें वध केला.

## ४

## राजा पसेनदी

हा कोसल देशचा राजा. राजा बिंबिसार ह्याला त्याची बहिण दिली असल्यामुळें मगध आणि कोसल राजांचीं नातीं दृढ झालीं होतीं. त्यावेळीं कोसलदेवीच्या चोळीबांगडीकरतां महाकोसल राजानें एक लक्ष उत्पन्नाचा काशीगांव दिला होता हाच गांव पुढें चालवावा किंवा नाहीं ह्याबद्दल पसेनदी राजाचा अजातशत्रूशीं तंटा झाला व अखेर 'मुलगी दिली व गांवहि दि॰ा' !

पसेनदी बुद्धधर्माचा अनुयायी होता. त्याचें बुद्धावर फार प्रेम होतें. तो वारंवार धर्मोपदेश ऐकण्यासाठीं जेतवनांत जात असे. भिक्षुसंघाला अन्नवस्त्र देत असे. आपला आणि शाक्यकुलाचा निकटचा संबंध व्हावा ह्या हेतूनें त्यानें एका शाक्यकन्येला पट्टराणी करण्याचें ठरविलें होतें.

शाक्य राजे मोठे अभिमानी होत. कोसलच्या कुलापेक्षां शाक्याचें कुल श्रेष्ठ असें ते समजत असल्यामुळें कोसलाधिपतीच्या म्हणण्याला रुकार द्यावा कीं नाहीं ह्याबद्दल मोठीच पंचाईत पडली. राजाची मागणी उघडपणें नाकारतां तर येईना. मग एक युक्ति सुचली व ती

त्यांनीं योजिलीहि ! महानाम शाक्याची दासी-कन्या वासभक्षत्रिया हिला महानामानें कोसलराजाला द्यावी असें ठरविलें. ती दासी-कन्या आहे असें पसेनदीला त्यांनीं कळूं दिलें नाहीं.

कोसलराजाला ती मुलगी पसंत पडली परंतु शाक्यांना तो पूर्ण ओळखून असल्यामुळें 'मुलीला पंक्तीला घेऊन जेवावें' असा निरोप त्यानें पाठविला. त्याप्रमाणें ती मंडळी पण 'शेरास सव्वाशेर' अशीच असल्यानें तिच्या पंक्तीस जेवली. ह्या खात्रीमुळें पसेनदानें वासभ-क्षत्रियेशीं लग्न केलें आणि ठरल्याप्रमाणें तिला पट्टराणी केलें. कांहीं कालानंतर राणीला पुत्ररत्न प्राप्त झालें, त्याचें नांव विडूडभ असें ठेवलें.

विडूडभ जाणता झाल्यानंतर साहजिकपणेंच आपल्या आजोळाबद्दल तपास करूं लागला. आईनें अनेक प्रकारचीं उडवाउडवींचीं उत्तरें देऊन त्याला चूप बसविलें पण त्यानें कांहीं कालानंतर 'एकदां कपिलवस्तूस जाऊन येणारच' असा निश्चय जाहीर केला. त्या वेळीं देखील अनेक अडचणी पुढें केल्या पण निश्चय कृतींत आणण्यास त्यानें बिलकूल हार खाल्ली नाहीं.

वासभक्षत्रियेनें महानामाला गुप्त रितीनें निरोप पाठविला व विडूडभास व्यवस्थित वागविण्यास विनविलें. त्या प्रमाणें सर्व व्यवस्था झाली देखील! पण नोकर लोकांत सहज चाललेली चर्चा विडूडभाच्या नोकरांच्या कानापात्रेतों गेल्यामुळें गोंधळ उडाला तो असाः—

\+ + + + +

जेवण झालें व मंडळी बाहेर निघून गेल्यानंतर उष्टें-शेण करणाऱ्या दासींपैकीं एक दासी म्हणतेः—

१—'तो पाट वेगळा धुवून ठेवावयाचा आहे.'

२—'कां?'

१—'अग तो दासी—पुत्र ना!'

२—'अस्सं....! तरीच....!'

नोकरांनीं हा संवाद विडूडभाला सांगितला. त्याला वाईट वाटलें अन् तो चिडला देखील! 'अस्सें काय? शाक्यांच्या रक्तानें पाट धुवून काढीन! आहांत कुठें?' रागाच्या झपाट्यांत त्यानें प्रतिज्ञा केली.

पसेनदीला ह्या गोष्टीचा सुगावा लागल्याबरोबर वासभक्षत्रियेस त्यानें पट्टराणीपदावरून दूर केलें.

कांहीं दिवसांनंतर बुद्ध राजवाड्यांत गेला असतां शाक्यांच्या वर्तनाबद्दल गोष्ट निघाली. पण बुद्धानें बाजू सांवरून घेऊन उपदेश केला कीं 'वर्तन अयोग्य आहे ह्यांत शंका नाहीं. परंतु पदरीं पडलली वस्तू पवित्र झाल्यानंतर तिचा अव्हेर करणें हें उचित नव्हे तरी वासभक्षत्रियेचा पट्टराणीपदाचा मान चालू ठेवणें केव्हांहि इष्ट आहे.'

बुद्धाचा उपदेश राजाला पटला. राजानें पूर्ववत् क्रम चालू ठेवला.

\+ + +

सेनापति आणि पसेनदी ह्यांमध्यें वितुष्ट पडलें. व ही संधि बरी आहे असें समजून विडूडभानें स्वतःस राज्याभिषेक करून घेतला व वृद्ध पित्यास हांकून दिलें.

\+ + +

विडूडभानें प्रतिज्ञेप्रमाणें शाक्यांवर स्वारी करण्याचा विचार केला पण तो दोनदां बुद्धाच्या मध्यस्थी मसलतीनें फसला. परंतु तिसऱ्यांदा मात्र आपला बेत बुद्धाला न कळवितां त्यानें पार पाडला. शाक्यांची दाणादाण उडविली. म्हटल्याप्रमाणें शाक्यांच्या रक्तानें आसन धुवून काढलें शाक्यांचा पूर्ण निःपात केला.

पसेनदी राजा बिचारा अजातशत्रूच्या मदतीनें राज्य परत मिळविण्याचा विचार करीत होता परंतु वाटेंतच चालण्याच्या श्रमामुळें तो मरण पावला. इकडे विडूडभहि श्रावस्तीनजीक असलेल्या राप्ती नदीला पूर आल्यामुळें वाहून गेला.

REFBK-0005261

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५२६१

# आधारभूत ग्रंथांची यादी.


१ बुद्धचरित्र
( विविधज्ञानविस्तारांतील लेखमाला ) } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

२ बौद्धसंघाचा परिचय. } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

३ बुद्धलीलासारसंग्रह. } प्रो. धर्मानंद कोसंबीकृत.

४ जातकांतील निवडक गोष्टी—प्रथमार्ध—स्वकृत.

५ दीघनिकाय-महापरिनिब्बाण सुत्त प्रो. राजवाडेकृत.

६ माज्झिम निकाय.

७ महाराष्ट्रीय ज्ञानकोश—बुद्धोत्तर जग.

संपादक - डॉ. श्री. व्यं. केतकर.

8 Some Ancient Indian Kings. By-Dr. Vimal Charan Law, Ph. D., M. A, B. L.

9 Mannual of Buddhism. By–Dr. Kern.

# श्री सयाजी बालज्ञानमाला

## ऐतिहासिक चरित्रों

| | | | |
|---|---|---|---|
| १ | (४) | महाराणा प्रताप. रमणलाल वसंतलाल देसाई, एम. ए. ( १९१९–१९२२ ) | ०–६–० |
| २ | (८) | औरंगजेब. मनसुखराम मोहनलाल पोटा बी. ए; ( १९१९–१९२२ ) | ०–६–० |
| ३ | (१०) | रणजितसिंह. भरतराम भानुसुखराम महेता ओ. टी. सी. ई. ( १९२०–१९२३ ) | ०–६–० |
| ४ | (११) | श्रीहर्ष. भरतराम भानुसुखराम महेता ( १९२०–१९२२ ) | ०–६–० |
| ५ | (१६) | बालनेपोलियन. दिनकरराय पुरुषोत्तमराय जोषीपुरा ( १९१९–१९२५ ) | ०–६–० |
| ६ | (१९) | श्रीहर्ष. आनंदप्रिय आत्मारामजी बी. ए. एलएल. बी. [ हिन्दी ] (१९२१) | ०–८–० |
| ७ | (२४) | लॉर्ड विलियम बेन्टिक. हीरालाल हरजीवन गणात्रा बी. ए. एलएल. बी, सॉलिसीटर (१९२२) | ०–६–० |
| ८ | (२५) | नाना फडनवीस. रमणलाल वसंतलाल देसाई. एम. ए (१९२२) | ०–६–० |
| ९ | (२८) | महादजी सिंधिया. वल्लभराय लालशंकर छाया बी. ए. (१९२२) | ०–६–० |
| १० | (३४) | बाल बाबर. मनसुखलाल मोहनलाल पोटा बी. ए ( १९२२ ) | ०–६–० |
| ११ | (४१) | विलियम एवर्ट ग्लॅडस्टन. हीरालाल हरजीवन गणात्रा बी. ए. एलएल. बी, सॉलिसीटर (१९२४) | ०–६–० |

५२८५

१२ (४२) शूरवीर शिवाजी. भरतराम भानुसुखराम महेता ओ. टी. सी. इ. ( १९२४ ) ०–६–०

१३ (४७) छत्रपति संभाजी महाराज. केशव मंगेश रांगेणकर बी. ए. ( मराठी ) (१९२४) ०–६–०

१४ (४८) महाराणा प्रताप. परशुराम गोविंद काटदरे ०–६–०

१५ (५१) डयुक आफ वेलिंग्टन. हीरालाल हरजीवन गणात्रा बी.ए.एलएल. बी. सॉलिसीटर (१९२४) ०–६–०

१६ (६४) औरंगजेब. आनंदाप्रिय आत्माराम पंडित बी.ए.एलएल.बी. [हिन्दी] (१९२६) ०–८–०

१७ (६६) चक्रवर्ती अशोक.हरिराय भगवतराय बुच ०–६–०

१८ (६७) बाल-बाबर. विष्णु पांडुरंग नेने बी.ए. ०–६–०

१९ (७७) विलयम एवर्ट ग्लडस्टन. विष्णु पांडुरंग नेने बी. ए. (मराठी) ( १९२७ ) ०–६–०

२० (८९) अशोक. विष्णु पांडुरंग नेने , बी. ए. ०–५–०

२१ (९७) आपणा महाराजा.—चंद्रशंकर म. भट्ट. ०–६–०

२२ (९८) कोलम्बस—( सचित्र ) ०–६–०

२३ (१०३) कर्ण—रामराव मार्तंड भांबुरकर ०–६–०

२४ (१०५) रामदास—रामराव मार्तंड भांबुरकर ०–६–०

२५ (१०७) झांशीची शूर राणी लक्ष्मीबाई— ले. श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान. (१९३३) ०–६–०

२६ (१०९) भीष्म. वि. वा. जोशी (१९३३) ०–३–०

२७ (११४) एलिचपुर.—य. खु. देशपांडे, (१९३४) ०–६–०

२८ (११५) चक्रधर—दत्तात्रय सीताराम पंगु एम. ए. ०–४–०

२९ (१२२) शाक्यमुनि गौतम–चिं.वि.जोशी (१९३५) ०–६–०

———